REGISTERED NO. 7, 1876

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १० | अकालों रविवार ता० ४ माहे जून सन १८७६ इ० | अंक २३

## वऱ्हाडसमाचाराचीकिंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| सालअखेर | ७ |
| फुटकळ अंकास | ०४ |
| डांकहाशील | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| " अखेर | २ |

☞ नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## नोटिसा.

उमरजी प्रयागजी दुकान शेगाव यांस शिवाजी वलद इंद्राजी पाटील मौजे बटवाडी तालुके बाळापुर याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुह्मी आह्मास २७०८ रुपयाबद्दल नोटिस दिली ती पावली व लिहिला मजकूर समजला. तुमची आमशी २० खंडी जवसाचा सवदा दर ७० रुपयेप्रमाणें पुरी झाला व माप आमचे गावचे पायलीचे ठरलें. व १९ रुपये इसाराचे दिले. पुढें भाव थोडा मंद झाला तेव्हा तुह्मी जबान फेरून बाळापुर पायलीचें बोलणें आहे असें ह्मणूं लागले व माप नेण्याचें बंद केलें नंतर आह्मी तुह्मास पुष्कळ वेळ माप घेण्याविषयीं सांगितलें पण तुह्मी माप घेतलें नाहीं. शेवटी आह्मी च्यार भले मानसांचे समोर तुह्मास असेंही जतावलें कीं तुह्मी आपलें माप घेऊन जा नाहीं तर चालू भावांत जवस विकून तुमचे जवळून आलेले नुकसान भरून घेऊ. तरी तुह्मी माप नेलें नाहीं ह्मणून आह्मी जवस दर ६९ रुपयेप्रमाणें विकले. हल्लीं ही नोटिस दिली आहे तर ही पावल्यापासून ४ दिवसांत नुकसानीबद्दल सर्व रुपये आदा करावे नाहींपेक्षां दिवाणींत फिर्याद करून रु० घेतले जातील हें खूब समजावें व तुह्मी दिलेली नोटिस सर्व खोटी आहे. कळावे तारीख ३१ माहे मे सन १८७६ इसवी

( सही ) शिवाजी वलद इंद्राजी पाटील बटवडीकर निशाणी

खुद्द हातची रेघ

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्याच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस —

वि. वि. महाराज या वऱ्हाडांत जीं देवस्थानें आहेत त्यांत बरेच दिवस भरभराटींत असून संपत्तीमान असें देऊळगांव राजा हें आहे. याहून कमी पण जवळ जवळ त्याच प्रतिमेचें स्थान ह्मटलें ह्मणजे वाशिम हें होय. येथें नागपुरच्या एका सरदारानें बालाजीचें देऊळ, सभामंडप, चौंफेर पाठशाळा व पुढें नगारखाना बांधला आहे. हें सर्व काम सुरेख, सोयीवार व मजबूत आहे. याचप्रमाणें देवतळेंही मोठें भव्य असून चतुराईनें बांधलें आहे व त्यांत पाणीही विपुल असतें. हें तळें देवळाजवळ असल्याकारणानें यावर धुणीं वगैरे धुण्याचा आदळ फार असे, तेणेंकरून त्यांतील पाणी पिण्याचें निरुपयोगी होई. पण हल्लीं त्यांत धुण्याची वगैरे बंदी ठेवून स्वच्छता उत्तम राखिली आहे. व तेणेंकरून तें सर्वांस सारखें उपयोगी झालें आहे. त्यांतून यात्रेकरू प्रवाशांस तर विशेषेंकरून मोठें सोयीवार झालें आहे. याशिवाय शहरदुरुस्ती व स्वच्छता साधारण बरी आहे. मात्र वेठ बिगारीच्या संबंधानें थोडी अव्यवस्था दिसून आली. ह्मणजे प्रवासी यात्रेकऱ्यांच्या गाड्या धरण्यांत बळजोरी तसेंच गैरमाहित लोकांस आजूबाजूनें लघवी केल्याबद्दल शिवी गाळी करतांना पोलिसचे शिपाई दृष्टीस पडले. अशा कृतीनें प्रवाशास केव्हां केव्हां त्रास सोसावा लागतो. इकडे वरिष्ठ अधिकारी लक्ष्य पोंचावितील तर बरें होईल व प्रवाशांची यातायात चुकून त्यांस दुवा देतील. कळावें तारीख ३० मे १८७६

एक देवदर्शनास गेलेला

'के'

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस —

वि. वि. एथील वृत्ताच्या चार ओळी आपण कडे पाठविल्या आहेत त्यांस येत्या अंकीं जागा द्यावी.

काल चिखलीचे तहशिलदार येथें आले व आज बहुतकरून परत जातील. काल एथील सरकारी धर्मशाळेचा हरास पांच रुपयांस झाला. या सालीं धर्मशाळा रा. रा. दाजी नारायण यांनीं आपलेकडे लिलावांत घेतली आहे व त्यांचा मुख्य हेतु त्या गृहाचा शब्दार्थप्रमाणें उपयोग करावयाचा आहे. पुष्कळ धर्मशाळा अशा आहेत कीं त्यांचें नाव धर्मार्थशाळा परंतु निदान एक पैसा तरी उतारू लोकांस द्यावा लागतो. किती एक दरिद्री भिक्षा मागण्याकरितां येतात व त्यांस परजन्यकाळीं निवाऱ्याची जागा जरूर असल्यामुळें तसेंच उष्णता फार झाली ह्मणजे सावलीची गरज लागल्यामुळें त्यांस धर्मशाळेचा आश्रय धरावा लागतो पण त्यांजवळ पैसा नसल्यामुळें धर्मशाळेचा उपभोग त्यांस प्राप्त होत नाहीं. या सर्व अडचणी मनांत आणून दाजी साहेब यांनीं फुकट एक वर्ष सर्व मुशाफरांस राहण्यास सोयीकर पडावें ह्मणून या सालीं त्यांनीं स्वतां हरास घेतला आहे. हें त्यांस भूषण होय.

गावांत अशी कुजबूज चालली आहे कीं राजे मानसिंग यांचे मामानीं एथें थोडे दिवसांपूर्वीं एक अनुष्ठान ब्राह्मणांकरवीं करविलें. त्या अनुष्ठानाचा हेतु विपरित कोणी गृहस्थानीं काढला आहे. कोणी अशी कंडी उठविली आहे कीं सदहू अनुष्ठान आप्त वर्गांतील कोणी एकाचें अनहित करण्याचे इरादानें केलें आहे. असेंही ह्मणतात कीं तहशिलदार साहेब याच प्रकरणांत बारीक चौकशी करण्याकरितां आले आहेत मग खरें खोटें ईश्वरास माहीत. आह्मांस इतकें ठाऊक आहे कीं सदहू मामांचें कुंटुंब बरेच दिवसांपासून आजारी आहे व त्याप्रीत्यर्थ त्यांनीं अनेक उपाय वैद्याकरवी व ब्राह्मणांकरवीं करविले त्यांपैकींच एक अनुष्ठान ग्रहशांतवनार्थ केलें तरी बिच्याऱ्याची बायको तर दुरुस्त झाली नाहीं पण उलटें एक कुभांड मात्र आलें. कांहीं लोक असे असतात कीं त्यांस घरच्या भाकरी खाऊन कंड्या उठविण्यांत सुख वाटतें, सुलट्याचें उलटें आणि उलट्याचें सुलटें त्यांस फार आवडतें. या स्वभावास अनुरूनच ही अनुष्ठाची कंडी उठली असावी. त्यांत तथ्यांस असेलसें वाटत नाहीं. एडिटर महाराज अनुष्ठानानें लोकांचें अनहित होतें हा समज किती अज्ञान सूचक आहे. अहो, देव न्यायी आहे आणि तो दुष्ट आराधनेस सहाय कसा होईल! कोणी नवस केला कीं परमेश्वरा, फलाण्या मनुष्यास ज्वर येवो त्याची शरीरशक्ति कमी होवो ह्मणजे मी तुझ्या नावानें पांच रुपायांची शिरणी वाटीन किंवा अभिषेक करीन तर देव असला नवस कबूल करील काय? खचित् दुष्ट प्रार्थना परमेश्वरास आवडत नाहींत. हे भगवान् ह्या हिंदुस्थानांतील भोळीं व वेडीं मतें कधीं नाहींशीं करशील?

देऊळगावराजा — आश्चर्य पावलेला

ता. १८ मे — एक क्ष.

### पुनर्विवाहाचा उत्कर्ष कमी होईल काय?

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

वि. वि. महाराज सौ पुनर्विवाहोत्तेजन मंडळी स्थापन होऊन आज बरींच वर्षें झालीं व ती स्थापन झाल्या सारखे तिचे हेतूही बरेच सफल झाले असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

ब्राह्मण ज्ञातींत पुनर्विवाह सुरू झाल्या बरोबर खलबत होऊन पुण्यास सशास्त्रते अशास्त्रतेविषयीं वादविवाद उभयपक्षांनीं प्रसिद्ध ठिकाणीं आरंभिला व आपापले पक्ष सिद्ध केले. त्यांत प्रतिपक्षाकडे मताधिक्य झाल्यामुळें उत्तेजक मंडळीचा थोडा हिरमोड झाला खरा; पण कै० वे० विष्णु परशराम शास्त्री पंडित यांणीं आपला भगिरथ प्रयत्न न सोडतां १०।१९ विधवांस पुनः सौभाग्य देऊन विरहाग्नीच्या पीडेपासून मुक्त केलें. ते शास्त्रीबावा नुकतेच मरण पावले. येणेंकरून शुभचिंतक लोकांस खेद होऊन पूर्वीप्रमाणें या पक्षाची अभिवृद्धि पुढें कोणाच्या हातून होईल न होईल अशी भीति वाटूं लागली आहे.

पुनर्विवाह हा गौणपक्ष खराच व त्याविषयीं आमच्या पूर्वजांनीं भवती न भवती अशीं आपापलीं मतेंही देऊन ठेविलीं आहेत तसेंच आह्मी आपलें आयुष्य जन्मापासून कसकशा क्रीया करून घालवावें हीही आज्ञा वेदांत देऊन ठेविली आहे पण आह्मी पडलों अभागी आमच्यानें त्यांची आज्ञा कोठें पाळवते व त्याप्रमाणें वर्तवते? आतां हें उघड आहे कीं, एक आज्ञा मोडली ह्मणजे तिची अनुसंगिक दुसरी सोडली पाहिजे त्या वाचून गत्यंतर नाहीं. अगर ती न सोडली तर नाना प्रकारचे क्लेश व दुःखें भोगावीं लागतात. पहा, आपलें वर्तन पूर्वजांचे आज्ञेस अनुसरून कितपत राहिलें याचा विच्यार करा.

आधीं आमचे जन्मापासून योग्य काळीं होणारे शोडष संस्कार होत आले काय? व त्यांचे हेतूप्रमाणें आपल्यावर काहीं कार्य झालें काय?

आतां उपनयनविधि हा आमच्या प्रच्यारांत अजून चालू आहे पण त्यांत जे विधि करतात त्याप्रमाणें भिक्षा मागणें, ब्रह्मचर्य व्रत धारण करणें हे जितका काल मर्याद चालवावयाचे ते आह्मांतून ज्याच्यानें तडीस नेवत असतील ते धन्य होत. तसाच लग्न विधि—स्त्री १४ व्या वर्षीं शरीरीं पूर्ण होऊन ऋतुमती होते, मनुष्याचें शरीर २१ वे वर्षीं पूर्ण होऊन विषय संगास योग्य होतो. हा त्यांच्या वयाच्या संबंधीं हंगाम, वधू वरांचें लग्न समयीं साधतो असें उदाहरण शेकडा एक तरी मिळेल काय? कठीण व. तर ?॥ वर्षांची वधू व ९ वर्षांचा वर असे लग्ननिश्चय होऊं लागल्या कारणानें मनुष्याचें शरीर पूर्ण होण्यापूर्वींच खर्ची पडूं लागल्यामुळें तें अशक्त होऊन लवकरच मृत्यूच्या दाढेंत सांपडतें. मग त्या अबलेनें काय करावें बरें! हेंही असो पण तीन वर्षांचे मुलीचें लग्न केलें व पुढें एक दोन वर्षांनीं तिचा पति गत झाला तर तिचें पुन्हा लग्न करण्यास कांहीं हरकत आहे काय? लग्नसमयीं ज्या शर्ती वधूवरांत होतात त्यांचें जर त्यास ज्ञान नसतें तर त्या शर्तीं मोडल्याचा दोष त्या वधू वरांवर येणार आहे काय? अगर लग्नसमयीं मुखानें उच्चारलेले करार तंतोतंत पाळले जातात काय? कचित्. या पूर्ण अव्यवस्थेकडे धर्मसंरक्षकांचें लक्ष्य पोंचत नाहीं तर त्याच चुकीचा परिणाम टाळणारा पुनर्विवाह त्याविषयीं इतका दुराग्रह कां असावा बरें! ही चाल पूर्वीं न व्हती काय? याबद्दल कांहीं शास्त्राधार नाहीं काय? यापासून कोणास मोठीशी इजा होणार आहे काय? बालहत्यादि

घोरकर्मे वारंवार घडतात तीं बरीं आहेत काय ? सहस्त्रावधि अमोल्य अबला क्रेरा प्रमाणें कोना कोपऱ्यांत पडलेल्या बऱ्या दिसतात काय ? इत्यादि घडणाऱ्या घोर कर्मांस शास्त्रांत कांहीं आधार आहे काय? नाहीं. अशा निराधार दुर्वर्तनानें जर आम्ही दोषी ठरत नाहीं तर तशा प्रकारचें दुराचरण बंद करण्यासाठीं गौण पण साधार व निर्विकारी अशी वहिवाट सुरूं केल्यानें आम्ही अधिक दोषी ठरूं काय? नाहीं. पण आमचें दुर्भाग्य आमच्या मागें मोठें जबर लागलें आहे. तें या सर्व अघोर कृत्यांवर जाड अच्छादन घालून ‘ स्त्री पुनर्विवाह वाईट ’ एवढेंच पुढें करितें पण ग्राह्य वस्तूचें ग्रहण अगर त्याज्य वस्तूचा त्याग करण्यास धैर्य देत नाहीं. तरी मला वाटतें कीं शास्त्रीबावाचे श्रमाचें सार्थक झाल्यावाचून रहाणार नाहीं. कारण कोणतीही वस्तु ती बरी अगर वाईट असो पण प्रथम नकोशी असते. पण तिचे गुणावगुण समजून आले व ती बरी आहे असें मनानें घेतलें ह्मणजे तिच्या ठायीं पूर्ण भक्ती जडते. ती कधीहि उडत नाहीं. ब्राह्मणांत स्त्री पुनर्विवाह असें शब्द जेव्हां प्रथमारंभीं आमच्या धर्मभोळे लोकांच्या कानीं आले तेव्हां त्यांच्या अंगावर एकदम शहारे आले व आगगाडीची, तारायंत्राची ह्या जशा अचाट गति ऐकून व पाहून जसे त्यांस महदाश्चर्य वाटत होतें तसेंच हेंही वाटू लागलें होतें. पण पुनः पुनः त्याविषयीं चर्चा ऐकण्यांत येऊन व तसा मार्ग ज्यांचे प्रचारांत नाहीं त्यांवर बितणारीं संकटें पाहून कित्येकांच्या मनीषा वळूं लागल्या आहेत व कालांतरानें उपयोगी वस्तूंचा संग्रह सर्वत्र करतीलही. पण हें सर्व शास्त्रीबावांच्या दृढनिश्चयाचें व दीर्घ प्रयत्नाचें फल होय करितां तो निश्चय व तो प्रयत्न न सोडतां साथीदार उत्तेजक मंडळीनें आतां अधिक कंबर बांधली पाहिजे. विस्तार भयास्तव आतां पुरें करितों. कळावें. ता. २९ मे १८७६.

तुमचा दास

रामात्मज.

## नोटिस.

दिनकरराव वल्लद जानरावजी देशमुख कसबे तेल्हारें तालुके अकोट यांस नोटिस देणार मनाजी वल्लद कृष्णाजी देशमुख वस्ती कसबे तेल्हारें तालुके अकोट सुमार सन १२८५ फसली कारणें नोटिस देण्यांत येते कीं सन १२८० सालापासून सन १२८४ पावेतों लवाजम्याचे अजमास रुपये ३५२॥। तुमचे कडेस घेणे आहे तर हे रुपये ही नोटिस पावल्यापासून ८ दिवसाचे आंत देऊन आमची पावती घ्यावी याप्रमाणे तुह्मी न केल्यास रीतीप्रमाणे तजवीज करून रुपये घेतले जातील या नोटिशीचा व पुढें होणाऱ्या फिर्यादीचा खर्च तुह्मापासून भरून घेतला जाईल कळावें तारीख २ जून सन १८७६ इसवी.

( सही ) मनाजी वल्लद कृष्णाजी देशमुख वस्ती कसबे तेल्हारें

वहिवाटदार सिताराम

दस्तुर खुद

वऱ्हाडसमाचार

मिती ज्येष्ठ शुध्ध १३ शके १७९८.

## इंग्लंड आणि रुशिया यांचे मध्यें आशियांत राज्यकारस्थान.

आस्त्रिया देशांतील कप्तान डाबेलक नावाचा एक लष्करी सरदार थोडे दिवसांपूर्वीं इराण व दुसरे कितीएक देश पाहून गेला. त्याणें आपले प्रवासाचे हकीकतीचें एक लहानेंसे पुस्तक छापून प्रसिध्ध केलें आहे त्यांत तो इंग्लंड व रुशिया यांचेमध्यें एशियांतील फौजेविषयीं व दुसऱ्या अनेक राजकीय गोष्टीविषयीं विचार करून असें ह्मणतो कीं, या दोन राष्ट्रांमध्यें कलह होऊन त्यांचा परिणाम कोणत्या प्रकारचा होईल याबद्दल मला कांहीं एक संशय नाहीं. रुशियाचे बेतास विघ्न आणण्यास तसेंच त्याचा मार्ग खुंठित करण्यास इंग्लंड आज आगरीं असमर्थ आहे. इंग्लिश लोक कितपत लढाऊ आहेत याविषयीं त्यांची आफगाणिस्थानांत शेवटली लढाई झाली यावरून एशियांतील पुष्कळ राष्ट्रांची खात्री झाली आहे. पण तशी गोष्ट रुशियनाची नाहीं. त्यांनीं आजपर्यंत मध्य एशियांत एके ठिकाणींही पराजय होऊं दिला नाहीं, आणि आपलें पाऊल हळुहळु चाल करून हिंदुस्थानाकडे वळविण्याचें धोरण ठेविलें आहे, असें असतां इंग्लंड इतके दिवस स्वस्थ निद्रिस्त राहून आतां जागृत होऊन विचार करीत आहे कीं आपल्या हिंदुस्थानचे राज्यास रुशिया मध्य एशियांत दिवसें दिवस चाल करीत आहे यापासून आपाय आहे. इंग्लिश लोक जरी उत्तम प्रकारचे सुधारलेले आहेत आणि त्यांच्या अंगीं शहाणपणही पहिल्या प्रतीचें आहे तरी हिंदुस्थानांतील हलक्या प्रजांचीं अंतःकरणें व प्रीति आपलेकडे वळवून घेण्यांचे त्यांना अगदीं साधलें नाहीं. पण रुशियन या कामांत फारच हुशार आहेत त्यांनीं नवीन काबीज केलेल्या प्रांतांतील लोकांस आपलेंसें करून सोडिलें आहे. याशिवाय कप्तान डाबेलक असें ह्मणतो कीं, आफगाणी आणि सीक लोक यांचें शौर्याविषयींही पुष्कळ अतिशयोक्ती केली आहे. आफगाणिस्थान आणि काशगर यांनीं जरी इंग्लिशांस मदत केली तरी हिंदुस्थानावर येणारें विघ्न त्याच्यानें टळणार नाहीं. हीं दोनही राष्ट्रें इंग्लंडास मदत न करितां रुशियास मदत करतील, याचा संभव विशेष आहे. कारण रुशियाचे लोक तिकडे जाऊन त्यांचीं मनें वळवीत आहेत. याशिवाय त्या सरदाराचें ह्मणणें आहे कीं रुशियन लोक हिंदुस्थानावर स्वारी ईशान्य दिशेकडून करणार नाहींत कारण तिकडचे घाट फार दुर्घट आहेत ह्मणून लष्कर वगैरे नेण्यास फार मुष्कील पडेल पण आपले वायव्य दिशेकडील हल्ल्यास पुष्टीकरण यावें ह्मणून त्या मार्गांनीं कोशगरांतून कांहीं लोक तिकडे पाठवून उत्तर हिंदुस्थानांतील बेदिल झालेले लोकांत बंडें उपस्थित करतील. क्यास्पियन समुद्रापासून साघालिन बेटापर्यंत एकंदर ६०८०० रुशियन पायदल, ३२५६० स्वार, ११२ तोफा, ३०००० तद्देशीय पायदळ, आणि २६००० राखून ठेवलेले शिपायी इतकी फौज आहे. हे सर्व लष्कर मुख्यत्वें करून काकेशसचे सेनेंतलें आहे. ती सेना सर्व प्रकारें उत्तमावस्थेंत असून पुष्कळ वर्षें एकसारखी स्वाऱ्या करीत असल्यामुळें तींतील लोक लढाईचे कामांत अगदीं घटून गेले आहेत. त्यांस उत्तमप्रकारची कवाईत येत आहे. तसेंच त्यांचीं हत्यारेंही अगदी नूतन शोधापैकींच आहेत. ही सर्व फौज पाहिजे तेव्हां एशियांतील मोठ्या दुर्घट डोंगरी प्रदेशांतून जाण्यास सिध्ध आहे. त्याची कवाईत, शौर्य व चांगले शिक्षण असल्यामुळें तुर्कस्थानची तर कंबर खचून गेलीच आहे, इराण तर रुशिया सांगेल त्याप्रमाणें करण्यास तयार आहे व हिंदुस्थान सरकारची गडबड उडून दिवसानुदिवस त्यांच्यामध्यें अधिक अस्वस्थता होत चालली आहे. काकेशस नावाचे सेनेंत एकंदर १७८,५०० पायदळ, ४४००० स्वार, ४०८ तोफा आणि ५००० शिबंदी इतकें सैन्य आहे, हें सर्व सैन्य उत्तमप्रकारचे तयारींत आहे. या सैन्याची एकादी टोळी आस्त्राखान पासून आस्त्राबादपर्यंत सहज पाठवितां येईल व तेथून आट्रेक खिंडींतून मेर्व्हपर्यंत जाण्यास २० मुक्काम करावे लागतील. आणी तो प्रांत इतक्या सुबत्तेचा आहे कीं त्यांतून ३० पासून ४० हजार पर्यंत लष्कर नेण्यास धान्य वगैरे सामग्रीच्या संबधानें बिलकूल हरकत पडणार नाहीं. याशिवाय इराणाचे उत्तर हद्दीवरील एरीव्हान येथून इराणचे आखातांतील बंदर आबसपर्यंत आगगाडी करण्याचा रुशियानें बेत केला आहे. आणि हा बेत सिद्धीस नेण्यास रुशियन लोक कधीं कमी करणार नाहीं. कारण त्यापासून काकेशस येथील सैन्य आणि हिंदीमहासागर यांमध्यें दळणवळण ठेवण्यास फार सोयकर पडेल. या सर्व गोष्टींचा विचार केला असतां. कप्तान डबिलक साहेब ह्मणतात कीं जो इंग्लिश सरकारचा बेत आहे कीं जर रुशियन लोकांनीं, मेर्व्ह शहर घेतलें तर आपण हिरात शहरावर चाल करून जाऊं हा फार चुकीचा आहे. ते ह्मणतात दुसरी गोष्ट अशी आहे कीं हिंदुस्थानांत आज लढाईला उभी रहाण्या जोगी काळी व गोरी मिळून १३०००० लोकांपेक्षां अधिक नाहीं यांतूनही सुमारें ८०००० लोक हिंदुस्थानचें विस्तिर्ण राज्य राखण्या करितां तेथेंच ठेविले पाहिजेत. तेव्हां बाकी राहिलेले ५०००० लोक मुख्यत्वेंकरून रुशियाचे १००००० फौजेचा पराभव करतील हें मनांत सुद्धां आणावयास नको. यदाकदाचित् केला तर दुसरी कुमक येईतों पर्यंत रुशियन मेर्व्ह येथें रहातील. इंग्लिश लोकांस एक तर बालेनपास येथून हिरातापर्यंत फार दूर फौज न्यावी लागेल आणि जर पराजय झाला तर सन १८४२ सालांतल्या लढाई प्रमाणें आफगाणी लोक त्याचा नाश करतील. शिवाय खुद हिंदुस्थानांतच बंड वगैरे होऊन राज्यास धक्का बसण्याची भीति ही निराळीच आहे.

## देशी भाषांतलीं वर्तमानपत्रें

आलीकडे बरेच दिवसांपासून या देशांतील वर्तमानपत्रांवर सरकारची नजर कडी असल्यासारखी दिसत आहे. आणि त्यांतून विशेषेंकरून तर देशी भाषांतलि वर्तमानपत्रांवर फारच आहे. याचें कारण असें दिसतें कीं, त्या सर्वांचा झोंक नेहमीं सरकारचे विरुद्ध लिहिण्याकडे असून भलतेच कुतर्क काढून अज्ञानी लोकांचीं मनें दूषित होऊन सरकारचे कोणत्याही कृत्याविषयीं त्यांचीं पूज्य बुद्धि राहू नये अशा प्रकारचें लिहिणें असतें असें सरकारास वाटूं लागलें आहे. हा समज सर्वांशी खरा आहे असें आमचें ह्मणणें नाहीं. तरी इतकेंच सांगणें येथें भाग आहे कीं, लेर्ली, टेलर, वगैरे साहेबांनीं केलेली एतद्देशीय वर्तमानपत्रांवरील टीका व दुसरी कित्येक निरनिराळ्या भाषांतील वर्तमानपत्रें वाचून पाहिलीं ह्मणजे असें वाटतें कीं सरकारचा समज बरेच अंशीं वास्तविक आहे. कित्येक गोष्टींत आह्मास असें दिसून आलें आहे कीं वर्तमानपत्र सूरू झालें कीं त्याच्या पहिल्या अंकापासूनच सरकाची निंदा व पःकाश्रित व्यक्तीस अनुलक्षून व्यर्थ उपहास्यतेस आरंभ होतो. पत्रकर्त्यांनां वाटूं लागतें कीं आपण सरकारचे विरुद्ध कोणत्याही तऱ्हेनें लिहिलें ह्मणजे आपलें कर्तव्यकर्म झालें, मग तें लिहिणें न्यायाचें असो किंवा अन्यायाचें असो, पण असल्या लिहिण्यापासून त्याच्या मताप्रमाणें देशास जितका फायदा व्हावयाचा त्याच्या शतांशही न होतां उलटा सहस्त्र गुणित तोटा मात्र होऊं पहात आहे. आलीकडे हिंदुस्थानांतील व विलायेंततील वर्तमानपत्रांतून या विषया संबंधी जी चर्चा चालू आहे त्यावरून अनुमान करितां येतें कीं इकडील वर्तमानपत्रांचीं तोंडें कांहीं विषयांत थोडींशीं बंद करून टाकण्याचा सरकारांत विचार घाटत असावा; सरकारास असे वाटूं लागलें असावें कीं, ज्या प्रजेचें आम्ही पुत्रवत् पालन करीत आहों ह्मणजे जिला आम्ही सर्व प्रकारें सुरक्षित ठेवून उत्तम प्रकारची विद्या देऊन शहाणें करीत आहों त्या प्रजेनें ‘खात्या घरचें वासे मोजावें’ आणि कृतघ्नपणा सारखे वर्तन ठेवावें हें हल्लींच्या स्थितींतले लोकाचें प्रजाधर्मास अगदीं अयोग्य आहे. आणि असें सरकारास कां बरें वाटूं नये? आपण आपल्या घरांतील स्थितीचा विचार केला ह्मणजे सहज ध्यानांत येईल कीं आपली आज्ञा जर आपले

मुलांनीं मोडली किंवा आपण त्याचें सर्वोपरी कल्याण करण्याची इच्छा बाळगीत असतां तींच आपल्यावर उडली तर भापल्या मनाची स्थिति कशी होते या करितां सरकारचे सर्व प्रकारचे उद्देश बरोबर न समजतां विनाकारण खोटा गवगवा करण्यांत देशास कांहीं फायदा हणार नाहीं किल्येकाचें ह्मणणें असेल कीं, जसें मुलाचे आई बापाजवळ लडिवाळपणें कांहीं मागणें असतें यांत तीं एकादे वेळीं रागावून अयोग्य अशाही गोष्टी करितात, तद्वत आम्ही लोकांचीं सर्व मागणीं सरकारास वर्तमानपत्रद्वारें कळवितों तर त्यांतही विचाराविचार पाहिला पाहिजेच. विरोधभक्तीनें स्वामीची प्रीति संपादन करून घेण्यापेक्षां त्यास गौरवानें खुशी करण्यास कमी काळ लागतो हें जर आपणास अनुभवानें माहित आहे तर व्यर्थ उपहास्यता करण्यांत व करून घेण्यांत काय अर्थ आहे ? याकरितां सरकारचे उद्देश न समजतां जी पोरकट बडबड, अनिर्वाच्य गालिप्रदान व अश्लाघ्य निंदा होत असते ती जितकी कमी होईल तितकी चांगली आणि उद्देश पूर्णपणें समजून जर ते अनहिताचे असले तर न्याय दिसेल तेवढीच टीका करून उगीच बसणें यांतच विशेष हाशील आहे असें आह्मास वाटते.

## येथील नार्मलस्कुलांत नवीन प्राक्टिसिंग स्कूल.

तारीख १ जून रोजीं येथील नार्मन स्कुलास जोडून या स्कुलाची स्थापना राव साहेब नारायण भाई डायरेक्टर यांनीं केली या शाळेंत मुलांची भरती ताजनापेठेंतून येऊन सिटी स्कुलांत १ ली, २ री व ३ री यत्ता शिकणारांची केली व शिक्षकाची योजना नार्मन स्कुलांतील विद्यार्थी दररोज २ दोन या क्रमानें सर्व विद्यार्थ्यांनीं जात जावें अशी केली व त्यावर पैरवी ठेवण्याकारितां सिटी स्कुलांतील ए. अ मा. रा. रावजी सिताराम यांची नेमणूक केली व त्याचा पगार वाढवावयाचा आहे असें ह्मणतात, व शाळेला जागा नार्मस्कुला शेजारी बराकेंतच दिली आहे.

या प्राक्टिस स्कुलाचे स्थापनेंत रावसाहेबांनीं किती प्रकारचें सहाय, सुख व सोयी वाढविल्या हे सहज लक्षांत येण्यासारखें आहे तें असें—ताजनापेठेंतील मुलांस नदी ओलांडून फार लांब यावें लागत असें ह्मणून तिकडे मराठी भागासाटीं शाळा असणें जरूर होतें तें साधून मुलास लांब येण्याचा त्रास चुकला हें एक आतां हें नार्मलस्कुलास जोडलें व त्यांतील शिक्षक होणाऱ्या विद्यार्थ्यांनीं शिकवावें असें ठरविलें, हे तर त्यांच्या शिक्षण क्रमांत मोठें अमोल्य सहाय दिल्यासारखें झालें आहे. कारण कोणत्याही विषयाचा अभ्यास करावयाचा ह्मटलें ह्मणजे नुसता पुस्तकावरून बिंबत नाहीं व त्यास यावें तसें फल येत नाहीं तर त्या कृतीच हातून झाल्या पाहिजेत, जसें रसायण शास्त्र शिकविण्याचें ह्मटलें ह्मणजे कोण कोणत्या पदार्थांचें मिश्रण कसकसें होऊन काय काय कार्यें होतात हें समजण्यास त्या त्या कृती हातूनच झाल्या पाहिजेत, त्या व्यतिरिक्त तो त्या कामांत निष्णात होत नाहीं. शरीरशास्त्र शिकावयाचें तर प्रत्यक्ष शरीर फाडूनच कोणता भाग कोठें आहे, त्याचा संबंध कोणीकडे आहे व त्यांत न्यूनाधिक्य झाल्यास उपाय कोणत्या भागावर कसा करावा हें समजून घेतलें पाहिजे तरच याच्या भावी स्थितींत तें ज्ञान फलद्रूप होऊन इतरांस दुःख विमुक्त करितें. तसेंच ज्यांना शिकवावें कसें हेंच जर शिकविलें जातें तर त्यांच्या हातून प्रत्यक्ष शिकऊन घेतलें पाहिजे व त्यांत त्यांची प्रविणता झाली न झाली हें पाहिलें पाहिजे. या हेतूस अनुसरून या स्कुलाची योजना फार महत्वाची झाली व येणेंकरून भावी होणाऱ्या शिक्षकाच्या शिक्षणक्रमास सहाय होऊन त्या कामांत ते चांगले हुशार होतील व जीर्णावस्थेंत आलेलें ट्रेनिंग कालेजाचें नाव गाजवून वऱ्हाडांतील अज्ञानी मुलाचे मनावर उत्तम शिक्षणाचा ठसा वठवितील असें आह्मी इच्छितों व तसें परमेश्वर घडवो.

## वऱ्हाड.

या आठवड्यांत सकाळीं दहा भका वाजेपर्यंत व संध्याकाळींही इतकाच काल पावेतों किंवा केव्हां अधिकही आकाश मेघांनीं व्याप्त राहून वाराही सोसाट्याचा वहात होता व मधून मधून पावसाचे थेंबही येत होते. तरी हवेंतील गर्मी विशेष कमी झाली नाहीं उष्ण काळामुळें पूर्वीं जितकी मनुष्यास काहली होत असे तितकी आतां होत नाहीं. व लवकरच पाऊस येईल असें चिन्ह दिसूं लागलें आहे रोगराईची वार्ता विशेष नाहीं.

तारीख ३० रोजीं सायंकाळीं ७ वाजण्याचे सुमारास अकोलकोठावर वीज पडून एक गाभणी ह्मैस तत्काल यमसदनास गेली व त्याच ठिकाणीं रहाणारा महादु गुरव याजवरून तिची झळ जाऊन शेंडीचे केश करपल्यासारखें झालें व मुर्छित पडला पण त्याचे मुलीचें लग्न होतें तें जेवण्याची पंगत वाढित होता तेणेंकरून पाव्हणे वगैरे मंडळी जवळ वरींच होती त्यांनीं त्याला ताबडतोब घरांत उचलून नेलें व सावध केलें. तेव्हां त्याच्या छातींत व कमरेखालच्या सर्व भागांत वेदना होतात असें तो सांगू लगला त्यावरून घरची माणसें ते ते भाग चोळावयास लागलीं तरी त्या वेदना एकसारख्या ३।४ दिवस होत होत्या व त्याचा वाचण्याचा भरवसा नव्हता; पण बाई बांगडीच्या औषधावर घरांत पडून तो परमेश्वर कृपेकरून थोडा बरा आहे.

या प्रांतांतील विद्याशाला उन्हाळ्याचें सुटी मुळें मे महिन्यांत बंद होत्या व शिक्षक लोक आपापल्या देशीं गेले होते ते या आठवड्यांत येऊन ( हायस्कुलें खेरीज करून) पूर्ववत सुरू झाल्या.

मागील आठवड्यांत महामारीच्या विषयीं जिकडून तिकडून बरींच आवाई उठली होती तसेंच इलिचपुर तालुक्यांतही तुरळक आजार सुरू झाल्याचें समजलें होतें पण तें सर्व खोटें आहे. वणीकडे या बाईचा प्रवेश झाल्याचे वर्तमान समजलें आहे. पण ईश्वर करो व तेंही खोटें ठरो असें आह्मी इच्छितों.

मे. कमिशनर साहिब व जुडिशियल कमिशनर साहेब यांच्या स्वाऱ्या चिखलदऱ्यास आहित व एथील कायमचे डिपुटी कमिशनर साहेब नरनाळ्यास आहेत. १२वे तारखेपर्यंत त्यांची रजा आहे, ह्मणून पुढील आठवड्यांत ते येथें येतीलसें वाटतें.

काळ्या मारुतीकडील सडकेस गटार बांधण्याचें काम म्युनिसिप्यालिटीकडून मोठ्या झपाट्यानें चालू आहे. म्यु. कमेटीचे व्हाइस प्रेसिडेंट मि. दस्तुर बहिमनजी साहेब बहादुर हे दररोज सकाळ संध्याकाळ फिरून गावांत उत्तम प्रकारें स्वच्छता करविली आहे. व इतर सडकांवरही रेती वगैरे पसरण्याचें काम जारी आहे.

या जिल्ह्यांतील म्युनिसिप्यालिटयांस लोकलफंडाकडून जी मदत मिळत होती ती मे. डिपुटी कमिशनर साहेबांनीं बंद केली व याचप्रमाणें उमरावती जिल्ह्यांतही ठरलें असें प्रमोदासिंधूवरून समजतें.

इकडील पोष्ट खात्याचे इन्स्पेक्टर नरनाळ्यास आहेत व चीफ इन्स्पेक्टर साहेबांची स्वारी तारीख ३१ मे रोजी नागपुराहून येथें येऊन तिकडे गेली.

इलिचपुरचे डि. ए. इन्स्पेक्टर रा. रा. बळवंत नरसिंव्ह हे गेल्या आठवड्यांत येथें आले होते, दोन दिवस मंडळीच्या भेटी घेऊन परत गेले.

आमच्या वऱ्हाडचे माजी रेसिडेंट मेहेरबान साडर्स साहेब हे विलायतेस रजेवर गेले होते ते तारीख ३० मे रोजीं मुंबईस येऊन ह्मैसुराकडे गेले. यांस के. सी. एस. आय. ह्मणजे सर हा किताब मिळून यांची नेमणूक ह्मैसूर व कुर्गचे चीफ कमिशनरचे जागेवर झाली असें ह्मणतात.

तारीख १ जून रोजीं सकाळीं राव साहेब नारायण भाई डायरेक्टर यांची स्वारी गावांत येऊन मुलींची शाळा पहावयास गेली होती व तेथून सिटी स्कुलांत जाऊन प्राक्टिस स्कुलाचे स्थापनेकरिता लवकरच नार्मलस्कुलाकडे जाऊन त्याची स्थापना केली.

एथील डिपुटी कमिशनर साहिबाचे कचेरीची इमारत अगदी मोडकळीस आली आहे तिकडे अधिकाऱ्यांचे लक्ष्य पोचून तिची दुरुस्ती झाल्यास बरें होईल. कारण एक वेळ इमारत अशी झाली ह्मणजे तिचा भरवसा नाहीं व ती हजारों लोकांचे बैठकीची जागा असल्या कारणानें व पुढें पावसाचे दिवस समीप आल्या मुळें प्रसंगवशात धक्का बसला तर अपघातास कारण होऊन नवें संकट उद्भवणार आहे करितां तिची दुरुस्ती लवकर झाल्यास बरें होईल.

सर सालरजंग हे नेपल्स येथें, पोचल्याच्या हकीकतीचें आलेलें पत्र प्रसिद्ध झालें आहे यावरून समजतें कीं त्यांचा वाटेंत व तेथें चांगला सन्मान झाला, आणि वाटेंत त्यांस कित्येकांहून भेटी मिळाल्या व त्यांणीं परत भेटी दिल्या. ज्या आगबोटीवरून ते गेले त्या आगबोटीच्या क्याप्टनानें आपणास सांभाळून नेलें ह्मणून सर यांणीं त्यास एक मोठी किंमतवान आंगठी बक्षीस दिली. अ. द.

## सिंक्लेर मेमोरियल फंड.

| | रु. |
|---|---|
| रा. बाळकृष्ण जनार्दन हे. मा. नांदुरा | ३ |
| ,, आपाजी वामन क्लार्क अकोला | ३ |
| ,, रामचंद्र वामन हे. मा. येरळी | २ |
| ,, आत्माराम रामचंद्र अ.मा पिंपळगाव | २ |
| ,, वासुदेव धोंडदेव अ. मा. नांदुरा | १ |
| | ११ |
| मागील बेरीज | ८६९०८ |
| एकंदर बेरीज | ८८०१८ |

## वर्तमानसार

राजकोट येथें आणखी पाच वर्षेपर्यंत प्रधानकोर्ट ठेवण्याचा सरकारानें ठराव केला आहे.

मद्रास इलाख्यांत प्रिन्सच्या खर्चाकरतां ठरल्या रकमेपेक्षां २,३९७८१३८२ जास्त खर्च झाला.

जोतपूरच्या महाराजांचे बंधु व जयपूरच्या महाराजांचे शालक महाराजकुमार प्रताप सिन्ग हे प्रिन्सच्या बोलावण्यावरून पुढील वर्षीं विलायतेस जाणार आहेत. यांणीं वाघाच्या शिकारीस प्रिन्स यांस फार मदत केली होती.

सिंध प्रांताची राज्यव्यवस्था मुंबई सरकारच्या ताब्यांतून काढून पंजाब सरकारच्या हातांत दिल्याबद्दलचा विलायत सरकारचा ठराव तारायंत्रद्वारें कराचीवरून हिंदुस्थान सरकाराकडे रवाना झाला असें सिंधेंतील एका पत्राच्या समजण्यांत आलें आहे. अ. द.

मनुष्याचे कातडीचा उपयोग— एक वर्तमान पत्रकर्ता ह्मणतो कीं अमेरिकेंतले लोक कांहीं दिवसांनीं मनुष्यांचे कपाळाचे करटीचीं पाणी पिण्याचीं भांडींही तयार करतील. एका अमेरिकनानें मेलेल्या मनुष्याचें कातडें कमावून त्याचा उपयोग करण्याची युक्ति काढली आहे. त्यानें एका अपघातानें मेलेल्या मनुष्याचें कातडें कमावून त्याचे बूट करून ते वाशिंग्टन इन्स्टिटयूटमध्यें ठेविले आहेत ते पाहून लोकांस फार आश्चर्य वाटतें.

ह्या अमेरिकन मनुष्याचे मनांतून हे बूट फिलाडेलफिया प्रदर्शनात ठेवावयाचे आहेत. ह्या बुटाचें कातडें फार मृदु व लवचिक असून सफाईदार दिसतें; परंतु तें कितपत टिकाऊ निपजेल हें अद्यापि समजत नाहीं. हें कातडें शिकारीचे व प्रवासाचे वगैरे कठीण कामास उपयोगीं पडणार नाहीं परंतु नाटक गृहांत व बाल (नांच) वगैरे नाजुक कामाचे वेळीं घालावयाचे बुटांस फार उपयोगीं पडेल असें ह्मणतात. ने. ओ.

मुंबई येथील पी. आणि ओ. कंपनीच्या एका आगबोटींतून चीन येथें पाठविण्याकरितां कांहीं लढाईचें सामान मुंबईस आलें होतें तें कस्टम खात्यांतील अधिकाऱ्यांनीं पकडलें. या कंपनीची बोखारा नांवाची आगबोट विलायतेहून आली तींतून तोफांच्या गाड्यांचीं चाकें आलीं होतीं हीं चिनदेशास जाऊं दिलीं नाहींत. व कस्टम कमिशनर यांणीं तीं जप्त करण्याचा हुकूम दिला व कंपनीस ६०० रुपये दंड केला.

कलादगी जिल्ह्याच्या उत्तरभागाकडेस पटकीचा उपद्रव झाला आहे. व तेथून तो सोलापुराकडे जात आहे.

हौरापासून अर्ध मैलावर वाट्रा या गांवीं एका झोंपड्यांतून एक चार वर्षांचें मूल निजलेलें असतां एका कोल्ह्यानें नेलें.

१८ मे रोजीं संपणाऱ्या आठवड्यांतील हवा, पीक वगैरेची हकीकतः— मद्रास इलाख्यांत थोडा थोडा पाऊस पडला परंतु करनल व मलबार येथें मुळींच पडला नाहीं. मुंबई इलाख्यांत खेडा, सातारा व सिंध येथें मात्र थोडासा पाऊस पडला दक्षिणमहाराष्ट्रदेशांत पेरणी करितां पाउसाची गरज आहे. वऱ्हाड, मध्य प्रांत व मध्य हिंदुस्थान येथें पाऊस मुळींच पडला नाहीं. रजपुतस्थानांत जयपुर व भरतपुर येथें थोडासा पाऊस पडला. बंगाल इलाख्यांत उत्तर. पूर्व मध्यभागच्या प्रदेशांत पाउसाची हवा सुरू आहे. छोटा नागपुर व ओरिसा या ठिकाणीं पाहिजे तितका पाऊस पडला. जेथें जेथें पाऊस पडला तेथें तेथें पेरणीचें काम सुरू झालें. वायव्य प्रांतांत आग्रा, मिरत, बरेली व आमोरा येथें पाऊस पडला. पंजाबांत पेशावर व रावळपिंडी खेरीजकरून बाकी सर्व प्रांतांत थोडाबहुत पाऊस पडला. आसाममध्यें पाऊस पडला. म्हैसूरमध्यें फार पाऊस पडला. सु. प.

लढाईची वदंता— समरकंद व बदक्शान यांजमधील रस्त्यावरील कोला व रस्तक यांच्या हाकिमांमध्यें लढाई होण्याची वदंता उठली आहे.

स्वदेशाभिमानी— आह्मांस लिहिण्यास परम संतोष वाटतो कीं आमचे अल्पवयी राजे साहेब श्री. महाराज नारायणराव दादा साहेब पवार यांनीं देवास इलाख्यांतील सारंगपुर महालीं तयार होणारीं स्वदेशीय सुतानें काढविलेलीं वस्त्रें परिधान करण्याचा निश्चय केला आहे.

देव मामलेदारांच्या नवीन पादुकांची स्थापना— तालुके मंगळवेढे येथे रा. सा. ...गवंत महादेव देव मामलेदार यांच्या पादु... स्थापन झाल्या आहेत त्या संबधानें ह

...लीं तेथें प्रति शनिवारीं ३।४ हजार यात्रा भरत असते.

---

## रशिया व हिंदुस्थान

रशियाचें मध्य एशियामध्यें जें पुढें सरसावणें चाललें आहे त्यामुळें इंग्लिश मुत्सदी लोकांस जास्त काळजी उत्पन्न झाली आहे. या रशियाच्या येण्यामुळें आह्मास कांहींच भीति नाहीं असें पुष्कळ इंग्लिश लोक ह्मणतात, परंतु हें त्यांचें ह्मणणें एका ब्राह्मण पंडितास भयंकर वाघ भेटला त्या वेळेस या भयंकर जनावराची दृष्ट टाळण्यास त्यानें आपणास गवतांत लपवून घेतलें त्याप्रमाणें आहे. चांगल्या समजुतीचे जे इंग्रज लोक आहेत ते या प्रमाणें कल्पना करून आपणास फसवून घेत नाहींत कारण हें भय कधीं तरी येणार आहे असें त्यांस पक्कें ठाऊक आहे, पूर्वीं हिंदुस्थानांत वायव्य दिशेकडून येणाऱ्या रानटी लोकांच्या टोळ्यांपासून भीति होती व हल्लीं रशियानें त्या टोळ्यांस आपल्या अमलाखालीं आणिलें आहे. मगध देशांतील बौध्य धर्माच्या राज्यांचा व त्याच प्रमाणें रोमन राज्यांचा नाश याच टोळ्यांनीं केला. रशियाच्या अमलाखालीं या ज्या टोळ्या आहेत यांचेंच क्रूरत्वाचें उदाहरण हूण, वेंडल व गोथ या टोळ्यांनीं घेतलें आहे. हूण टोळ्यांनीं राज्याचा नाश केला हें पूर्णपणें सर्वांस माहित आहेच. परंतु बौध्य धर्माच्या राज्याचा या टोळ्यांनीं नाश केला हें मात्र पुष्कळांस चांगलें ठाऊक नाहीं. व्हाडल्स या टोळ्यांनीं हिंदुस्थानावर स्वारी केली होती यास बांदलखंड हें प्रमाण आहे. हूण लोकांनीं हिंदुस्थानावर स्वारी केली यास हूण नामक रजपुत लोकांची टोळी ही प्रमाण होय आणि भरतपूर एथील जाट वंशांतील राजे हे जट या टोळीपासून उत्पन्न झाले असावे. याच टोळ्यांनीं नुकतीच एशिया व युरोप या खंडांची शांतता मोडली होती. ख्रिस्ती व हिंदु या दोन्हीही जातींचा मोड करून काबालीखान व जंगीजखान या दोघांनीं आपलें राज्य वाढवलें. तार्तरी येथील लोक ज्यांनीं मोंगल हें नांव धारण केलें त्यांनींच हिंदुस्थानास पूर्णपणें काबीज केलें. हे लोक ज्यांनीं पूर्वेकडील रोमन लोकांचें राज्य घेतलें त्या लोकांचे अनुयायी होत. ह्मणून आपल्या भोंवतालच्या प्रदेशांत रहाणाऱ्या लोकांस लढाऊ व त्रास देण्याचा स्वभाव आणणें हा कास्पियन समुद्राचा स्वभावच दिसतो.

आतां मध्य एशियांतील टोळ्यांस हिंदुस्थानच्या बळाकडे लक्ष्य दिलें असतां हिंदुस्थान सहज रीतीनें काबीज करतां येईल काय ह्याचा विचार केला पाहिजे. युरोप खंडांतील चांगल्या रीतीनें सुधारलेलीं रशिया व इंग्लंड हीं राज्यें एकीकडे ठेवून रशियाच्या तार्तर व तार्तरीच्या भोंतालच्या टोळ्या व मराठे व रजपूत यांमध्यें प्रसंग झाला असतां काय होईल याचा विचार करूं या प्रसंगाचा अशा रीतीनें निर्णय करितां येईल कीं, हिंदु लोक लढाई करण्याचें मनांत घेतील तर तार्तर लोकांस खचितच हटवितील. ज्या दोन प्रसंगीं या टोळ्यांनी हिंदु लोकांस जिंकिलें त्यावेळेस लढाई करण्याचा हिंदु लोकांचा मुळींच बेत नव्हता. जेव्हां हूण वगैरे टोळ्यांनीं हिंदुस्थान जिंकिलें त्यावेळेस बौध्य धर्माचे राजे राज्य करीत होते व तें राज्य हिंदुलोकांस आवडत नव्हतें ह्मणून ते वाढलें नाहींत. पूर्वींच्या महान ऋषींनीं स्मृति वगैरे जे महान ग्रंथ केले त्यांस हे राजे मान देत होते यांत संशय नाहीं तथापि बौध्य धर्माच्या राजांनीं हिंदुलोकांस सुख व्हावें ह्मणून पुष्कळ चांगलीं चांगलीं कामें केलीं. असें झालें तरी हिंदुलोक बौध्य धर्माच्या राजांशीं कधींही मिळाले नाहींत व या राज्याचा नाश होण्यासाठींच मात्र प्रयत्न केले. ज्या टोळ्यांनीं रोमन लोकांचें राज्य घेतलें त्यांच्याच अनुयायी टोळ्यांस हरकत न करितां बौध्य राज्याचा पाडाव करण्याकरितां हिंदुलोकांनीं बोलाविलें, मदत केली, व त्यांत तेही मिसळले. ह्मणून या भयंकर लोकांस कोणत्याही प्रकारचा अडथळा झाल्यावांचून इकडे रस्ता मिळाला. ह्मणूनच हूण, वेंडल व जाट हे हिंदु जाती पैकींच झाले. दुसऱ्या प्रसंगीं- गोंडल लोकांची ज्या वेळीं स्वारी आली त्या वेळींही हिंदु लोकांची अशीच स्थिति होती. पृथुराज व कनोज येथील त्याचे पुतणे यांमध्यें कलह लागल्यामुळें पठाणाचें वर्चस्व झालें होतें आणि ज्या वेळीं मोंगल आले त्या वेळीं त्यांस अडथळा करण्याचें त्यांच्या मनांत नव्हतें व मोंगलांचा जय होऊन पठाणांस नम्र दशेंत आणावें अशी त्यांची इच्छाच होती आणि मोंगल व हिंदु लोक यांचा जीव बहुतकरून एक मिळाला होता असें ह्मटलें तरी चालेल, परंतु ते मुसलमान गोमांस वगैरे खाणारे असल्यमुळें त्यांच्यांत व यांत जाति भिन्नता उत्पन्न झाली व यांमध्यें इतका निकट संबंध झाला होता कीं त्याजपासून एक नवी भाषा उत्पन्न झाली व आपसांत लग्न संबंधही होऊं लागले. यावरून आपणास स्पष्टपणें कळून येतें कीं, हिंदु लोक शूरत्वांत कमी होते असें नाहीं व त्यांच्या देशांतील राजे चांगले नसल्यामुळें त्यांनीं परशत्रूस हरकत न करतां उलटी मदतच केली.

इंग्रजांचें राज्य झाल्यापासून या लोकांस सुख झालें असें ह्मणतां येईल. रेलवेच्या सडका, पोष्ट खातें, तारायंत्र, मोठमोठे रस्ते, पूल, व विद्यावृद्धि यांकडे लक्ष दिलें असतां ब्रिटिश लोकांच्या राज्यास बहुतकरून सर्व लोक दुवाच देत असतील यांत संशय नाहीं, व या राज्यास जो एतद्देशी मनुष्य चांगलें ह्मणणार नाहीं तो मूर्ख ह्मटला पाहिजे सबब त्याणें चांगल्या इच्छेनें व याचें चांगलें होण्य करितां नरणें या गोष्टी नेटिवानें अवश्य कराव्या. आपल्या जिवापेक्षां एखादी गोष्ट मौल्यवान आहे असें वाटल्य वाचून कोणीही आपला जीव धोक्यांत घालणार नाहीं हें उघड आहे. आणि अशा प्रकारची ममता आपल्या प्रजेच्या मतांत येईल अशीं सरकारानेंही त्यांच्या फायद्याचीं कामें केलीं पाहिजेत. रशियन लोकांचें पुढें सरसावणें पाहून मि. डिझरायलीं यांनीं हिंदु लोकांच्या इच्छा पूर्ण कराव्या असें कबूल केलें आहे. हिंदुस्थानच्या ह्मणण्यावरूनच राणीनें बादशाहीण ही पदवी धारण केली आहे व जेव्हां हिंदुस्थानच्या कोना कोपऱ्यांत रशिया हें नांव ऐकूं येईल तेव्हां हिंदुलोकांचे सर्व अभिप्राय पूर्ण करावे असें यांनीं सांगितलें. हिंदुस्थानच्या राज्यकारभारांत हिंदुलोक असून यांच्या हातीं अधिकारही असावा एवढीच हिंदुलोकांची इच्छा दिसते. लेजिस्लेटिव कौन्सलमध्यें आमचे लोक असावेत. व मुख्य तीन शहरांस कौन्सिलर निवडण्याचा अधिकार आहे त्याचप्रमाणें दिल्ली, लखनौ, आग्रा, काशी, सूरत, पुणें वगैरे शहरें यांतील लोकांसही अधिकार असवा. कानडा व आस्त्रेलिया यांसही लेजिस्लेटिव कौन्सिलस आहेत. हिंदु लोकांनीं या प्रकरणाबद्दल अजून चांगल्या रीतीनें दडून अर्ज केला नाहीं. सर्व हिंदुस्थानानें याबद्दल याप्रसंगीं ओरड करावी. हिंदुस्थानची बादशाहीण हा राणीनें उघड किताब धारण केला आहे. देशबांधवहो, राणीस व पार्लमेन्ट सभेस याबद्दल विनंतीपूर्वक अर्ज करा ह्मणजे तुमची विनवणी बहुतकरून मान्य केली जाईल. आह्मांस या प्रकारची मोकळीक दिली असतां हें औदार्याचें काम होईल असें नाहीं, परंतु हें करणें सरकारास रास्तच आहे. जुलमी राज्याच्या न्यायानें पाहिलें असतां इंग्लंडास हिंदुस्थान अगदीं दुर्बलता आणणारें आहे. याच्या या हल्लींच्या राज्यरीतीवरून लोकांच्या मनांत जो गुप्त अग्नि आहे तो एखादे वेळेस भडकण्याचा संभव आहे व अशा प्रकारची मोकळीक दिली असतां इंग्लंडास हिंदुस्थानापासून विशेष बळकटी येईल. हिंदुस्थानास अशा प्रकारची मोकळीक मिळाली तर इंग्लिश अमंलदारास फार सुख व मोकळीक मिळणार आहे. तसें झाल्यावर हिंदुस्थानांत शांतता रहाण्याकरतां लहानापासून मोठ्यापर्यंत प्रत्येक मनुष्य ह्मटेलपण असें ह्मणतात कीं, इंग्रजी राज्य इतकें मजबूत आहे कीं, अशा कोणत्याही प्रसंगीं नेटिवाच्या मदतीची त्यास मुळींच गरज नाहीं. आह्मीही आशा करतों कीं तें आणखींही मजबूत होवोत. तरी विलायतेंतील लोकांप्रमाणें हिंदुस्थानच्या लोकांस कां मोकळीक देऊं नये हा प्रश्न रहातोच. या एवढ्या मोठ्या राष्ट्रावर जुलमी राज्यरीति चालू केल्यास त्याच्या योगानें इंग्रजी सत्तेस अपाय होण्याची भीति नाहीं काय? रोमन प्रजासत्ताक राज्याचा ऱ्हास कशामुळें झाला? सिसिली, एशिया, इजिप्त व स्पेन यांची जी दशा झाली व त्यांत जो रक्तस्राव झाला त्यास जुलमी राज्यरीतिच कारण झालेली नाहीं काय? तर हे इंग्रज हो, तुह्मी आह्मांस चांगल्या रीतीनें वागवून आह्मास स्वतंत्र करा आणि तुमचा आमचा स्नेह व प्रेम वाढून राज्यकर्त्या राणीचें कल्याण व हित चिंता. अ. द.

---

हें पत्र अकोलें एथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा.छा. प्र.

EG STERED NO. 7, 1870

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १०  अकोले रविवार ता० ११ माहे जून सन १८७६ इ०  अंक २४


## वऱ्हाडसमाचाराचीकिंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| सालअखेर | ७ |
| फुटकळ अंकास | ०४ |
| डांकहाशील | |
| वर्षाचे अगाऊ | [illegible] |
| " अखेर | [illegible] |

☞ नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी म्हणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| " दुसरे खेपेस | ०२ |



## जाहिराती
### नरसिंव्ह अवतार

हें आख्यान ओवीबद्ध करून ६ अध्याय केले आहेत. यांत प्रल्हादाचे चरित्र व त्यानीं केलेला दैत्यपुत्रास उपदेश फारच सुंदर व सुगम आहे. नरसिंव्ह अवतार झाल्या नंतर सर्व देव, गंधर्व, ऋषि आदिकरून यांनीं स्तुति केली ती शेवटील अध्यायांत लिहिली आहे. पाहिली जुलै सन १८७६ इसवीचे आंत पैसा पाठविणारास दर प्रतीस किंमत ६ आणे पडतील व नंतर ८ आणे व एक आणा पोष्ट हशील पडेल. कळावें तारीख ८ जून सन १८७६ इसवी.

चिंतामण मोरेश्वर आपटे
उमरावती


GREAT INDIAN PENIN SULA RAILWAY.

## ग्रेट इंडियन पेनिनसुला रेलवे.

NOTICE

## नोटिस

ALTRATION IN TRAIN SERVICE ON THE NIZAM STATE RAILWAY.

### निजाम स्टेट रेलवेवरील गाड्यांच्या येण्याजाण्याचे वेळेंत फेरफार.

सर्व लोकांस एतद्वारें सुचविण्यांत येतें कीं, रेसिडेंटाच्या हुकुमान्वयें निजाम स्टेट रेलवेवरील गाडी, जी हल्लीं शाहाबादेहून रात्रौ आठ वाजून पंचेचाळीस मिनिटांवर निघत असते ती त्या वेळेस न निघतां सकाळची दहा वाजतां निघत जाईल व हैदराबादेस त्याच दिवशीं संध्याकाळीं पांच वाजून तेहेतीस मिनिटांवर आणि सिकंदराबादेस सहा वाजून पंधरा मिनिटांवर पोहोंचत जाईल. त्याचप्रमाणे जी गाडी हल्लीं रात्रीस सिकंदराबादेहून दहा वाजतां व हैदराबादेहून दहा वाजून अडतीस मिनिटांवर निघत असते ती त्या वेळीं न निघतां सकाळीं त्या दोन स्टेशनांवरून अनुक्रमानें साडेसहा व सात वाजून पांच मिनिटांवर निघत जाईल व त्या दिवशीं संध्याकाळीं तीन वाजून पांच मिनिटांवर शाहाबादेस पोंचेल.

निजाम स्टेट रेलवेच्या गाड्यांच्या येण्या जाण्यांत हा फेरफार जून सन १८७६ ची दहावी तारीख रोज शानिवार या दिवसापासून सुरू होईल व पुढें दुसरी सूचना देण्यांत येई तोंपर्यंत तसाच चालू राहील.

स्टेट रेलवेचे टाइमबिल ( कालदर्शक पत्रक ) जें लवकरच प्रसिद्ध करण्यांत येईल. त्यांत या संबंधी दुसरी माहिती देण्यांत येईल.

**हेनरी कांडर,**
जनरल ट्राफिक म्यानेजर

मुंबई ता० ३० माहे मे
सन १८७६ इसवी.

## नोटिस।

राजे तारासिंग गरूडराव रहाणार राणीगहाण यांस फिदा अली अबदूल अली बोहोरा दुकान हिवरखेड यांजकडून नोटिस देण्यांत येतें कीं तुह्मावर आमचे खाते बाकी ४१९॥−॥ आजपावेतों घेणें निघालें त्यांत तुह्मी आह्मास ५० रुपयांची नोट दिली ती वजा केली व बाकीचे रुपये ३६९॥−॥ घेणें निघालें आहे तें नोटिस पावल्यापासून ११ दिवसांचे आंत आमचे रुपये चुकवून देणें नाहीं तर नोटिसीच्या खर्चासुद्धां दिवाणी कोर्टांत फिर्याद केली जाईल कळावें तारीख ४ माहे जून सन १८७६ इसवी.

( सही ) फिदा अली अबदुल अली
बोहोरा दस्तुर खुद्द

## नोटिस.

राजे चतरसिंग गरूडराय रहाणार राणीग्हान यांस नोटिस देणार फिदा अली अब्दुलअली बोहारी दुकान हिवरखेड याजकडून कळविलें जातें कीं, तुह्मावर आमचे खातेबाकी रुपये एकशसव्वीस सा दहा आणे १२६॥=॥ आहे त्यांत तुह्मी आह्मास २५ रुपये वसूल दिले ते [illegible] जाऊन बाकी घेणें निघाले ते रुपये [illegible]=॥ हा नोटिस पावल्यापासून [illegible]सांचे आंत आमचे रुपये चुकवून [illegible] कोर्टांत फिर्याद करून सर्व [illegible] कळावें. तारीख ४ माहे जून सन १८७६ इसवी.

( सही ) फिदाअली अबदुलअली
दस्तुर खुद्द.

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्याच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

### ब्राह्मण कर्माचा लोप व हिंदुस्थानच्या दैन्यास मूळ कारण असावें काय?

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस ——

वि. वि. आपल्या जन्मभूमीच्या हल्लींच्या स्थितीविषयीं जे दोन शब्द मनांत आले ते सेवेस सादर करितों त्यांस येत्या अंकीं जागा द्याल अशी आशा आहे.

ह्या हिंदुस्थान देशाचें वर्णन जितकें करावें तितकें थोडेंच आहे कारण त्याची कीर्ति फार पुरातन काळापासून सर्व पृथ्वीभर पसरलेली आहे व त्या कीर्तीचे उत्पादक किंवा प्रवर्तक ह्मटले ह्मणजे आमचे पूर्वज ऋषि हे होत. त्यांचें ज्ञान, त्यांचें कौशल्य, त्यांची विद्वत्ता व त्याचे पराक्रम हे अगदी अवर्णनीय असून या ब्रह्मांडांतील मूळवस्तूच्या अगदीं सान्निध जाऊन पोचले होते असें त्यांच्या कृतीवरून किंबहुना त्यांच्या प्रत्येक विषयांतील निपुणतेच्या लेखांवरूनही स्पष्ट होतें. तेच लेख आज कित्येक हजार वर्षांपूर्वीचे असतांही आमची श्रद्धा असल्यास तारणारे असून मोठ्या महत्वाच्या विच्यारांनीं भरलेले आहेत. कारण परद्वीपस्थ महान् महान् विद्वानही त्यांच्या विच्याराचे स्पष्टीकरण होण्याकरितां गिर्वाणभाषेच्या शाळा वगैरे कित्येक ठिकाणीं स्थापन करून झटत आहेत व आपला फायदा करून घेत आहेत. आतां ज्यांच्या श्रमाचा उपभोग त्यांच्या मागेंही कोट्यावधि लोक घेत आहेत अशी ज्यांची थोरवी त्यांनीं आपल्या मुलाबाळांकरितां आपल्या सामर्थ्याचें फळ मुलांबाळांनींही त्यांच्या सारखेच सुखांत दिवस काढावे या हेतूनें कांहींच राखून ठेविलें नसेल काय? असा सहज प्रश्न निघतो. व ठेविलें असेल तर हल्लींच्या काळीं आह्माला अशी दैन्यस्थिति कां प्राप्त झाली? पहा आमचे दिवस सुखांत जावे या हेतूनें त्यांनीं सोई, व्यवस्था व शोध नाना प्रकारें करून लिहून ठेविले आहेत इतकेंच नाहीं तर त्या त्या गोष्टी त्यांनीं आमच्या नित्यक्रमांतही आणवेल तितक्या अशा आणून ठेविल्या आहेत कीं त्याप्रमाणें आह्मी आपलें वर्तन ठेविलें तर आह्मास कलिकाळाचीही बाधा कधींही होणार नाहीं मग यःकश्चित मानवाच्या कृतीनें दुःख, दारिद्र्य, रोग, शोक, भय यांचे शिवाव त्याजपाशीं कोठून होणार? होणार नाहीं; पण त्याप्रमाणे आमचे हातून वर्तन झालें पाहिजेना तें होतें कसें? रोगग्रस्ताची मनीशा जशी त्या रोगाला उत्तेजन आणणाऱ्या पदार्थांवर होते त्याप्रमाणें आमची स्थिति होऊन आज्ञाधारकपणा सोडून अज्ञानपणानें अपकारक पदार्थांचा संग्रह आह्मी करूं लागलों तेणेंकरून आमची दिवसेंदिवस निकृष्ट दशा वाढत आहे व पुढें ती कोणत्या थरास जाईल याचाही नेम नाहीं. आतां हें वाचून वाचकांस सहजच इच्छा होईल कीं अशी व्यवस्था पूर्वजांनीं कोणती करून ठेविली कीं तिजप्रमाणें वर्तल्यास कळिकाळाचीही भीति नाहीं ह्मणून ती थोडी सांगतो.

ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र हे ४ वर्ण त्यांनीं स्थापित केले व त्यांचे धर्म नेमून दिले त्यांत शूद्रानें धान्यादिकाचें उत्पन्न करून तीन्ही वर्णांची सेवा करावी, वैश्यानें देशांतरास माल नेऊन देशांतराचा स्वदेशीं आणून पहिल्या व दुसऱ्या वर्णांची सेवा करावी, क्षत्रियानें गौब्राह्मणाचें संरक्षण व दुष्टाचें निर्दाळण करावें, आणि बाकी राहिलेल्या ब्राह्मण वर्णाकडे तर या सर्वांहून महत्वाचें असें काम दिलें होतें. कीं त्यांनीं तीन्ही वर्णांस उपदेश करावा, त्यांच्या उद्योगांत कोणतेंही अरिष्ट आलें तर त्याचें निवारणार्थ उपाय योजावे, नवीन शोध करून नाना प्रकारची सुधारणा करावी. खरेंच या व्यवस्थेप्रमाणें आपापलीं कामें जर वेळच्या वेळीं च्यारी वर्णांनीं बजाविलीं असतीं तर जी दशा आज आपण भोगतो ती कधींही प्राप्त झाली नसती.

शूद्र वर्णाचे लोक आपलें उत्पन्न वगैरे करण्याचें काम लावून दिलेल्या नियमास अनुसरून करून वरील तिन्ही वर्णांचे सेवेस हजर राहिले, वैश्य आपलें काम साधारण रीतीनें बजावीत आले व आहेत, क्षत्रियांनीं शत्रूचा सामना धरून ते कटून मेले व कित्येक ब्रह्मघोटाळ्यांत गर्क होऊन शत्रूच्या स्वाधीन झाले. पण ब्राह्मण वर्णावर जसें महत्वाचें काम सोंपलें होते तसें तें सिद्धीस गेलें नाहीं. पहा, राजकीयें सूत्रें त्यांचे स्वाधीन, धनुर्वेदादि चवदा विद्या त्यांच्या स्वाधीन व सर्व धंद्यास उपयोगी पडणाऱ्या ६४ कला यांच्या स्वाधीन होत्या. ह्मणून चऊ वर्णांचे गुरुत्व त्यांस प्राप्त झालें होतें. तेव्हां शेताचे पेरणीचे व कापणीचे काम करावयाचें तें गुरुजीस विचारून, विहीर खणावयाची ती गुरुजीस विच्यारून, घर बांधावयाचे तें गुरुजीस विच्यारून; फार तर काय आमचे जन्म झाल्यापासून मरेपर्यंत सर्व आयुष्य त्यांचेच स्वाधीन होतें. मग गुरुजीची स्थिति काय विच्यारता तिन्ही वर्णांपासून सेवाचाकरी यथेष्ट घेऊन पाठांतरांत व हव्यकव्यांत व व्रतोद्यापनांत निमग्न राहिले पण त्यानीं त्यांच्यावर भावी येणाऱ्या अरिष्टाचा व विपत्तेचा विच्यार मनांत आणला नाहीं अगर त्यांस संकटसमयीं पाहिजे होतें तसें सहाय दिलें नाहीं. याचा परिणाम [illegible] गल. वर्णांवर झाला तसाच पण [illegible] आपटून बुडा[illegible]र वि-

[illegible]र्की एक चांग

शेष घडून ही दैन्यदशा येऊन ठेपली
आहे. करितां तिचे निरसनार्थ गुरुजीनीं
आपलें काम पूर्ववत् संभाळून क्षत्रिय वर्णा
स व मोडकळीस आलेल्या इतर धंद्याचे
लोकांस चवदा विद्या व चवसष्ट कळा
यांची प्रेरणा करावी ह्मणजे पूर्व ऐश्वर्य
प्राप्त होण्याची आशा आहे; पण त्यांच्या
तरी श्रुति स्मृति त्यांस आतां सहाय देतात
कोठें ? तस्मात् हें सर्व ओझें आतां हा-
तकरूंच्याच माथ्यावर आहे. करितां त्यां
नीं तें उत्तम पद स्वीकारून आपलें शरीर
बळ, बुद्धिबळ व विद्याधनबल त्यांच्या योगा
नें देशबांधवांस त्यांचे कसबांत योग्य मदत
देऊन बंधमुक्त करावें व तसें करण्याविषयीं
परमेश्वरानीं त्यांस सहाय देऊन मनकामना
पूर्ण करावी अशी त्यास मनःपूर्वक प्रार्थना
आहे. विस्तारभयास्तव आतां पुरें करि
तों. कळावे. तारीख ५ जून १८७६ इ.

तुमचा दास
रामात्मज

---

### मागाहून आलेल्या नोटिसा

तनसुखदास घनःशामदास मारवाडी
दुकान माळेगाव तालुके अकोट यांस खा-
लीं सही काणार याजकडून नोटिस देण्यां
त येते कीं आमची दुकान तुमचेकडेस भा
ड्यानें असोन आतां ती दुकान आह्मास
तुमचेकडेस मुळींच ठेवणें नाहीं व याबद्द-
ल तुमचे मुनीम यास दुकान खाली कर-
ण्याविषयीं तीन च्यार वेळा सांगितलें अ-
सोन तुह्मी आमची दुकान खाली करून
देत नाहीं करितां ही नोटिस दिली आहे
तर नोटिस पावल्यापासून आठ दिवसांत
आमची दुकान खालीं करून द्यावी जर
तुह्मी सदरील मुदतींत दुकान खालीं न
कराल तर तुह्मास दरमहा रुपये ५ प्रमा-
णें दुकानचे भाडें द्यावें लागेल व नोटि-
सीचा खर्चही तुह्मास द्यावा लागेल. कळा
वे तारीख ८ माहे जून सन १८७६
इसवी.

( सही ) किसनदास कन्हायालाल
तारकसी रहाणार पेठ बा-
ळापुर दस्तुर गोपाळ
राघव

---

### नोटिस.

तीर्थस्वरूप महाराज रा. रा. गोपाळ
राव केशवराव देशपांडे कसबे अडगाव
यांस खालीं सही करणार याजकडून नो-
टिशीनें कळविलें जातें कीं प्रगणे अडगा
व येथें देशपांडेपणाचें वगैरे वतन जें तूर्त
सरकारांत तुमचे नावें चालत आहे त्यांत
निमेचा विभाग घेण्याचा माझा हक्क चाल
त आला असून फारच थोडे दिवस जाले
तुह्मी माझे विरुध्द कबजा करून अंश दे-
ण्याचें बंद केलें आणि माझे बापानें तुह्मा
स माझे हिश्शाची इनाम जमीन १-१
रुपयाचे तारणाकरितां लेख लिहून गहान
लाविली आहे यास्तव या नोटिसीनें कळ-
विलें जातें कीं नोटिस पावल्यापासून १५
दिवसांचे आंत लवाजम्याचे निमे हिश्याब
द्दल हिशेब [illegible] चालू सालापर्यंत निघ-
तील ते [illegible] [illegible] असलेली इनाम
जमीन [illegible] [illegible] दिल्यास या नोटिसी
चे खर्चासुध्धां दावा करून घेतलें जाईल.
कळावे तारिख ९ माहे जून सन १८७६
इसवी

( सही ) रावजी रामचंद्र देशपांडे
प्रगणे अडगाव दस्तुर खुद्द

---

## वऱ्हाडसमाचार

मिती ज्येष्ठ वद्य ५ शके १७९८.

---

## महाराणी विकटोरिया साहेबांचा नवीन किताब

सन १८५७ इसवींतील झालेलें बंड
मोडल्यावर आपली सत्ता किती आहे हें
दाखविण्याकरितां व ज्या मांडलिक राजा
नीं बंड मोडण्यांत चांगली मदत केली
त्यांस अधिक भरंवसा वाटण्याकरितां म-
हाराणी साहेबांनीं कंपनीच्या हातांतील रा
ज्य कारभार काढून घेऊन तो पुढें स्वतां
चालविणार अशा मजकुराचा एक जाहिर
नामा सर्व हिंदुस्थानभर प्रगट करून सर्व
संस्थानिकांस त्यांच्या दर्जाप्रमाणें व त्यां-
णीं दिलेल्या मदतीप्रमाणें सनदा व इत
र देणग्या दिल्या. त्या दिवसापासून तर
चालू सालाच्या आरंभापर्यंत आपलास्व
नांचा हिंदुस्थानाशीं विशेष संबंध आहे असें
कोणत्याही महत् कार्यानें दाखविलें नाहीं.
मध्यंतरीं त्यांणीं आपले द्वितीय चिरंजीव
ड्यूक आफ एडिंबरो यांस इकडे पाठवि
लें त्यावेळीं त्यांचा उत्तम प्रकारचा आद
र सत्कार येथें झाला तेणेंकरून हिंदुस्था
नांतील प्रजांच्या राजनिष्ठेविषयीं महारा-
णी साहेबाची खात्री होऊन मर्जी संतुष्ट
झाली असावी असें वाटतें कारण त्यांणीं
आपले वडील चिरंजीव प्रिन्स आफ वेल्स,
त्यांच्यामागें गादीचे मालक यांस गेल्या नवंब
र महिन्यांत आपले हिंदुस्थानांतील राज्य-
पहाण्यास पाठविलें. हे युवराज येथें आ
ल्यावर सर्व हिंदुस्थानांत जिकडे ते गेले
तिकडे त्यांस सर्व जातीचे लोकांनीं, संस्था
निकांनीं, मांडलिकराजांनीं, व सर्व अधि
काऱ्यांनीं उत्तम प्रकारचा सन्मान दिला
व आपली राजनिष्ठा अनेक प्रकारें दाख
विली. ही बातमी महाराणी साहेबांस कळ
तांच त्यांणीं हिंदुस्थानांतील प्रजांशीं आ-
पला विशेष संबंध राहून परस्परांत अधि
क सलगी व प्रेम वाढावें असा विचार म
नांत आणून हिंदुस्थानांतील लोकांस आ-
वडेल असा किताब आपण धारण करावा
असा त्यांणीं निश्चय केला. त्याप्रमाणें त्यांच
प्रधान मडळानें तसला किताब घेण्याबद्द-
ल कायदा पास करीत असतांना अनेक
वेळा दोन्ही सभांध्यें ( ह्मणजे कामन्स
आणि लार्ड या सभांत ) बोलूनही दाखवि
लें व नवीन किताब घेण्याचीं मुख्य प्रधा
ननीं दुसरीं पुष्कळ कारणें सांगितलीं त्यां
त महाराणी साहेबांनीं हिंदुस्थानच्या संबं
धानें एक किताब घ्यावा अशी हिंदुस्थानां
तील लोकांची इच्छा आहे व तो घेतला
असतां आपल्या तिकडील राज्यास अधि-
क बळकटी येणार असें ते बोलले. हा कि
ताबाचा कायदा पास होत असतां विला-
यतेंत अतिशय चर्चा झाली तिजवरून
असें अनुमान करितां येतें कीं तेथील पु-
ष्कळ लोकांस नवीन घेतलेला किताब अ
गदीं आवडला नाहीं, असें असतां प्रधान
मंडळीचें हल्लीं तेथें विशेष महत्व असल्या
मुळें कायदा पार्लमेंटांत पास होऊन त्या
अन्वयें राणी साहेबांनीं "एम्प्रेस आफ इंडि
या" हा किताब घेतल्याबद्दल गेल्या एप्रि
ल महिन्याच्या अखेरीस लंडन ग्याझिटम-
ध्यें जाहिरनामाही प्रसिद्ध झाला आहे. या
गोष्टीस एक महिना होऊन गेला तरी अ
द्याप तो जाहिरनामा सरकारतर्फे इकडे प्र
सिद्ध झाला नाहीं याचें कारण काय असे
ल तें असो. कित्येकांची अशी कल्पना आ
हे कीं "एम्प्रेस आफ इंडिया" हा किताब
घेतल्याबद्दल जो जाहिरनामा प्रसिद्ध व्हा
वयाचा तो मोठ्या इतमामानें व थाटानें
जागोजाग दरबार भरून व दीपोत्साह व
गैरे करून प्रसिद्ध करावयाचा आहे. आ
णि आमचेंही मत तसेंच व्हावें असें आहे.
कारण अशा महत गोष्टीचें पूर्ण स्वरूप म
नांत येऊन त्याबद्दल पूज्यबुद्धि रहाणें ह्म
टलें ह्मणजे त्याचे ऐश्वर्याप्रमाणें डामडौल-
ही असलाच पाहिजे. आतां हा किताब
घेण्याचा कायदा युवराज सुरक्षितपणें तेथें
जाऊन पोहोंचल्यावर व त्यांच्या तोंडून
हिंदुस्थानांतील लोकांचे राजनिष्टेची, त्यां
च्या योग्यतेची आणि त्यांच्या स्थितीची
वास्तवीक हकीकत ऐकून घेतल्यावर पास
करण्यास सुरवात झाली असती तर कित्ये
कांचे ह्मणणें आहे कीं 'एम्प्रेस आफ इंडि-
या' हा किताब घेण्यास महाराणी साहेबां
नीं व त्यांचे प्रधान मंडळीनीं किंचित ज
लदी केली ह्या दोषारोपास जागा राहि-
ली नसती- हा किताब घेतल्यानें जरी ह-
ल्लीं हिंदुस्थानचे रयतेचा प्रत्यक्ष फायदा
झाला नाहीं तरी एकंदरींत अखेरीस पुष्क
ळ हित होणार आहे यांत कांहीं संदह
नाहीं. हा कायदा तिकडे पास झाल्या न-
न्तर आमचे लोकांची कांहीं गडबड उ
डून गेली तिचा विचार केला ह्मणजे त्यांचे अ
धिर व उतावीळपणाविषयीं फारच आश्चर्य
वाटतें. प्रथमता ह्या किताबाबाबद सर्व लो
कांत व वर्तमानपत्रांतून टीका होऊं लाग
ली. सर्व लोक एक मताचे सनतात तेव्हां
अर्थातच ह्या किताबाबद्दलही मतभेद पड
ला. पण एकंदरीनें पहातां राणी साहेबां
नीं आपणा स्वतांस 'एम्प्रेस आफ इंडिया'
असें ह्मणवून घेतलें हें चांगलें केलें हेंच
१०० पैकीं ९५ चें मत आहे. राणी सा
हेबांचा जाहिरनामा विलायतेस प्रसिद्ध झा
ला नाहीं तोंच इकडे कित्येक [illegible] ठि-
काणचे लोकांनीं आनंद प्रद[illegible] पत्रें पा
ठविण्याची खटपट सुरू केली [illegible] वजानि-
क सभांकडून मानपत्रें त[illegible] कोर्टे [illegible] लाग
लीं. कित्येक मानपत्रांत सुखावह [illegible] दुःखं
कळविण्यास जागा मि[illegible] व कि
त्येकांत अमुकास अमुक [illegible] चीं, व
ऱ्हाड व सतारा हीं ज्यांचीं त्यांस परत
व्हावीं, हिंदुस्थानांतून पाठविलेले मुक्त्यार
पार्लमेंट सभेंत असावें, मोठमोठ्या हुद्यां-
च्या जागा नेटिवांस द्याव्या वगैरे अनेक
प्रकार दृष्टीस पडूं लागले. आमच्या इकडे
उमरावती एथील कांहीं पुढारी लोकांनीं
आनंदप्रदर्शक मानपत्र पाठविण्याचा वि
चार करण्याकरितां एक सभा केली. पुढें
तिची कार्य हकीकत झाली हे अद्याप क-
ळलें नाहीं.

महाराणी साहेबांनीं आपल्या देशाच्या
संबंधानें एक नवीन किताब घेतला ह्मणू-
न झालेला आनंद प्रदर्शित करण्याकरितां
जागोजाग मोठाल्या सभा होऊन आनंदो
त्साहभरीत पत्रें या विस्तीर्ण देशाचे स्वा
मिणीकडे पाठवावीं हें आपलें एक कर्तव्य
कर्मच आहे, पण त्याबद्दल सरकारचा जा
हिरनामा प्रसिद्ध होण्यापूर्वींच आमचे सर्व
लोकांनीं इतकी घाई कां केली याचें का-
रण आह्मास कांहीं समजलें नाहीं. कदा-
चित त्यांस अतिशय आल्हाद झाल्यामुळें
हा उतावीळपणा झाला असेल. तसेंच अ
सल्या आनंदसूचक मानपत्रांत लोकांची
दुःखें व मागणीं नमूद करणें हेंही केवळ
अप्रासंगिक आहे असें आह्मास दिसतें. हिं
दुस्थान देशाच्या संबंधानें नवीन किताब
घेतला ह्मणून तेथील लोकांस राणी साहे
बांनीं विशेष देणग्या व हक्क द्यावे हें सयु
क्तिक आहे खरें तरी त्याबद्दल विनंतीपत्रें
निराळींच जावीं हेंच आमचे देश बांधवा
नीं करावयाचें होतें. मनावर विरोध परि-
णाम उत्पन्न करणार दोन मजकूर एकाच
मानपत्रांत किंवा अर्जांत असल्यानें कांहीं
एक फायदा व्हावयाचा नाहीं असें आह्मा
स वाटतें.

---

## हिंदुस्थानच्या दारिद्र्या विषयीं दादाभाई नवरोजी यांचा निबंध व त्यांव र टीकाकार

मि० दादाभाई नवरोजी या नामांकि-
त व विद्वान् गृहस्थानां बारकाव्यानें शोध
करून हिंदुस्थानच्या [illegible] खर्डा
तयार करून, दर मनुष्यास २० रुपये
सालीना खर्चास रहातात असें थोडे दि-
वसांपूर्वीं मुंबई सारख्या इलाख्याच्या ठिका
णीं प्रसिद्धपणें सिद्ध करून दाखविलें.
त्यांवर स्वतांच्या खर्चाशीं ताडून पाहून
मुंबई ग्याझिटकर्त्यांनीं तक्रार काढिली कीं,
कसेंही केलें तरी २० रुपयांत १ मनुष्या
चा वर्षभर निर्वाह होणें अगदीं असंभव्य
आहे. व तें खरेंच. एका मनुष्याला किमा
नपक्ष ५ रुपये तरी वस्त्रप्रावर्णाला पाहिजे
त ते वजा करतां वर्षाला १५ रुपये उर
ले व त्याचा रोज सुमार ८ पै पडला त्यांत
निर्वाह होणें कठीणच. यावर अरुणोदया
चें ह्मणणें आहे कीं कसाऱ्याच्या वगैरे
घाटांत अगर अशाच प्रकारच्या पहाडी
प्रदेशांत रहाणाऱ्या लोकांस कंद मुळांवर
आपला निर्वाह करावा लागतो पण माहि-
नोगणती त्यांस अन्न मिळत नाहीं. हेंही

…रेंच कारण अशाप्रकारचे कोरकु, गोंड वगैरे लोक सातपुड्यांतही पुष्कळ आहेत. आतां सुपीक जमीनींतील धान्यादि सर्वोपयोगी पदार्थांचे उत्पन्न करण्याविषयीं रात्रंदिवस झटणारे जे माळी कुणबी त्यांच्या खर्चाचा व स्थितीचा विचार करूं—

शेतकरी अठराही धान्य उत्पन्न करितो पण जेठा मालाची रुचि त्यास कधीच माहित नसते. त्याचें खाद्य ह्मटलें ह्मणजे मुल मातेऱ्याच्या धान्याची भाकर व शेतबांधाऱ्यावर उगवलेली केना, कुंजर, आघाडा गोखरू, चिलधामोडा, तरोटा, व फार झालें तर आंबाड्याची भाजी. व केव्हां लाकाचें पिठलें. घरीं च्यार माणसें असताही दररोज कच्चें आतपाव तेल नेतांनां सायंकाळचे वेळीं शेतकऱ्यांपैकी हजारो दृष्टीस पडतात मग … त्यांत ते खातअसतील किती आणि दिव्यांस जाळीत असतील किती तें न जाणो. बरें अशा प्रकारें वर्तूनही कित्येक शेतकरी साऱ्याबद्दल सावकाराच्या ऋणांतून मुक्त होण्याकरितां १।९।२० रुपये सालानें दुसऱ्याची नोकरी करूं लागले. आतां, सावकाराचे तरी घरां तें द्रव्य सांचलें आहे काय? तेथें तरी ‘कागदीं मेळ आणि हातीं—’ या ह्मणीप्रमाणें आहे. साल अखेर अढावा २९ हजाराचा असतो पण ज्याकुळाकडे १०० रुपये येणें असतें त्याच्या घरांत ९ रुपयांचा माल नसतो एक धनको आणि दुसरा ऋणको असें नामधारी होऊन बसले खरे; पण पैसा नाहीं धनकोजवळ ना ऋणकोजवळ. माजी राज्यांतील दंग्या धोप्याचे वेळीं सर्व द्रव्य पृथ्वींत पुरून ठेविलें होतें तें प्रसिद्ध डाकेखोर हल्लीं नसल्या कारणानें वर काढिलें पण आतां तें कोणीकडे गेलें हें कळत नाहीं एकंदर दादाभाईनीं काढलेला ताळा बरोबर आहे व त्याइशेट कर्त्यांचेही अनुमान सर्वथैव खोटें नाहीं कारण त्याचें ह्मणणें इतकेंच आहे कीं, ‘२० रुपयांत एका मनुष्याचा एक वर्षभर चरितार्थ चालणार नाहीं’ व तो खरेंच चालत नाहीं. तो जर चालता तर आमचे पूर्वापार भांडार रिते होऊन ही दैन्यदशा कशी येती? आली नसती. पण त्या परकियाला हें अंतस्थ काय माहित? त्याचें अनुमान वरच्यावर!!!

---

## वऱ्हाड.

हैदराबादचे दिवाण सर सालर जंग हे तारीख १ … पारिस व लंडन शहरीं जाऊन पोहोचले त्यांची प्रकृती मागें पाय उखडल्यामुळें … पून सर जे अजूनही नादुरुस्तच आहे … र करीत आ … पेंनट हे नित्य औषधोपचार … सदरलंड … त्यांचे करितां डयूक बंगला भाड्यानें … पूर्वींच एक विस्तीर्ण … याला ४० खोल्या … ऊन ठेविला आहे … डें १४००० रुपये दोन २ महिन्यांचे भ… याचा करार आहे.

… स दुःख वाटतें कीं द…

लिहा… येथील नवाब नासिरुद्दवलाऽण हैदराबाद…चें बंधू नवाब समसामुद्दवला हे तारीख २ जून रोजीं मरण पावले असें टाइम्सवरून समजतें. त्यांच्या मरणाची हकीकत मोठी चमत्कारिक दिसते ती अशीः—

कोणी ह्मणतात वाखा होऊन त्यांचा देहांत झाला व कोणी ह्मणतात त्यांच्या निजावयाच्या खोलींत त्याचे मृत शरीर सांपडलें यावरून विषप्रयोगाचा ही संशय येतो पण त्यांस आंतून कडी घालून निजायाची. संवय होती. त्यांचे वय ८० वर्षांचें असतांही ३० वर्षांचें वयांचे मनुष्यांत जी शक्ति असते त्याहून त्यांचे अंगीं अधिक होती असें ह्मणतात.

---

येथील हैस्कूलचे हेड मास्तर मि० एटकिन साहेब हे या उन्हाळ्याच्या सुट्टींत सिमल्याची सफर करून तारीख ८ रोजीं येथें येऊन सुखरूप पोचले. सिमल्यास जाण्याचा हेतु त्याचा काय होता हें बरोबर कळलें नाहीं. येथें अशी वार्ता आहे कीं नवीन आलेले विद्वान गवरनर जनरल लार्ड लिटन साहेब यांची भेट घेऊन आपल्या विद्वत्तेमाफक एकादी जागा मागावयाची, त्यांत वऱ्हाडांतील ए. इन्स्पेक्टरची ही जागा रिकामी आहेच तेव्हां तिच्या आशेनें ते गेले असावेसें वाटतें. मात्र फलप्राप्ती कशी काय झाली हें अजून बाहेर पडलें नाहीं.

---

इकडील हैस्कूलें उष्णकाळचे सुटीमुळें तारीख २० एप्रिल पासून बंद होतीं तीं काल तारीख १० जूनपासून पूर्ववत सुरूं झालीं व हेडमास्तर, असिस्टंट मास्तर आपापल्या कामावर रुजू झाले.

---

बंगालचे लेफटिनेंट गव्हरनर सर रिचर्ड टेंपल साहेब जे हैदराबादेस सांडर्स साहेबांचे पूर्वीं रसिडेंट होते त्यांस हल्लीं बारोनेट हा किताब महाराणी साहेबांनीं दिल्याचें समजतें.

---

लिहावयास वाईट वाटतें तें कीं, इलिचपुरचे डिपुटी कमिशनर क्या० मेकंजी साहेब जिल्ह्यांतून फिरत असतां घोड्यावरून पडून त्यांचे आंगावर घोडा पडल्यामुळें त्यांस बरीच इजा झाल्याचें कळतें.

---

अडगाव येथील दिवाणी कोर्टास उष्ण काळामुळें २ महिन्यांची सुटी होती ह्मणून तेथील मुख्याधिकारी रा. रा. पुरुषोत्तमराव नारायणभट्ट एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर हे स्वदेशीं गेले होते ते तारीख ९ जून रोजीं येथें येऊन पोंचले व येथें एक दोन दिवस राहून १५ जूनचें कोर्ट सुरू करण्यास तिकडे जातील.

---

महमद यासीन खान यांस हैदराबादेस रेसिडन्सींत अध्याची नेमिलें आहे असें समजतें.

---

क्या० एच डी पी रेनिक साहेब उमरावतीचे असिस्टंट कमिशनर विलायतेस रजेवर गेले होते ते परत आले व त्याची नेमणूक इलिचपुरास झाली. व इलिचपुरचे असिस्टंट कमिशनर क्या० आर एस, थामसन यांस अकोल्यास नेमिलें.

---

अवरंगाबाद, बोलारम आणि हिंगोली या प्रत्येक ठिकाणीं एक एक स्त्री १९ रुपये महिन्याप्रमाणें देवी डाक्टरच्या जागेवर नेमिली गेली आहे देवी काढण्याचे कामी स्त्रियांची योजना केली हें गोशांतील लोकांत जाऊन मुलास वगैरे देवी काढण्यास ठीक झालें. याचप्रमाणें आमचे वऱ्हाडांतही गोशांत रहाणाऱ्या जातीं बऱ्याच आहेत करितां मे० आबट साहेब या प्रांतांत कांहीं ठिकाणीं तरी देवी काढणाऱ्या स्त्रिया नेमतील तर अधिक सोयवार होईल.

---

हवामान — गेल्या आठवड्यांत जी थोडी सौम्य हवा झाली होती ती बदलून पहिल्यासारखा उष्मा होऊं लागला आहे. बुधवारीं सायंकाळीं मोठा भयंकर वारा सुटून थोडा पाऊस पडला, तसाच शुक्रवारीं सकाळीं थोडा पाऊस पडला. काल सकाळीं आकाश अभ्रांनीं अच्छादित असल्यामुळें हवा रमणीय भासत होती पण १० वाजल्यावर ऊन कडक पडलें. असाच प्रकार पुढें चालल्यास हवा खराब होण्याचीही भीति आहे. शहरांत तापानें व खोकल्यानें तानीं मुलें बरींच आजारी आहेत.

---

इकडील कांहीं मास्तर लोक पदरची फी भरून मुलांचा नंबर ठेवित असत असा बोभाट डायरेक्टर साहेबांचे कानावर आल्यावरून सर्व मास्तर लोकांस आ साहेबांकडून सर्क्युलर गेलें तें असें: —

## जाहिरात.

वऱ्हाड प्रांतांतील सरकारी मराठी, हिंदुस्थानी, मराठीइंग्रजी आणि हिंदुस्थानी इंग्रजी शाळांवरील कित्येक मास्तर आपल्या शाळेंतील विद्यार्थ्यांची दरमहाची फी आपण भरतात; फी भरण्याचीं अनेक कारणें आहेत आणि तीं ज्यांचीं त्यांस माहित आहेत; परंतु ह्या वहिवाटीमुळें लोकास वाईट संवयी लागते, शाळांची स्थिति बिघडते, शिक्षकाची नालायकी दिसून येते, आणि सरकारची खोटी समजूत होते; ह्मणून ती बंद करण्याविषयीं मेहेरबान रेसिडेन्ट साहेब बहादूर यांणीं हुकूम फरमाविला आहे, तरी ह्यापुढें मास्तरांनीं आपल्या विद्यार्थ्यांकरितां आपल्या पदरची फी भरू नये. जो कोणी भरील तो आपलें काम करण्यास नालायक आहे असें समजलें जाईल, आणि त्यास योग्य शिक्षा केली जाईल.

---

आह्मांस लिहिण्यास फार संतोष वाटतो कीं इलिचपुर येथें लवाद कोर्ट स्थापन करण्याविषयीं बऱ्याच मंडळीचे मनांत येऊन उद्योग चालविला आहे. ईश्वर करो त्यांचा हेतु सिध्धीस जावो असें आह्मी इच्छितों. सदर्हू कोर्ट स्थापन झाल्यास इकडील रयतेस सुखावह होईल यांत संशय नाहीं. व. मि.

---

अकोल्याचे डे० इ० रावसाहेब श्रीराम भिकाजी जटार यांस इकडील एजुकेशनल इन्स्पेक्टर नेमण्याविषयीं गव्हर्नमेन्ट आफ इंडियाकडे रेसिडेंट साहेबांकडून लिहून गेल्याचें समजतें. आमचे सरकार यांसच कायम करो असें आह्मी मनापासून इच्छितों. व. मि.

---

## वर्तमानसार

बडोद्याचे श्रीमंत मल्हारराव गायकवाड यांची कन्या कमाबाई यांस पुत्र झाला त्यास पहाण्याकरितां नवीन गायकवाड श्री० सयाजीराव व सर टी माधवराव दिवाण हे गेले होते व दुसरे दिवशीं रेसिडेंट साहेब ही तेथें गेलें होते असें समजतें.

हिंदुस्थानचे माजी गव्हरनर जनरल लार्ड नार्थब्रूक साहेब हे विलायतेस जाऊन पोंचले व त्यांस राणी साहेबांनीं आर्लचा किताब दिला.

लखनौ येथें एका आयरिश मनुष्यानें आपणास मुसलमानी धर्म स्विकारण्याविषयीं परवानगी मिळावी ह्मणून तेथील माजिस्ट्राकडे अर्ज केला आहे. ज्ञा. च.

बंगाल्यांतील हिंदु लोकांस बालविवाहांची बंदी करण्याचे प्रयत्न एका एतद्देशीय गृहस्थानें चालविले आहेत.

विजयानगरचे महाराज फार आजारी आहेत असें समजतें.

काश्मीरचे महाराज येत्यासालीं मुंबईस जाणार आहेत व मद्रासेकडेही जाणार आहेत असें समजतें.

पंजाब नार्दर्न स्टेट रेलवेचे गाडीचे तिसरे क्लासाचे एका डब्यास, कामोकी आणि मुरडकी या दोन स्टेशनांचे दरम्यान आग लागली. उतारू लोकांनीं केलेली ओरड गाडीचे अधिकाऱ्यांस ऐकूं गेली नाहीं. शेवटीं गाडींतील उतारूनीं खालीं उड्या टाकिल्या. उड्या टाकल्यामुळें तीन उतारूंस फार इजा झाली आहे. बत्ती ठेवण्याचे जागेंत किंवा गाडीला वरतीं लांकडी दुहेरी छपर असतें त्यास विस्तवाची ठिणगी लागून आग लागली असें अनुमान आहे.

पेशावर येथें एका कंत्राटदाराचे घरांत एक गृहस्थ व त्याची स्त्री घराचें भाडें देऊन राहत असत. एक दिवशीं त्या घराचे एका खोलीचें छप्पर त्या घरांत राहणारे भाडेकऱ्याचे स्त्रीचे अंगावर पडून तिला बरीच दुखापत झाल्यामुळें त्याला घराचे मालकापासून ८,२०० रुपये भरून मिळाले. मालकानें अपील केलें आहे.

इंडियन मिररवरून कळतें कीं, अमेरिकेंत हेराल्ट येथें गंधकासारख्या पिवळ्या भुकणीचा वर्षाव झाला. असा वर्षाव कधीं कधीं फ्रान्स देशाचे दक्षिणभागांत होत असतो. हे सर्व देवदार वृक्षांचे जे पराग वाऱ्यानें उडून जातात ते रूपांतरानें येऊन पडतात असें ह्मणतात.

गेल्या मंगळवारीं रात्रीं मुंबईहून रत्नागिरीकडे जाणारे उतारूंचे एक गलबत अलिबागेजवळ खडकावर आपटून बुडालें. गलबतावरील मनुष्यापैकीं एक चांग

ला पोहणारा पोंहत पोंहत किनाऱ्यावर आला आणि त्यानें ही बातमी कलेक्टर यांस कळवितांच कलेक्टरांनीं लागलीच शोधाकरितां एक बोट पाठविली. त्याबोटीस चार मनुष्यें बुडत असलेलीं सांपडलीं त्यांस लागलीच इस्पितळांत पाठविलें. बुडालेल्या गलबतावर एकंदर वीस मनुष्यें होतीं असें मुंबईग्याझेटवरून समजतें.

गेल्या सोमवारीं एक मचवा कुलाब्यास आर्थर बंदराजवळ बुडाला त्यांत कापसाचे १० गठ्ठे होते पैकीं १० गठ्ठे सांपडले नाहींत.

म्हैसूरमध्यें १९,३९६ सुनी पथाचे मुसलमान व २३७ शिया पंथाचे आहेत. सुनी मुसलमानांच्या व शिया मुसलमानांच्या ६१९ मशिदी आहेत.

प्रिन्स आफ वेल्स यांणीं काश्मीरच्या महाराजांस फार उत्तम प्रतीचा एक घोडा पाठविला.

टाइम्स आफ इंडियाचा कराची एथील बातमीदार कळवितो का सिंध प्रांत पंजाबास जोडला अशी जी तार प्रसिद्ध झाली होती ती खरी नाहीं.

लार्ड नार्थब्रूक यांच्या स्मारककृत्याकरितां जो पैसा जमा होत आहे त्यास गायकवाड सरकारानें १०,००० रुपये व सर टी माधवराव यांनीं १,००० रु. दिले असें समजतें. सु. प.

टर्कीचे सुलतान अबदुल अजीज यांनीं आत्महत्या केली असें समजतें

एप्या नोवेंबरांत मद्रास येथें तेथील फाइन आर्ट्स सोसैटीच्या आश्रयानें उत्कृष्ट कलाकौशल्याचें प्रदर्शन होणार आहे.

भावनगरचे ठाकूर यांचे पुतणे रावळश्रीहरिसिंगजी रूपसिंगजी यांचें एका गिराशी सरदाराच्या कन्येशीं लग्न झालें.

फिलेडेल्फिया येथें जें आतां प्रदर्शन सुरू आहे त्यांत हिंदुस्थानांतील पुष्कळ पदार्थ प्रदर्शनार्थ गेले आहेत असें समजतें

म्हैसूरच्या महाराजांच्या तैनातीस हल्लीं ३ हजार मनुष्यें आहेत त्या पैकीं एक हजार मनुष्यें कमी करण्याचा विच्यार आहे.

हानोवरचा राजा व त्याचा वडील पुत्र यांस इंग्लिश फौजेचे अनुक्रमे जनरल व कर्नेल नेमिल्याविषयीं ग्याझेटांत प्रसिद्ध झालें आहे. ई. प्र.

प्रिन्सच्या हिंदुस्थानच्या प्रवासाकरतां ६,००,००० रुपये खर्च करण्याची मंजुरात झाली होती व त्या रकमेंत त्यांचा सर्व खर्च आटोपला असें ह्मणतात.

ता. २४ मे पर्यंतचा हवा रपोटः — अमदाबाद, कालरा सुरू आहे. खेडा, कालरा असून हवा उष्ण आहे. सूरत, कालरा सुरू आहे. भडोच, हवा वाईट असून एका तालुक्यांत कालरा सुरू आहे. खानदेश, पूर्वीप्रमाणेंच आहे. नाशीक, देवींचा रोग सुरू आहे. ठाणें, वसई तालुक्यांत कालरा असून वसई, पनवेल व भिंवंडी तालुक्यांत देवींचा उपद्रव आहे, ठाण्याचा कमी झाला. पुणें— हवा उष्ण, शहरांत तुरळक ताप आहे, जुन्नर तालुक्यांत थोडा गुरांचा रोग आहे. सोलापूर, कालरा सुरू आहे, सातारा, हवा चांगली आहे. बेळगाव, पाऊस लौकर पाहिजे आहे. जिल्हाभर कालरा सुरू असून आठवड्यांत २८० लोक मेले. धारवाड पाऊस पाहिजे, कालरा सुरू आहे. कानडा, हवा बरी, पाऊस पाहिजे, कालरा सुरू आहे. कलादगी, कालऱ्यानें २२६ लोक मेले. राजकोट, कालरा सुरू आहे. वडवान, कालरा चालू आहे, १२२ लागले व ९० मेले. एकंदरीनें पाहिलें तर कराची, ठाणें व नाशीक यांत देवींचा रोग चालू असून गुजराथ, काठेवाड, कानडा, आणि दक्षणमहाराष्ट्र प्रांत यांत पटकीचा वारा सुरू आहे असें दिसतें. पाऊस चहूंकडे पाहिजे आहे. अ. द.

---

## तुर्कस्थान.

तुर्कस्थानच्या राज्यांत विलक्षण प्रकारची अंदाधुंदी चालली आहे त्याविषयीं अलिकडे वारंवार मजकूर प्रसिध्ध होतात. राज्यांत अंदाधुंदी असली ह्मणजे अथवा राजाचें लक्ष राज्यकारभाराकडे नसलें ह्मणजे दोन प्रकारचे परिणाम होतात. राजा आपल्या राज्यपदास मुकतो अथवा त्याच्या प्रजेचें अनहित होतें. या गोष्टीचा अनुभव तुर्कस्थानच्या बादशहास नुकताच आला आहे. राज्यकारभाराकडे अथवा प्रजेच्या सुखाकडे लक्ष न देतां केवळ स्वतःच्या ऐष आरामांत निमग्न असणें याचा दुसरा परिणाम काय होणार? तुर्कस्थानचें राज्य अगदीं मोडण्याचे बेतास आलें असतां व राज्यांत बंड झालें असतांही बादशहा अबदुल अजीज यांचे डोळे उघडले नाहींत. प्रधानाजवळ पंचवीस लक्ष रुपये मागितले असतां त्यांनीं दिले नाहींत ह्मणून प्रधानास काढून टाकण्याची वगैरे तजवीज त्यानें योजिली होती. या आठवड्यांत तारायंत्रद्वारें अशी बातमी आली आहे कीं प्रधान लोकांनीं अबदुल अजीज यांस पदच्युत करून कैदेंत ठेविलें व त्यांच्या जागीं त्यांचे पुतणे मुराद एफेंडाय यांस गादीवर बसविलें. अबदुल अजीज यांस पदच्युत केल्यापासून तुर्कस्थानच्या राज्यास किती बळकटी येईल हें सांगवत नाहीं. परंतु सर्व उपाय हरले तेव्हां प्रधान मंडळीनीं हा शेवटचा उपाय केला असावा असें वाटतें. तुर्कस्थानचें राज्य मोडण्याची भीति आहे ती राज्यांत अव्यवस्था आहे ह्मणून आहे असें नाहीं. तुर्कस्थानचें मुख्य शहर व त्याच्या आसपासचा प्रदेश हस्तगत करण्याविषयीं रशिया सरकार आज कित्येक दिवसांपासून इलाज करीत आहे. याचप्रमाणें तुर्कस्थानच्या ताब्यांत जी ख्रिस्तधर्मी प्रजा आहे ती मुसलमानांच्या अमलातून सोडवावी असा युरोप खंडांतील कित्येक राजांचा हेतु आहे. असा प्रकार असल्यामुळें तुर्कस्थानचें राज्य समूळ नाशाप्रत पावण्याची मोठी भीति आहे. ही भीति हल्लीं इतकी वाढली कीं तुर्कस्थानावर केव्हां कोणचा प्रसंग येईल याचा नेम नाहीं. अशा प्रसंगीं राजाची अदलाबदल झाली आहे तेव्हां सदर्हू भीति जास्त होण्यास अधिक कारण झालें आहे. हल्लीं गादीवर बसलेले मुराद एफेंडाय हे पदच्युत केलेल्या अबदुल अजीज सुलतानाचे पुतणे आहेत. अबदुल अजीज यांचा हेतु असा होता कीं आपल्या पाठीमागें पुतण्यास राज्य न मिळतां आपल्या मुलास मिळावें. तुर्कस्थानच्या राजघराण्याच्या शिरस्त्याप्रमाणें राज्यपदावर मुराद एफेंडाय यांचा हक्क होता ह्मणून आपल्या मुलास गादी मिळण्याविषयीं माजी सुलतानानें अनेक तऱ्हेच्या खटपटी व उद्योग चालविले होते. अबदुल अजीज कैद कसे केले गेले व मुराद यांस गादी कशी प्राप्त झाली हा प्रकार आणखी कांहीं दिवसांनीं कळेल, परंतु टाईम्स आफ इंडिआचे लिहिण्यांत असें आहे कीं हर्जेगोविना व बोसनिआ या प्रांतांत जें बंड झालें आहे तें मोडण्याकरितां एकदम मोठी लढाई सुरू करावी व या कामास राज्यांतील सर्व मुसलमानांची मदत घ्यावी असें कित्येक सरदारांचें मत होतें, परंतु या मतास अबदुल अजीज यांनीं आपली मान्यता दिली नाहीं हें योग्य केलें. कारण सदर्हू सरदारांच्या मताप्रमाणें लढाई सुरू झाली असती तर तुर्कस्थानच्या राज्याचा नाश पुढें व्हावयाचा आहे तो आतांच झाला असता. टाईम्स आफ इंडिआच्या ह्मणण्याप्रमाणें निकराची लढाई करूं इच्छिणाऱ्या पक्षाचें वरचस्व झालें असेल तर युरोपखंडांत बहुधा कांहीं तरी मोठा घोंटाळा झाल्याखेरीज रहावयाचा नाहीं. नवीन झालेल्या सुलतानाच्या अंगीं राज्य कारभार चालविण्याची शक्ति आहे किंवा नाहीं हें समजत नाहीं, परंतु यांनीं युरोपखंडांतील पुष्कळ देश पाहिले आहेत. याखेरीज राज्यकारभार चालविण्यास हे कितपत लायक आहेत हें समजत नाहीं टाईम्स आफ इंडिआनें असें लिहिलें आहे कीं यांस राज्यकारण मुळींच समजत नाहीं.

याप्रमाणें हल्लीं तुर्कस्थानांत राजाची बदल झाल्यामुळें तूर्त घोंटाळा झाला आहे इकडे तुर्कस्थानच्या राज्याची वाटणी कशी कशी करावी याविषयीं युरोपखंडांतील राजांच्या मसलती सुरू आहेत, आस्त्रियाचे प्रधान कौंट आंद्रेसी यांनीं तुर्कस्थानच्या व्यवस्थेविषयीं ज्या कांहीं सूचना केल्या होत्या त्या तुर्कस्थानच्या माजी सुलतानास व युरोपांतील कित्येक राजांसही मान्य झाल्या होत्या परंतु रशिया सरकारास मान्य झाल्या नसाव्या असें दिसतें. कारण रशियाचे प्रधान कौंटगार्टचेकाफ यांनीं ज्या सुचना केल्या आहेत त्या मुख्यत्वें करून इंग्लंडास व तुर्की सरकारास मान्य झाल्या नाहींत. इंग्लंडचें ह्मणणें असें कीं, रशिआनें तूर्कस्थानाजवळ अयोग्य प्रकारचें मागणें केलें आहे याकरितां आह्मांस रशिआ सरकारच्या सूचना कबूल नाहींत. याचप्रमाणें तुर्की सरकारानेंही रशिआ सरकारच्या सूचना स्पष्टपणें आमान्य केल्या आहेत. याप्रमाणें रशिआ सरकार व तुर्की आणि इतर सरकारें यांची समजूत पडत नाहीं. अशीं चिन्हें दिसू लागल्याबरोबर इंग्लंड, जर्मनी वगैरे सरकारांनीं आपलीं लढाऊ तारवें बेसिकाबे येथें पाठविल्या. याप्रमाणें लढाईचीं चिन्हें दिसू लागलीं आहेत व एकादी मोठी लढाई केव्हां सुरू होईल याचा नेम नाहीं ह्मणून इंग्लंडांत हल्लीं इतकी अस्वस्थता झाली आहे कीं तेथील विमेवाल्या कंपन्या परदेशीं जाणाऱ्या मालावर लढाईचे प्रसंगीं ज्या दराचें कमिशन मागतात त्या दराचें मागूं लागल्या आहेत. विलायतेंतील सर्व लोकांचें लक्ष तुर्कस्थानाकडेस लागलें आहे. इंग्लंड हून आणखी तीन तारवें तुर्कस्थानाकडेस रवाना झाल्याबद्दल तारीख २९ माहे मेची विलायतेहून तार आली आहे.

सदर्हूप्रमाणें तुर्कस्थानची व त्यासंबंधानें युरोपांतील इतर राज्यांची हकीकत आहे. तुर्कस्थानांतील राज्याची व्यवस्था नीट असती तर हल्लींचा प्रसंग येण्याचें कांहीं कारण नव्हतें "व्हानिटी फेर" नामक पत्रानें असें लिहिलें आहे कीं तुर्कस्थानचें राज्य हल्लींच्या मोडकळीच्या स्थितीस आलें आहे तथापि तें [ राज्य कारभार योग्यरीतीनें चालविला असतां ] अजूनही रशिआ सरकारास भारी आहे. कारण लढाईच्या प्रसंगीं उपयोग होण्या सारख्या नाक्याच्या जागा तुर्कस्थानच्या स्वाधीन आहेत, तुर्कस्थानास रशिआचीं समुद्र मार्गानें, कांहीं नाक्याचीं ठिकाणें धरून बसलें असतां मुळींच भीति नाहीं. जमीनीवरीलही असाच प्रकार आहे. रशिआची फौज तुर्कस्थानच्या राज्यांतच येण्यास कांहीं डोंगरांतील मार्गानें आल्याखेरीज रस्ता नाहीं. हे रस्ते धरून बसलें असतां तुर्कस्थानांत यावयास प्रयास पडणार आहेत. सदरहू पत्रकर्त्यांनें दुसरें असें लिहिलें आहे कीं रशिआच्या राज्यास दरिद्री करण्याची किल्ली तुर्कस्थानच्या स्वाधीन आहे. रशिआचा व्यापार तुर्कस्थानच्या ताब्यांतील समुद्राच्या हद्दींतून चालतो. हा मार्ग बंद केला असतां अति अल्प काळांत रशिआच्या राज्यास तुर्कस्थानास दरिद्री करतां येणार आहे, परंतु ह्या सर्व सोई असून उपयोग काय? राज्य करण्याचा युरोपखंडांतील लोकांचा कित्ता एशिआ खंडांतील एकाही देशांतील लोकांनीं घेतला नाहीं. एशिआ खंडांतील लोकांचीं स्वदेशांतील व परदेशांतील राज्यें त्यांच्या हातून जात चाललीं आहेत व याचप्रमाणें तुर्कस्थानचीं व्यवस्था होण्याचा काल अति निकट आल्याचीं लक्षणें दिसत आहेत.

आतां सदर्हू मजकूर पदच्युत झालेले सुलतान अबदूल अजीज यांच्याविषयीं थोडीशी हकीकत लिहून पुरा करतों. तुर्कस्थानचे सुलतान अबदुल अजीज हे तारीख ९ फेब्रुवारी सन १८३० रोजीं जन्मले. यांचे वडील बंधू सुलतान अबदुल मजीद हे तारीख २५ जून सन १८६१ त मरण पावल्यावर अबदुल अजीज हे गादीवर बसले. देशांस लष्करी खात्याचा शोक होता त्यास त्यांनीं कोट्यावधि रुपये कर्ज काढून त्या पैकीं कांहीं बराच भाग आरमार व लष्करी खात्याकडे खर्च केला व बाकीचा पैसा चैनेंत उडविला. माजी सुलतान हे सन १८६७ त फ्रान्स इग्लंड वगैरे देश पहाण्याकरितां गेले होते.

ने ओ.

---

हे पत्र अकोले एथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा.खा. प.

REGISTERED NO. 7, 1870

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १० अकोले रविवार ता० १८ माहे जून सन १८७६ इ० अंक २५

## वऱ्हाडसमाचाराचीकिंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| सालअखेर | ७ |
| फुटकळ अंकास | ०४ |
| डांकहाशील | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| " अखेर | २ |

☞ नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरु केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| " दुसरे खेपेस | ०२ |

## जाहिराती

## पाण्यांत पडून अचेतन झालेल्या मनुष्यास सावध करण्याचे उपाय.

( दिपुटी कमिशनर साहेबांनीं विच्यारल्यावरून सिव्हिल सर्जन यांनीं कळविलेले. )

१ पाण्यांत पडलेल्या मनुष्यास बाहेर काढतांच एकदम डाकटर यास बोलवावे, काळी कांबळी व सुके कपडे मागवावे; परंतु ठिकाणचे ठिकाणींच सदर्हू मनुष्यास उघड्या हवेंत उपच्यार करण्यास लागावे. सोसाट्याचा वारा नसेल तर त्याचें तोंड, मान आणि छाती ही सर्व हवा लागेल अशा रीतीनें ठेवावी व मान आणि छाती यांवरील हलके कपडे काढून टाकावे.

२. पाण्यांत पडलेले मनुष्यास जमीनीवर तोंड खालीं करून निजवावे व त्याचा एक हात कपाळाचे खालीं ठेवावा अशा स्थितींत त्यास ठेविलें असतां सर्व पाणी तोंडावाटां पडेल नंतर तोंडआणि नाकपुड्या पुसून काढाव्या.

३. जर पुढें श्वासोश्वास चांगल्या रीतीनें होऊं लागला तर उष्णता येण्याकरितां खालीं लिहिलेला उपाय करावा. जर श्वासोश्वास थोडथोडा होतो किंवा होतच नाहीं अथवा मुळींच बंद जाला तर-

४. त्या मनुष्यास तजविजीनें हळूंच फिरवून एका कुशीवर निजवून डोक्याखालीं आधार द्यावा. व जवळ असल्यास नाकपुड्यांत नस, हरणाचें शिंग किंवा सुवासिक क्षार घालून त्यास चेतना आणण्याची तजवीज करावी; अथवा त्याचे घशांत पंख घालून खाजल्यापरखें करावें. छाती आणि तोंड यांस चोळून उष्णता आणावी, छातीवर व तोंडावर थंड पाणी शिंपावें. अगर एकदा थंड व एकदा ऊन पाणी पाळीपाळीनें शिंपावें जर त्यापासून कांहीं उपयोग दिसला नाहीं तर एक पळाचा विलंब न करितां तत्काळ

५ सपाट जमीनीवर त्यास उताने निजवावे, पायाकडील भाग थोडासा उंच होईल असें करावें, किंवा एक लहानसी उशी अगर घडी केलेलें वस्त्र खांद्याचे मध्दें हाडाखालीं घालून त्याजवर त्याचे डोकें ठेवावे.

६ त्या मनुष्याची जीभ बाहेर काढून ओठाचे बाहेर राहील अशी तजवीज ठेवावी जिभेच्या वरून व हनवटीच्या खालून एक लवचीक पट्टी बांधली असतां हें काम सहज होणार आहे- किंवा जीभ व हनवटी दोरी किंवा फीतेच्या तुकड्यानें बांधून टाकावें किंवा खालचें दाभाड उचललें असतां दाताचे योगानें जीभ बाहेर राहील.

७ त्या मनुष्याचे डोक्याजवळ उभे राहून त्याच्या कोपराच्या वरील दंडाचे भाग धरून दोन्ही हात हळूच व तजविजीनें डोक्याचे वर ओढावे व दोन सेकंद पर्यंत वरल्या बाजूस हात तानलेले असूं द्यावे. नंतर त्याचे हात खालीं करावे व हळूच छातीच्या दोन्ही बाजूंस २ संकड पर्यंत दाबावे.

सदरील प्रकार आळी पाळीनें, विच्यारानें व पाठलागानें आपोआप श्वासोश्वास येईपर्यंत एक मिनिटात सुमारें १५ वेळ करावे. नंतर लवकरच श्वासोश्वास होण्याकरितां चालू उपाय करण्याचा बंद ठेवावा उष्णता आणि रक्त मिश्रण ह्मणजे रक्त शरीरांत चालू करण्याचा प्रकार चालू द्यावा.

८ स्वाभावीक श्वासोश्वासाचा प्रकार चालू झाला ह्मणजे रुमाल व लोकरीचे कपडे घेऊन अंगाचे अवयव चांगला दाब घालून खालपासून वर चोळावें. हा प्रकार कांबळीचे आंतून किंवा सुके वस्त्र घालून त्यावरून चालवावा उष्ण लोहकरीचे कापड तापलेल्या कुप्या, विटा, पक्काशय, काखा, पोटऱ्या ह्मणजे मांड्या व तळपाय यांच्या मधील भाग यांस लाऊन शरीरास उष्णता उत्पन्न करावी. श्वासोश्वास चालू झाल्यानंतर जर त्यास घरीं नेलें तर ज्या खोलींत त्यास ठेविलें असेल तेथें वारा खुला चालू येण्याची खबरदारी ठेविली पाहिजे.

९. प्राण आल्यावर चमचाभर उष्ण पाणी त्यास द्यावे. नंतर गिळण्याचें सामर्थ्य आलें ह्मणजे थोड थोडी दारू, किंवा ब्रांडी, गरम पाणी अथवा काफी द्यावी, अंथरुणवर निजून त्यास झोप लागेल अशी तजवीज ठेवावी, त्याला श्वासोश्वास करतांना ज्यानें श्रम होतात ते मोहरीच्या मोठ्या पट्या छाती जवळ व खांद्याच्या खालच्या बाजूस लागल्या असतां होणार नाहींत.

१०. वर सांगितलेले उपाय कांहीं तासपर्यंत चालविले पाहिजेत. पुष्कळ वेळपर्यंत प्राण न आला तर मनुष्य वाचत नाहीं ही जी समजूत आहे ती खोटी आहे. पुष्कळ तासपर्यंत एकसारखा प्रयत्न केल्यानें पुष्कळ लोक वाचले आहेत.

### सावधगिरी.

जर तो मनुष्य एकाद्या खोलींत ठेविला असेल तर त्याजपाशीं पुष्कळ मनुष्याची गर्दी असूं नये.

त्या मनुष्याशीं वाईट रीतीनें वर्तणूक ठेवूं नये. व त्याची जीभ नीट बंदोबस्तानें बांधल्याशिवाय त्यास उताना करूं नये.

कोणत्याही प्रसंगीं पाय धरून उचलूं नये, डाक्टर यानें सांगितल्यावाचून त्यास कोणत्याही कारणावाचून उष्ण पाण्यानें स्नान घालूं नये.

---

## GREAT INDIAN PENINSULA RAILWAY.

## ग्रेट इंडियन पेनिनूसुला रेलवे.

### NOTICE

### नोटिस

### ALTRATION IN TRAIN SERVICE ON THE NIZAM STATE RAILWAY.

### निजाम स्टेट रेलवेवरील गाड्यांच्या येण्याजाण्याचे वेळेंत फेरफार.

सर्व लोकांस एतद्वारें सुचविण्यांत येतें कीं, रेसिडेंटाच्या हुकुमान्वयें निजाम स्टेट रेलवेवरील गाडी, जी हल्लीं शाहाबादेहून रात्रौं आठ वाजून पंचेचाळीस मिनिटांवर निघत असते ती त्या वेळेस न निघतां सकाळची दहा वाजतां निघत जाईल व हैदराबादेस त्याच दिवशीं संध्याकाळीं पांच वाजून तेहेतीस मिनिटांवर आणि सिकंदराबादेस सहा वाजून पंधरा मिनिटांवर पोहोंचत जाईल. त्याचप्रमाणें जी गाडी हल्लीं रात्रीस सिकंदराबादेहून दहा वाजतां व हैदराबादेहून दहा वाजून अडतीस मिनिटांवर निघत असते ती त्या वेळीं न निघतां सकाळीं त्या दोन स्टेशनांवरून अनुक्रमानें साडेसहा व सात वाजून पांच मिनिटांवर निघत जाईल व त्याच दिवशीं संध्याकाळीं तीन वाजून पांच मिनिटांवर शाहाबादेस पोंचेल.

निजाम स्टट रेलवेच्या गाड्यांच्या येण्याजाण्यांत हा फेरफार जून सन १८७६ ची दहावी तारीख रोज शनिवार या दिवसापासून सुरू होईल व पुढें दुसरी सूचना देण्यांत येई तोंपर्यंत तसाच चालू राहील.

स्टेट रेलवेचें टाईमबिल ( कालदर्शक पत्रक ) नें लवकरच प्रसिद्ध करण्यांत येईल. त्यांत या संबंधी दुसरी माहिती देण्यांत येईल.

**हेनरी कांडर,**

जनरल ट्राफिक म्यानेजर

मुंबई ता० ३० माहे मे सन १८७६ इसवी.

---

## जाहिरखबर.

सर्वांस देण्यांत येते कीं आह्मी आपले दुकानावर मारुती सोनाजी गुमास्ता होता त्यास मुख्त्यारपत्र दिलें होतें तें रद्द केलें आहे. व त्यास आह्मी आपले कामावरून काढलें आहे तरी त्यानीं आमचे नावे सही केली किंवा कोणापासून कांहीं आमचे नावावर घेतलें तर आह्मास कबूल नाहीं. अळावे तारीख १५ माहे जून सन १८७६ इसवी.

[ सही ] पन्नाबाई दस्तुर खुद.

---

## नोटिसा

गोविंद कृष्ण कुळकर्णी रहाणार मौजे दुरगड प्रमणे मानें यांस मीर मनवर अली जहागिरदार रहाणार मौजे ब्रह्मी याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुमची नोटिस वऱ्हाडसमाचार पत्रद्वारें पावली व तिचा जबाब असा दिला जातो कीं तुह्मास मागील गुमास्ता गंगारामपंत याचा हिशेब एक महिन्यांत समजाऊन देण्याकरितां एक महिना १२ रुपये द्यावे व पुढें दरमहा ८ रुपये प्रमाणें द्यावे असें करारानें ठेविलें याप्रमाणें सर्व तुमचे पगाराचा पैसा दिला कांहीं एक आह्मास देणें नाहीं उलट तुह्मी आह्मास हिशेब समजाऊन दिला नाहीं याकरितां नोटिस पावल्यापासून ८ दिवसांत आमचा हिशेब समजाऊन द्यावा न दिल्यास फिर्यादी करून हिशेब समजाऊन घेऊन नुकसान भरून घेतलें जाईल कळावे तारीख १० माहे जून सन १८७६ इसवी.

( सही ) मनवर अली जहागिरदार

दस्तुर खुद

---

### नोटिस.

सदाशिव अडनाव वसू रहाणार अणवी तालुके अकोले यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुमचे कडेस आमचे खातेबाकी बद्दल रुपये १०३०२ शिवाय साडेबारा महिन्याचें व्याज रुपये २५०१२०६ येकूण रुपये १२८०१४०६ येकशें आठ्ठावीस रुपये चवदा आणे सहा पै घेणें निघत आहे ते तुह्मी देत नाहीं. व तुह्मास मागितले असतां देऊं दिला करीत आहां व तुह्मी एक वेळ सांगळूद मुक्कामीं येऊन करार केला कीं मी तुह्मास पंधरा दिवसानीं रुपये २५ तुह्मास अणून देतों ह्मणून सांगून गेला त्यामला आज सुमार तीन हप्ते होत आले तर तुह्मी आपल्या रुपयाचा उलगडा करीत नाहीं करितां मुद्दाम ही नोटिस तुह्मास दिली आहे तर या नोटिसीचे तारखेपासून १५ दिवसांचे आंत सर्व मुद्दल व्याज व नोटिशीस जो खर्च झाला आहे त्याजसुध्दां अणून द्यावे. नाहीं. तर

आम्ही तुह्मावर दिवाणींत फिर्याद करून सर्व रुपये भरून घेऊं हें. तुह्मास कळावें तारीख १४ माहे जून सन १८७६ इसवी मुक्काम अकोलें

[ सही ] नारायण वल्लद गिरमाजी
काकड रहाणार सांगळूद
दस्तुर खुद्द

## नोटिस.

गंगा मर्द गणपती मळसणे रहाणार मौजे शेळद तालुके बाळापुर इजा गणपती वल्लद तुकाराम मळसणे रहाणार मौजे देगाव तालुके बाळापुर याजकडून नोटिशीचे उत्तर देण्यांत येतें कीं, तूं तारीख २८ मेच्या वऱ्हाडसमाचारांत नोटिस दिली ती अगदी खोटी आहे. तूं माझी गंधर्वाची बायको आहेस व माझे घरीं चांगली नांदली आहेस व मीही तुला चांगल्या रीतीनें वागवीत आलों. कोणत्या गोष्टीची तुला अडचण पडूं दिली नाहीं. असें असतां तूं मला न विच्यारितां माहेरीं निघून गेली व तेथें जारकर्मीं रत झाली. आणि तुला गर्भ राहिला त्या शरमेनें तूं माझे घरीं पुन्हा आली नाहींस. व आतां शेळदांत तूं जातीबाहेर आहेस. वाईट लोकांचे नादीं लागून तूं मला नोटिस दिली ह्मणून या उत्तरानें मी इतकेंच कळवितों कीं तूं माझे घरून गेली तेव्हां सोन्याची नथ एक तोळ्याची व बाळ्या एक तोळ्याच्या, चांदीच्या कोपरवाळ्या ३० तोळ्याच्या, चांदीचे कडे ३२ तोळ्याचें व ५० रुपये नगदी मी आजारी असतां तूं चोरून घेऊन गेलीस तो सर्व ऐवज ही नोटिस पावल्यापासून १५ दिवसांत घेऊन यावा मग मी तुला शुध्द वगैरे करून तुझ्या मुलाचें लग्नही करीन. व तुला वागवीन अगर तुला दुसरा नवराच करावयाचा असेल तरी सर्व ऐवज माझे घरीं आणून पावता कर ह्मणजे मी तुला फारकती देण्यास तयार आहे. पण सदरहू ऐवज मुदतींत जर तूं दाखल केला नाहींस तर तुला जन्मभर फारकती मिळणार नाहीं अगर इतके करूनही तूं गंधर्व केलें तर तुजवर व तुझ्या होणाऱ्या गंधर्वाच्या नवऱ्यावर फौजदारी करून ऐवजही भरून घेतला जाईल. कळावें तारीख १६ माहे जून सन १८७६ इसवी मुक्काम अकोलें

[ सही ] गणपती वल्लद तुकाराम
पाटील मळसणे देगाव निशाणी खुद्द हातची.

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस—

वि. वि. सार्वजनिक दुःखाचा परिहार सरकारचे कानावर तीं दुःखें घालून करण्याची शक्ति हल्लींचे काळीं वर्तमानपत्राचे अंगीं आहे, जाणून पुढील च्यार ओळी आपणाकडे पाठविल्या आहेत त्यांचा स्वीकार करून त्या आपल्या येत्या अंकीं प्रसिध्द कराव्या.

वऱ्हाडांत इंग्रजी अम्मल होऊन आज वीस बावीस वर्षे झालीं. या पूर्वी येथें निजाम सरकारचें ( मोगलाई ) राज्य होतें. त्यावेळीं इकडे पोलिसचा बंदोबस्त फारच कमी होता; ह्मणजे चोऱ्या, रस्तेलुटी, व खून झाल्याच्या खबरा बहुतकरून प्रत्यहीं कानावर येत असत, व त्या तेव्हांचे काळीं अनिवार्य गोष्टी, आहेत असा लोकांचा समज असल्यामुळें त्याबद्दल कोणी तादृश खेद किंवा काळजी करित नसत. परंतु अलीकडे वीस वर्षांत इंग्रज सरकारचा दयाळु व इभ्रतीचा अंमल झाल्यापासून, पूर्वी मालमत्ता व जीवित यांचे संबंधानें लोकांनीं जीं दुःखें भोगिलीं तीं अनिवार्य नसून केवळ राज्यकर्त्यांनें त्यांजकडे लक्ष पुरविलें असतां सहज दूर होण्याजोगीं आहेत अशी त्यांची लवकरच खात्री झाली. याचें कारण हल्लींचे सरकारांनीं पोलिसखातें पूर्वीपेक्षां फार वाढाविलें व त्याजवर अनेक कामदार देखरेख करण्यास नेमून प्रजेचें वित्त व प्राण हे संभाळण्याचें जें सरकारचें ब्रीद तें निरंतर रक्षण होण्याचा उपाय केला. मनुष्याची अशी स्थिति आहे कीं ज्या कोणत्या गोष्टीचा पुष्कळ काळपर्यंत तो सुखोपभोग घेतो ती गोष्ट जर त्यास मिळेनाशी झाली तर त्यास त्यापासून अत्यंत खेद होतो. या नियमास अनुसरून अलीकडे एक दोन वर्षांत उमरावती शहरांत झालेल्या पुष्कळ चोऱ्या आणि त्यां संबंधानें येथील पोलिसची हुशारी व चौकशी करण्याची शैली यांपासून कित्येक इमानी व अब्रूदार लोकांस व्यर्थ त्रास होऊन चोऱ्या तर मुळींच पत्यांत आल्या नाहींत हें पाहून फार तर काय सांगूं पण रडें कोसळतें! आणि अशा राक्षसरूपी विचारशून्य पोलिसाच्या हातून आपले अब्रूचें कसें संरक्षण होईल याबद्दल लोक चिंताग्रस्त झाले आहेत. हर हर! पोलिस ठेवण्यांत आमचे दयाळु इंग्रज सरकारचा हेतु काय, व त्याचा परिणाम काय अघोर! या वरील मजकुराचें यथार्थत्व सरकारचे नजरेस पूर्णपणें यावें ह्मणून येथें ज्या मोठमोठ्या चोऱ्या झाल्या त्यांच्या एकंदर रकमा व मालकांचीं नावें देतों.

१३०० रा. अबाजी नारायण चिखलीकर.
३००० रा. बळवंत सदाशिव
६०० रा. वामन अनंतभोळे ओव्हरसियर
७००० शेठ गणेशदास बुलाखीदास
५०० रा. कन्हयालाल सराफ
१४००० रा. विठोबा पिंपळगावकर

सदरहू चोऱ्यांपैकीं एकाही चोरीचा तपास लागला नसून, त्या आरंभापासून ज्या पोलिस कामदारांच्या कारकीर्दींत झाल्या त्याच्या बदल्या न होतां तेच लोक अद्यापि येथें आहेत यावरून ते वरिष्ठ अधिकाऱ्याचे अत्यंत लाडके असावेत असें वाटतें. १०।१२ वर्षांमागें खानदेश व नाशिक जिल्ह्यांत असाच चोऱ्यांचा सपाटा एकसारखा उडाला. त्या वेळीं त्या जिल्ह्यांच निष्पक्षपाती व दक्ष सुपरइंटेंडेंट यांनीं एकदम पुष्कळ चीफ कानस्टेबलांच्या बदल्या केल्या व खेरीज असा हुकूम फर्माविला कीं ज्या पोलिस कामदारांचें काम त्या चोऱ्यांचा पत्ता लावण्याचें होतें त्यांचा पगार चोरी पत्त्यांत येईपर्यंत द्यावयाचा नाहीं. हें तिखट अंजन जेव्हां कित्येक चीफ कान्स्टेबलांच्या डोळ्यांत शिरलें तेव्हां त्यांची धुंदी जाऊन लागलेंच बारीक नजरेनें चौकशी करण्याचें त्यांस भाग पडलें यामुळें बहुतेक चोऱ्यांचा तावडतोब तपास लागला. अशी खुबी इकडे एक वेळ केली ह्मणजे झालें. एथील पोलिसचें गाऱ्हाणें एथेंच संपत नाहीं. चोरी झाल्याची खबर त्याजकडे आली ह्मणजे माग वगैरे पाहून फार बारकाईनें व गुप्तपणें तिची चौकशी करण्याचा मार्ग सोडून देऊन येथील पोलिस चोरीची खोटी बातमी उठली ह्मणून सांगतात. व कधीं चोरी झालेल्या मालकाचे मुनीम, गुमास्ते किंवा मुखत्यार यांचा वहीम धरून त्यांचा ४ दिवस व्यर्थ छळवाद करितात. असें केल्यानें अर्थांत खऱ्या चोराची दहशत कमी होऊन हळू हळू मालाची लांबवालांबव करण्यास त्यास सवड सांपडते. मुनीम किंवा गुमास्ते यांच्या प्रामाणीकपणाची पुष्कळ वर्षे कसोटी घेऊन नंतर सावकार लोक दुकान स्वतंत्रपणें त्यांचे स्वाधीन करितात अशी वहिवाट आहे. यामुळें एखादे दुकानीं चोरी झाली असतां ती तेथील मुनिमानें किंवा गुमास्त्यानें केली हें ह्मणणें किती गैरशिस्त व वेडगळ आहे!

सदरील झालेल्या चोऱ्या प्रसिद्ध ठिकाणीं होऊन पत्यांत न आल्यामुळें या दुष्ट कार्मीं पोलिसचे लोक तर सहाय नसतीलना? अशी लोकांस शंका उत्पन्न होऊं लागली आहे. याप्रमाणें येथील पोलिसची हकीकत आपणास कळविली ती मेहेरबान रेसिडेंट साहेब बहादूर यांचे कानावर जाऊन लोकांचे क्लेश दूर होतील अशी आशा आहे. उमरावती ता० १५ जून १८७६. सत्यवक्ता.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस—

वि. वि. दोन ओळी आपणाकडे पाठविल्या त्या येत्या अंकीं प्रसिद्ध कराव्या.

ताजनापेठेंत तारीख १२ जून रोजीं जेठमल नावाचा मारवाडी साप चावून मरण पावला त्याची हकीकत अशी:—

प्रातःकाळीं गाईची धार काढण्याकरितां सर्कीं घालावयाची ह्मणून गर्जींत हात घातला त्याबरोबरच सापानें दंश केला पण कांहीं किडा मुंगी असेल असें समजून त्यानें पुन्हा हात घातला तेव्हां तर त्यानें असा जबर डास घेतला कीं त्याला दुसऱ्या हातानें काढून तो साप फेकावा लागला. असें झाल्याबरोबर सदर्हू मारवाड्यानें एक लहान धोंडा आपल्या डोक्यावर घेऊन अर्बाडी ( सापाचें विष मंत्रानें उतरणारे ) लोकांचे घरीं गेला. तेथें त्यास धुंबंध वगैरे देऊन अर्बाड्यांनीं सावध ठेविलें व कित्येकांचे ह्मणण्यावरून लागलींच उतरण्याचा घाट मांडला. विष उतरण्याची व धुंबंध देण्याची कृति अगदीं निराळी आहे व उतरण्याची कृति न करितां नुसत्या धुंबंधानेंही वर्षानुवर्षे मनुष्य वांचतो पण लोकांत अशी गप्प आहे कीं, त्याचा धुंबंध तोडनाच कोणी जादुगिरानीं मंत्राची आड काठी घातली व तेणेंकरून त्यास अशी जबर लहर (मूर्छा )आली कीं, तो अर्बाडीच्या कोणत्याही उपायांनीं सावध न होतां मरण पावला. त्यानंतरही कोणी हिंदुस्थानी, बंगाली असे अर्बाडी पुन्हा जिवंत करण्याच्या फुशारक्या मारित होते पण मयताचें पोट वगैरे फुगूं लागल्यामुळें घरच्या मनुष्यांस भरवसा वाटला नाहीं. व मेल्यावर पांच दोर, याप्रमाणें प्रेताची खराबी करणें आवडलें नाहीं ह्मणून सुमार तीन वाजतां त्याची मूठमाती केली.

गेल्या मानवोरीपासून आजपर्यंत सुमार ९ मनुष्यांस एथें सर्पदंश झाला पैकीं ४ तत्काळ मरण पावले व ५ असामी वाचले. ह्या निमेहून अधिक संख्या बचावली ती ओबडधोबड अरबाड्याचेच हातून. यावरून पहातां सर्पदंशावर वऱ्हाडांतही उपाय आहे व तो बऱ्याच अंशीं लागूही पडतो; पण ती विद्या अडाणी लोकांचे हातीं पडल्याकारणानें व्हावा तसा उपयोग होत नाहीं करितां सुशिक्षित लोक इकडे लक्ष्य देतील तर मोठाच कार्यभाग होण्यासारखा आहे मात्र त्यांचा विश्वास जडला पाहिजे व तोच अलीकडे उडाला आहे. कळावें ता. १५ जून १८७६ इ.

तुमचा दास रामात्मज.

# वऱ्हाडसमाचार

मिती ज्येष्ठ वद्य ११ शके १७९८.

**वेदार्थयत्न.** या आठवड्यांत या पुस्तकाचा दुसरा अंक आला. त्यांत 'अग्निमीळे' या अध्यायाचे १३ वर्ग आले आहेत. व पहिल्यांत १६ मिळून २९ वर्ग प्रसिद्ध झाले. मराठी अर्थाखालीं टिपा लिहिण्यांत ग्रंथकर्ते फार परिश्रम व शोध करितात असें दिसून येतें. कित्येक थोर लोकांनीं व लायब्रऱ्यांनींही या पुस्तकास आश्रय दिला आहे त्याप्रमाणें राहिलेल्या लोकांकडूनही मिळावा असें आम्ही इच्छितों. मि० मार्टिन व मि० साम्युअल हेही दोन परजातीय नवीन गृहस्थ या पुस्तकास या खेपेस वर्गणीदार झाले आहेत.

## मारल्याबद्दल साहेबांस शिक्षा

मुंबईच्या म्युनिसिप्यालिटीचे कमिशनर मि. पेडर यांनीं मि. शामराव पांडुरंग यांस त्यानें आपलें ह्मणणें ऐकलें नाहीं ह्मणून एक ठोसा मारिला त्याबद्दल मि. शामराव यांनीं रा. ब. नाना मोरोजी माजी खेट यांकडे फिर्याद केली होती तींतील आरोप मि० पेडर यांवर शाबीद होऊन त्यांस १० रुपये दंड झाला. मुंबई सारख्या ठिकाणीं युरोपियन अंमलदार अशी दांडगाई करितात तेव्हां बाहेर प्रांतीं कसें होत असेल याचा विच्यार सर्वांनीं पहावा. शामराव हे मोठे गृहस्थ होते ह्मणून त्यांनीं कोर्टापर्यंत मजल मेली पण गरीब गुरिबास असे मार बहुत वेळा सहन करून निमूट बसावें लागत असेल. प्रथम चौकशीचे दिवशीं पेडर साहेब कोर्टांत हजरही झाले

म्हणते ही केवळ तब्बेतीची गोष्ट दिसते व ही मुंबईसही निभली ह्मणून आश्चर्य वाटतें. अस्तु. रा. ब. नाना मोरोजी यांनीं निस्पृहतेनें व धैर्यानें योग्य इनसाफ केला व गुन्हेगार साहेब ह्मणून त्यांस सोडून न देतां दंड केला याबद्दल आह्मी नाना मोरोजी यांची स्तुती करितों.

याचप्रमाणें एका मुसलमानाला ऐस कंपनींतील मि. हाबलेट नावाच्या साहेबानें चाबकानें मारिलें त्याबद्दल त्यांस मि० कुपर साहेब माजिस्त्रेट यांनीं ५ रुपये दंड केला.

## त्रिंबकेश्वर.

इकडून मुंबईकडे जाण्याच्या वाटेवर त्रिंबकेश्वर हें देवस्थान आहे. देवळालीच्या स्टेशनावर उतरून नाशकावरून त्रिंबकेश्वरास जावें. १० कोस लांब आहे. सडक बांधली आहे तिची दुरुस्ती नाहीं. बहुत लोक देवदर्शनास जातात. त्यामुळें घोडीं, बैलगाड्या, व घोड्याचे चे कमानीचे तांगे भाड्याचे पुष्कळ मिळतात. या तांग्यावर नाशकाहून ३ तासांत मनुष्य त्रिंबकेश्वरास जातें. अनोळखी मनुष्यासही तेथें बिऱ्हाडाची अडचण बिलकूल पडत नाहीं. कारण तेथील भिक्षुक लोक कोस कोस पुढें येऊन आमचे घरीं चला ह्मणून पाहिजे त्यास आग्रह करीत असतात. त्यांत त्यांची पोळी पिकते. त्रिंबकेश्वर गाव लहान ह्मणजे सुमार ६०० घरांचा आहे तरी त्यांत ब्राह्मणांचीं सुमारें ४०० घरें आहेत व तीं बहुतेक भिक्षुकांचीं. त्या गावांत गृहस्थ दोन आहेत एक संस्थानचे कारभारी जोगळेकर व दुसरे एक सावकार काळे या शिवाय बाकी सर्व भिक्षुक. त्यांचा चरितार्थ यजमानकृत्यावर चालतो- मागें बाराही महिने त्यांस चांगली पैदास्त असे पण देवळालीस रेल्वे स्टेशन झाल्यापासून बहुत यात्रेकरू फक्त नाशकास जाऊन यात्रा करून परततात वाटेच्या अवघडपणामुळें त्रिंबकास जात नाहींत त्यामुळें त्रिंबकच्या भिक्षुकांचें उत्पन्न कमी झालें आहे. तरी सिंव्हस्थांत बहुत यात्रा त्रिंबकेश्वरीं जाते व त्यांच्यावर भिक्षुकांचें कित्येक वर्षांचें उपजीवन होतें. अस्तु.

श्री त्रिंबकेश्वराचें देवालय पेशव्यांनीं बांधिलेलें आहे. तें फार सुंदर व भव्य आहे त्यास सुमार दहा बारा लक्ष रुपये खर्च आला असेल. देवास नेमणूकही पेशव्याकडूनच सालीना १२००० रुपयांची आहे. देवास त्रिकाळ पूजा व नैवेद्य आहे. एक नैवेद्य ह्मणजे ५ गुरवांचें अन्न असतें व तेंही उत्तम शाल्योदन. क्षिप्रा, साकर, तूप, च्यार भाज्या व हे सर्व जिन्नस रुप्याच्या मोठमोठाल्या वाडग्यांतून असतात. शेरभर भाताची एकच मोठी मूद असते. तीन वेळचे तीन पुजारी ब्राह्मण वेगवेगळे आहेत व त्यांस तीन तीनशें रुपयांच्या नेमणुका आहेत. शिवाय भोजन देवाकडे. देवाकडे दोन्ही वेळां मिळून पाच पन्नास पात्र होतें. शिपाई, कारकून, चौघडा, हरदास, गवयी, पुराणीक वगैरे नेमणुका रामविलासाप्रमाणें फार उत्तम आहेत. देव शाळुंकेखाली खळग्यांत पंच लिंगात्मक स्वयंभू आहे. पूजेच्या वेळीं त्याचें दर्शन होतें. व एरवी त्यावर चांदीचा मुखवटा असतो. प्रति सोमवारीं तिसरे प्रहरीं देव पालखींतून मिरवत मिरवत कुशावर्त तीर्थावर स्नानास जातात. तो समारंभ मोठाच होतो. तो मिरवणुकीचा मुखवटा पंचमुखी असून सुवर्णाचा आहे त्याची कारागिरी फार उत्तम आहे- पेशव्यांचे वेळीं तो पुण्यास घडलेला आहे असें ह्मणतात. त्याचें वजन सुमार सवाशे ह्मणजे ५०० तोळे आहे. किंमत सुमार नऊ दहा हजार रुपये होईल. कुशावर्तावर देवाची पूजा यथासांग होते. पूजेचें सर्व सामान गंगाळ, घागर, समयी सुद्धां चांदीचें आहे. विंचुरकर संस्थानिक श्री० रा. रघुनाथराव आणा साहेब यांनीं त्रिंबकेश्वरच्या देवालयाला सोन्याचा कळस लाविला व ध्वजा उभारिली व एक रथ दिला. त्याचा उत्साह ही मोठा होत असतो.

गंगाद्वार ह्मणून जें स्थान तें डोंगरावर आहे तेथें जाण्यास ७०० पायऱ्या चढाव्या लागतात. व जेथें सांबानीं जटा आपटल्या व मूळ गंगा निघाली तें ठिकाण फार उंच व अवघड ठिकाणीं आहे तेथें फारसें कोणी जात नाहीं.

त्रिंबकेश्वराची वस्ती लहान आहे तरी वस्तीच्या मानाला पुरून उरत अशा पाण्याच्या सोयी तेथें केल्या आहेत. पाण्याचीं तळीं दोन दोन तीन तीनलाख रुपये खर्चून बांधलेलीं पाच सहा आहेत. पण त्यांवर चांगली पैरवी नसल्यामुळें पाणी फारच खराब असतें. व त्याचा उपयोग लोक करीत असल्यामुळें नारू ह्मणून रोगाची तेथें फारच समृद्धि आहे. तेथें वर्षांत कोणाला १०१५ नारू झाले नाहींत असा मनुष्य सापडणें कचित. नारू सर्व भागीं ह्मणजे डोळ्याला, तोंडाला, व आंतल्या जिभेला देखील होतात. हा तेथील लोकांस मोठा ताप आहे. तेथें म्युनिसिप्यालिटी आहे ती किंवा नाशिकचे कलेक्टर साहेब या विषयीं कांहीं काळजी घेतात असें कोणाच्या सांगण्यांत येत नाहीं.

एथें श्री निवृत्तिनाथाची समाधि आहे. तेंही स्थान विख्यात आहे.

## हिंदुस्थानांतील ज्ञातिभेद

( लिहून आलेला मजकूर )

मुळारंभीं एका प्रकृति पुरुषापासूनच मानव प्राण्याची उत्पत्ति झाली आहे व तो विस्तार जसजसा वाढत गेला तसतसा त्यांत भेद झाला. प्रथम जे प्रकृति पुरुष उत्पन्न झाले ते एकाच आई बापाचीं लेंकरें होतीं पण तींच वधु वरें होऊन त्यांजपासून जीं भावंडें झालीं तींच वधुवरें झालीं आहेत. ठीकच आहे. जेव्हां वराला वधु व वधूला वर सर्व जगांत दुर्मिळच होते- तेव्हां तें गैरशिस्त ह्मणवत नाहीं. असें होता होतां पुढें कोणाला ६० कन्या, कोणाला सप्त पुत्र कोणाला शत पुत्र अशी उत्पत्ति झाली व एकानें १, एकानें २, एकानें १३ स्त्रियापर्यंत पाणीग्रहण केलें व येणेंकरून मानवी संख्या बरीच वाढली. तेव्हां त्यांस नियम वगैरे करणें जरूर पडलें—प्रथम ४ वर्ण धंद्यास अनुसरून केले त्या वेळेस अन्नव्यवहारास तर काय पण शरीरसंबंधही श्रेष्ठांनें कनिष्ठ वर्णाच्या वधूशीं करावा असा नियम होता. पुढें विस्तार अधिक झाल्यावर १८ वर्ण निरानिराळे झाले हेही पृथक पृथक धंद्यावरूनच झाले असावेत. हल्लींच्या काळीं पहातां पहिल्या च्यार वर्णांचा तर कोठें मागमूसही आढळत नाहीं ( कर्मा धर्मास अनुसरून) पण अनंत वर्ण व अनंत उपवर्ण उपस्थित होऊन जो कर्मघोटाळा झाला आहे त्याचें सविस्तर वर्णन करणें बरेंच अवघड आहे.

एका ब्राह्मण वर्णाचा विच्यार करीत बसलें ह्मणजे प्रथम वेदावरून ४ प्रकार. जसे ऋग्वेदी, यजुर्वेदी सामवेदी, व आथर्वणवेदी, शिवाय आपस्तंब वगैरे शाखेचे प्रकार निराळे. या अथवा हिंदुस्थानाच्या निरनिराळ्या भागांत राहिल्यानें त्यांच्या त्यांच्यात शरीरसंबंध तर कोठून अन्नव्यवहारही चालू नाहीं. पंचगौड व पंचद्राविड हे घेतले तर हेही वर लिहिल्याप्रमाणें वेदास अनुसरूनच आहेत. पण मध्य हिंदुस्थानांतील ब्राह्मण गौड ह्मणवितात व दक्षिण हिंदुस्थानांतील द्राविड ह्मणवितात. हे एकमेकाचे घरीं अन्नव्यवहार करतात व पंचगौडही पक्की रसयी ह्मणजे तळलेलें अन्न एकमेकाचें हातचें खातात पण शरीरसंबंध कोणत्याही दोन प्रकारांत होत नाहीं. तसेच पंचगौड व पंचद्रवीड याचींही गोत्रें वगैरे जरी मिळतात तरी कोणत्याही प्रकारें एकमेकांत संबंध नाहीं.

देशा देशास व प्रांता प्रांतास रहाणारे १ बंगाली, २ तेलंगी, ३ कर्नाटकी ४, गुंजराथी ४, नार्मदी ५, माळवी ६, पंनावी ७, सेणवी ८, यांत २,३,७, याच्याशीं मात्र अन्नव्यवहार सुरू आहे शिवाय विधवेपासून उत्पन्न झालेले गोळक, चरक, आति शूद्रीपासून झालेले कलंकी असे अनियमीत प्रकार होतात.

( पुढें चालू )

## वऱ्हाड.

दिवाण साहेब सर सालारजंग बहादूर यांचा पाय अजून दुरुस्त झाला नाहीं हें ऐकून आह्मास वाईट वाटतें. औषधोपचार सुरू आहे.

पांच चार दिवसांत पाऊस पडला नाहीं. काल संध्याकाळी मात्र ८ वाजतां एक सर आली. ऊष्मा मनस्वी होतो. मृगनक्षत्र उद्यां संपणार तरी अद्याप ठिक ठिकाणीं चांगले पाऊस पडून थंडावा आला नाहीं ही मोठी दिलगिरीची गोष्ट आहे. नाशक, खानदेश या जिल्ह्यांत हा सारा एकच पाऊस पडला. आतां तरी लवकर दोन तीन चांगले पाऊस पडतील तर हवा थंड होउन शेतीचीं कामे सुरू होतील.

रा. रा नारायण विनायक साठे बी. ए. मागें इकडे डिपुटी इन्स्पेक्टर होते. त्यांस धुळ्य.च्या हायस्कूलावर तेथील हेड मास्तर आजारी असल्यामुळें त्यांच्या ३०० रुपयांच्या जागेवर नेमिलें आहे. व त्यांनीं जाऊन आपले कामाचा चार्ज घेतला.

उमरावतीस चोऱ्या फार होऊं लागल्या व पोलिसाकडून त्यांचा पत्ता लागत नाहीं. यामुळें लोक फार हवालदील झाले आहेत. व त्या बाबदींतील तेथील लोकांचे दुःखोद्गार आजचे आमचे अंकांत 'सत्यवक्ता' या सहीच्या पत्रांत प्रसिद्ध झाले आहेत त्यांकडे त्या खात्याच्या मुख्यानीं व रेसिडेंट साहेबांनीं कृपाळुपणें लक्ष्य द्यावें. सहा चोऱ्यांची सुमार २६४०० सवीस हजार च्यारशें रुपयांची बेरीज आहे. इतकी रयतेची रकम चोरापोरी जाऊन आमच्या हुशार पोलिसास तिळभरही सुगावा न लागावा हें खरेंच त्या खात्यास मोठें काळिमा आणणारें आहे. आपल्या नेमलेल्या कामांत आपण हुशारी न दाखविणें व तें काम बरोबर न बजावेणें याहून दुसरें लांछन कोणतें ?

निजाम सरकारानीं तारीख ४ रोजीं आपला दरबार भरविला होता त्यांत सर्व अमीर उमराव व सर रिचर्ड मीड साहेब रेसिडेंट होते. लार्ड लिटन साहेबयास राणी साहेबानीं हिंदुस्थानचे गवरनर जनरल नेमले याबद्दलचा खलीता आलेला वाचला गेला त्यावेळेस मे. मीड साहेबांनीं उर्दू भाषेंत १ तासपर्यंत उत्तम भाषण केलें. आमचे रेसिडेंट साहेब एतद्देशीय भाषेंत इतके वक्तृत्व करण्याजोगे हुशार आहेत हें पाहून आह्मास संतोष होतो.

वऱ्हाडच्या विद्याखात्याकडे, दरमहा शाळापत्रक या नावाचें मासिकपुस्तक निघावयाचें तें, पुढील आठवड्यांत निघून वाटलें जाईल असें समजतें.

रा. रा. परशराम सखाराम माजि क्लार्क आफ धि कोर्ट यांचे चौकशीचें कमिशन उमरावतीस तारीख ७ व ८ रोजीं बसले होतें. कांहीं कागदपत्र पाहिले. व त्यावेळचे नाजराची साक्ष होण्यावर तारीख-२८ पर्यंत काम तकूब राहिलें असें समजतें.

क्या० थामसन साहेब असिस्टंट कमिशनर यांची इलिचपुराहून अकोल्यास नेमणूक झाली आहे परंतु ते अद्याप आले नाहींत.

मि० अबदुल हक्क एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर बहुत दिवस रजेवर होते ते शेवटीं गेल्या आठवड्यांत परत येऊन आपले कामावर रुजू होण्याकरितां वाशिमास गेले.

यवतमाळचे डिपुटी एजुकेशनल इन्स्पेक्टर रा. रा. बजाबा रामचंद्र प्रधान च्यार दिवसांची रजा घेऊन येथें आले आहेत ते आज परत जातील.

जुडिशियल कमिशनर साहेब चिखलदऱ्यास आहेत ते या आठवड्यांत सेशना करितां इलिचपुरास येतील. त्यासाठीं रा. वासुदेव सदाशिव पिसोळकर त्यांचे हेड क्लार्क इलिचपुरास गेले आहेत. इलिचपुरानंतर उमरावतीसही सेशनची तारीख नेमली आहे.

## वर्तमानसार

सुरत येथें स्वदेशी मालाचा खप व्हावा व तो लोकांनीं वापरावा या हेतूनें एक मंडळी स्थापली आहे. या मंडळीचे सभ्या चारशें भागीदार आहेत.

गोरी नीति— कलकत्यास जॉन फ्रेन्नर नांवाच्या गोऱ्यानें आपल्या आठ वर्षांच्या मुलीवर जबरीचा संभोग करण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणाची ता० २९ मे रोजीं थोडी चौकशी होऊन ता० ९ जून रोजीं डाक्टरची साक्ष झाली. तींत त्यांनीं मुलीस इजा झाल्याचें सांगितलें. खटला सेशनकमिटी झाला आहे. बहुधा सुरेच्या मध्यस्तीनें हे बुवा पार पडतील असें दिसतें. कारण झालेल्या चौकशींत तें कृत्य करितांना ते दारू प्यालेले होते अशी पुष्कळांची साक्ष आहे.

मद्रास रेलवेच्या नैर्ऋत्य शाखेच्या बाजूस वेण्यंबदी आणि अंबूर या स्टेशनाच्या दरम्यान ताडांची मोठी झाडी आहे तींत वीज पडून ४७ झाडें होरपळलीं. कित्येक शेंड्यापासून बुडापर्यंत कर्तरीनें कापल्याप्रमाणें चिरून गेलीं होतीं. काय विजेचा जोर हा!

फिलाडेल्फिया येथें जें प्रदर्शन होणार आहे त्यांत हिंदुस्थानांतील जिन्नस विलायतेच्या कमिशनरमार्फत जाणार आहेत ते लंडन येथील इंडियन म्युझियममधून जातील. यांत हिंदुस्थानांतील तऱ्हतऱ्हेचीं धान्यें व इतर पदार्थ, हिंदुस्थानांतील लोकांचे खाण्यांत जे जे पदार्थ येतात तें, सर्व हिंदुस्थानांतील, सर्व प्रकारचें रेशिम हीं चांगलीं रचून पुड्यांत बांधून त्यांवर कोठून आलीं हें दाखविण्याकरितां त्यावर टिकिटा बसविल्या आहेत. दुसऱ्या पेट्यांत हिंदुस्थानांत केलेलीं हत्यारें, मातीचीं भांडीं, निरनिराळ्या धातूंचे पदार्थ, चंदनाच्या पेट्या पंखे दगडोकाम, दिल्लीचीं कशिदा काढलेलीं वस्त्रें, हस्तीदंती काम वगैरे मुंबईच्या वाटसन कंपनीच्या मार्फत हिरेजडित दागिने, लंडन येथील दोन कंपन्यांच्या मार्फत हिंदुस्थानांतील शाली व गालीचे पाठविले.

लष्करांतील पेनशन मिळालेले युरोपियन लोकांपैकीं हिंदुस्थानांत रहाणारांची संख्या ८३७ आहे. सु. प.

प्रचंड सर्प— मद्रास रेलवेच्या चापाहती स्टेशनाजवळ कांहीं मजुरांनीं एक सर्प मारिला त्याची लांबी २७ फूट व रुंदी ९ फूट होती. त्याच्या पोटांत २ रानडुक्कर होते. त्याचें वजन १८ मण होतें.

घोड्याचा राग— अलाहाबादेस गेल्या शुक्रवारा मि. चार्ल्स यांच्या घोड्यांने घोडेवाला पाठमोरा असतां त्याची मानगोटी धरून पळत सुटला त्यामुळें घोडेवाला प्राणास मुकला नंतर घोड्यानें तें प्रेत कंपौंडाच्या दागशीं टाकिलें आणि मुकाट्यानें तबेल्यांत जाऊन उभा राहिला.

सृष्टीचे चमत्कार— अमेरिकेंतील फिलाडेल्फिया एथील प्रदर्शनासाठीं उत्तर अमेरिकेंतील इंडियन लोकांतील निरनिराळ्या ५० जातींनीं चमत्कारिक लोक पाठविले आहेत. त्यापैकीं ६ असामी मल्लविद्येंत निपूण आहेत, एक नुसत्या दोरीवर २०० फूट उंच चढतो, एकजण डोकोवर सारखा ११ तास उभा रहातो, दोघे सुमारें २९० याडांवर बर्चीं फेकूं शकतात, एकजण पाण्यांत बुडून ७० सेकंदांत ११० याडांपर्यंत पोंहत जातो आणि एक बाई आहे ती १२ मुलांची आई असून मुष्टियुद्धांत इतकी तयार आहे कीं ती त्या सर्वांस चोपून चित करिते.

भावनगरचे माजी ठाकूर तखतसिंगजी यांचें स्मरण रहावें ह्मणून त्यांच्या मातोश्रींनीं १५००० रुपये खर्चून एक महाल बांधण्याचा बेत केला आहे.

अपघात इगतपुरीच्या स्टेशनावर ता. ३ मिनहू रोजीं मि. बुडलिकन्सन नावाचा एन्जिन ड्रायवर एन्जिनाखालीं सांपडून पाय मोडल्यामुळें मेला.

बंगाल कोलकंपनीच्या कामदारांनीं लबाडी केल्यामुळें तिचा पुष्कळ तोटा होऊन ती बुडाली. हिचें भांडवल २२ लक्ष रु. व भाग २,२०० होते.

आह्मांस लिहिण्यास आनंद वाटतो कीं मालवण एथें येत्या जुलैपासून 'मालवणसमाचार' नावांचें मराठी वर्तमानपत्र निघणार आहे.

विलायतेंतील कारखानदारांचा जाहिरातींबद्दल खर्च— स्पोर्टिंग ग्याझेट नावाच्या वर्तमानपत्रांत असें लिहिलें आहे कीं मि. हालोवे हे गोळ्याच्या जाहिरातीबद्दल दरसाल ३ लक्ष रु; मेसर्स मोजेस आणि सन १ लक्ष रु; मेसर्स रौलंड आणि सन तितकेच सर्व पृथ्वींत मि. हॅलोल्ड हे जाहिरातींत अधिक पैसा खर्च कारितात. त्यांस दर आठवड्यास २०००० रु. खर्च लागतो. यावरून त्यांची मिळकतही तशीच असली पाहिजे मि. हालोवे यांची प्राप्ती २ कोटि रु. आहे. इं. प्र.

इंग्रज सरकारचे ताब्यांत नाणें सूट देऊन एतद्देशीय संस्थानिकांस देऊं नये असा हिंदुस्थान सरकारानें ठराव केल्याचें समजतें.

लखनौ लामारटीनोर कालेजांतील विली नावाचे एका युरोपिअन विद्यार्थ्यानें मुसलमानी धर्म स्वीकारला व अब्दूल कासिम असें आपलें नाव ठेविलें.

रुमाल बांधण्याची अदलाबदल काशी येथील सर्व पोलिसचे शिपाई आजपर्यंत आलेला रुमाल डोक्यावर बांधित होते; चालू महिन्यापासून पहिली चाल मोडून मुंडेरावजे बांधण्याचा हुकूम सरकारांतून मिळाला आहे.

पंजाब नार्दर्न रेलवेचे अधिकाऱ्यांनीं त्या रेलवेच्या पहिले क्लासाचे डब्यांत आपप हालणारे पंखे लावण्याची तजवीज केली आहे. आ. ल.

लंडन शहरांत ३४ ४९,१६० मनुष्यांची वस्ती आहे व क्षेत्रफळ १२२ चौरसमैल आहे आणि एका एकरास ४४ मनुष्यांची वस्ती आहे असें गुदस्तसालचे हिशेबावरून समजतें.

मुंबईचे हल्लाचे म्युनिसिपल कमिशनर मि० पेडर यांनीं आपल्या जागेचा राजिनामा दिला व ही जागा बहुतकरून मुंबईचे पोलिस कमिशनर सर फ्रांक सूटर यांस मिळेल असें ह्मणतात.

लाहोर येथील नुकतीच स्थापन झालेली कलाकौशल्याची शाळा फार चांगले रीतींन चालली आहे. या शाळेंत हल्लीं सुमारें ७० विद्यार्थी असून त्यांत पुष्कळ होतकरू आहेत.

काश्मीराकडे पटकीचा उपद्रव फार झाला होता तो आतां कमी होत चालला आहे असें तारीख ३ जूनच्या तारेवरून समजतें

गागवारा येथें खाणींचें काम करणारे लोकांत पटकीचा रोग उद्भवला आहे व त्यामुळें खाणीचे कारखाने बंद पडले आहेत.

---

## म्याकगार्थ नामक गोऱ्यानें केलेले खून.

आलीकडेस नेटिव लोकांचे, साहेब लोकांच्या हातून कांहीं खून झाल्याखेरीज साल आडवें जात नाहीं. खुनाचें कारण तंटा, मारामार, अथवा चोरी यापैकीं एकही प्रकार नसतो. कधीं कधीं साहेब लोक शिकारीस गेले असतां नेटिव लोक त्यांस जनावरें आहेत असें दिसून त्यांचा घात होतो, कधीं कधीं गोऱ्यांस वेळेपुर्ते वेड प्राप्त होऊन नेटिवांची प्राणहानी होते, कधीं कधीं तर नेटिवांस प्राण जाण्यासारखी साहेब लोकांनीं मारहाण केली, व ज्यास मारहाण झाली तो तात्काल मेला तरी मृत्यु मारहाणीचा परिणाम न ठरतां शारीरिक दुर्बळतेमुळें मेला असें ठरतें. असले प्रकार पुष्कळदां घडले आहेत हें वाचकांच्या नजरेस आलें असेल. गुजराथेंत सर्वेकडील साहेबानें तीन नेटिव शिपायांचे खून केले, त्याबद्दल जी चवकशी झाली तींत साहेब हे खून कर्ते वेळीं वेडे होते असें ठरलें. खुनाच्या गुन्ह्याबद्दल त्यांस कांहींएक शासन न होतां उलटें त्यांस खर्च देऊन विलायतेस सरकारानें पोंचतें केलें. सिमला येथें एक गोरा गृहस्थ शिकारीस गेले असतां त्यांच्या हातून एक दोन नेटिवांचा जनावरें समजून प्राण गेला. याचप्रमाणें वायव्य प्रांतांत एका साहेबानें आपल्या सइसास मारहाण केली त्यामुळें तो तात्काळ मरण पावला. परंतु चवकशी झाली तींत मयत इसम मारहाणीवरून न मरतां त्यांचा पित्ताशय फार वाढल्यामुळें सैस मेला असें ठरलें. साहेब मजकुरास वीस रुपये दंड मात्र झाला. याच मासल्याचा प्रकार उत्तर हिंदुस्थानांत शहाजहानपुर येथें गेल्या एप्रिल महिन्यांत घडला. या महिन्याच्या सातव्या तारखेस म्याकगार्थ नांवाच्या सोजिरानें तीन नेटिवांचे प्राण हरण केले. हा प्रकार घडला तो असा:— सोजीर मजकूर आपल्या एक दोस्त साथ्यांसह परेडीस कवाइतीकरितां आपली बंदुक घेऊन गेला परंतु कवाइतीच्या ठिकाणीं न जातां प्रकृति बिघडली आहे सबब हवा खाण्यास जातों असें आपल्या सोबत्यांस सांगून दुसऱ्या एका रस्त्यानें चालता झाला. कांहीं अंतरावर गेल्यावर एक धोबी गाढवावर बसून जातांना त्याच्या दृष्टीस पडला. म्याकगार्थनें लागलीच आपली बंदुक भरून त्यावर झाडली व त्याचा प्राण घेतला. सोजीर व धोबी यांत सुमारें १२ याडांचें अंतर होतें. एका गरिबास आपल्या शौर्याचा मासला दाखविल्यावर सोजीर हा एका शेताजवळ गेला. तेथें कापणीचें काम चाललें होतें. शेतांत नेटिव लोक पहून सोजराचें मन फिरलें. त्यानें बंदुक भरून दोन मुसलमान कापणीदारांचा लागलाच प्राण घेतला सोजीर व कापणीदारांत सुमारें चाळीस पासून पंचेचाळीस यार्ड इतकें अंतर होतें. म्याकगार्थनें तीन नेटिवांस ठार मारलें, अशी बातमी लैनेंत पोंचल्या बरोबर पलटणचें अधिकाऱ्यानें म्याकगार्थ यास आणण्याकरितां कांहीं सोजीर लोक पाठविले. पाठविलेल्या सोजिरांची व म्याकगार्थ याची गांठ पडली तेव्हां या तीन नेटिवांस सहज मारलें काय असें त्यांनीं कैद केलेल्या सोजरास विचारलें. परंतु त्याचा त्यानें कांहींच जबाब दिला नाहीं. लैनेंत आणल्यावर कैदी यानें झालेला सर्व प्रकार आपल्या आडजुटंटास सांगितला व बाहेर जातेवेळीं आणखी बारा नेटिव मारीन असें बोलला. चवकशींत पलटणेच्या डाक्टरानें लिहून दिलें कीं कैदी मजकूर कधीं घाबरा होई परंतु त्यास दुखणें ह्मणून कांहीं एक नव्हतें. कानपुर येथें बंडांत ज्या साहेब लोकांस ठार मारलें त्या प्रीत्यर्थ जी विहीर बांधली आहे ती पाहिल्या दिवसापासुन माझें मन फार अस्वस्थ झालें असें म्याकगार्थानें मला सांगितलें होतें असें डाक्टरानें जबानींत लिहून दिलें. वादीतर्फे पुरावा झाला तो इतकाच कीं कैदीमजकूर हा बेशुद्ध होत असे चवकशींत एकंदर तीन डाक्टरांच्या जबान्या झाल्या त्यांत त्यांनीं साफ लिहून दिलें कीं परीक्षेअंतीं कैदी हा बेशुद्ध होत असे असा कैदीतर्फेचा जो पुरावा त्यास कांहीं एक आधार नाहीं. चवकशी अंतीं जज्जानें एकंदर सर्व हकीकतींचा गोषवारा जूरीस सांगितला, व गैरशुद्धींत अथवा मदिरापान करून गैरशुद्धींत गुन्हा केला असतां कायद्याप्रमाणें कोणती शिक्षा द्यावयाची तेंही सांगितलें. जुरीनें एक विचार करून कैदी यास दोषमुक्त ठरविलें. याप्रमाणें या गुन्ह्याची अखेर झाली. गैरशुद्धींत खून केले या सबबेवर कैदीस जूरीनें सोडलें ह्मणावें तर तीन्ही डाक्टर ही सबब अगदीं कबूल करीत नाहींत, नेटिवांवर सूड उगविण्याचे उद्देशानें या तीन गरीब नेटिवांचा प्राण घेतला नाहीं असें ह्मणावें तर कानपुर येथील बंडाच्या वेळच्या साहेब लोकांच्या संबंधानें जी विहिर बांधली ती पाहिल्यापासून माझें मन विटलें असें कैदी मजकुरानें जबानींत लिहून दिलें नसतें. कैदीनें हे तीन खून कोणत्या उद्देशानें केले असावेत याचें साधारण धोरण बांधण्यासारखें साधन असूनही जूरीनें कैदीस दोषमुक्त केलें याचा चमत्कार वाटतो. याच प्रकारचा साहेबाचा खून नेटिवाचे हातून झाला असता तर इतकीही चवकशी करण्याचें प्रयोजन नसतें. थोड्याशा पुराव्यावरच त्यास देहांत प्रायश्चित मिळतें. ने. ओ.

---

हें पत्र अकोलें एथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा.छा. प्र.

REGISTERED NO. 7, 1876

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १०  अकाले रविवार ता० २५ माहे जून सन १८७६ इ०  अंक २६

## वऱ्हाडसमाचाराचीकिंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचें अगाऊ | ६ |
| सालअखेर | ७ |
| फुटकळ अंकास | ०४ |
| डांकहाशील | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| " अखेर | २ |

☞ नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लो
कांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र
सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## नोटिसा

तुळसिंग वल्लद रंभाजी कुणबी वस्ती
मौजे गोळेगाव तालुके खामगाव यास
लक्षमण वल्लद भिवसेन पाटील मौजे गो
ळेगाव याजकडून तारीख १७ माहे जू-
नच्या उर्दूअकबारांतील नोटिशीचें उत्तर
कळविण्यांत येते तें येणेंप्रमाणें-

तुह्मी ह्मणता कीं कबुलायतप्रिमाणें
आह्मी सर्व खटपट केली व आपले पदर-
चा खर्च करून तुमचें वतन तुह्मांस मि
ळवून दिलें सबब करारनामा रद्द होऊं
सकत नाहीं.

आतां ही गोष्ट सर्व बातल आहे अ-
सें असतां तुह्मी अकबारांत छापविता त्या
पक्षीं दिवाणींत दावा करून आपली गो
ष्ट सिद्ध करून दाखवावी. आह्मी त्या
कामीं खर्च देणार नाहीं. दमडीच्या क
वड्याही न खर्चतां व कांहीं अंगाला झी
ज लागू न देतां पाटील व्हावयास पहा-
ता पण वतनदारी अशी सोपी असती
तर तुह्मीं व दुसरे बहुत तेली माळी सर्व
पाटीलच झाले असते. असो. तुह्मी आम
चे मुकदम्यास पैसा खर्च केला नाहीं.
गेल्या महिन्यांत आमची भावजय मरण
पावली तेव्हां वखऱ्यावर पाणी टाकण्याक
रितां आह्मी तुह्मांस सांगितलें कीं खर्चा-
चा पैसा द्यावा व पाणी टाकावें. तेव्हां
तुह्मी ह्मणाला मजजवळ पैसा नाहीं व म
ला पाटिलकीची जरूर नाहीं आणि मी
पाणीही टाकीत नाहीं. ही गोष्ट चार
चौघांसमक्ष घडलेली आहे ते या विष-
यीं साक्ष देतील. तसेंच आमचे गढींतील
जागा आह्मी तुला त्या रद्द झालेल्या करा
रनाम्यांत लिहून दिली होती व तिजवर
तू इमलाही केला होता असें असतां ह-
ल्लीं दुसरे मनुष्याचे नांवें तिसरे मनुष्याक-
डून ती जागा १०० रुपयांस खरेदी घेत
ल्याचा एक बनावट कागद केला आहे
इत्यादि सर्व गोष्टींवरून तूं वतनाचे चौथा
ईस पात्र आहेस किंवा कसें हें जगजाहीर
होत आहे असो. आह्मी तुझा करारनामा
मागील नोटिसीप्रमाणें रद्द केला आहे हें
तुला पुन्हा कळवितों. आमच्या नोटिसी
चा खर्च तुला द्यावा लागेल. कळावें- ता-
रीख १८ जून सन १८७६ इसवी.

( सही ) लक्षमण वल्लद भिवसन
पाटील दस्तुर खुद्द

### नोटिस.

योग्या वल्लद शामा वरठी वस्ती मौजे
माजरी तालुके बाळापुर यांस पांडू वल्लद
चंद्रभान पाटिल मौजे मांजरी तालुके बाळा
पुर याजकडून नोटिस देण्यांत येते कीं
मौजे मजकुरीं मी आपली जागा तुला र
हाण्यास दिली तरी गतवर्षीं खाली करून
मागितली असतां देतों ह्मणून तूं बोलला
परंतु दिली नाहीं. हल्लीं त्या जागेची मज
ला जरूर असल्यामुळें नोटिसीनें तुला
कळविण्यांत येतें कीं ही नोटिस पावल्या
दिवसापासून १९ दिवसांचे आंत आमची
जागा खाली करून द्यावी न दिल्यास शि
रस्त्याप्रमाणें तुजवर फिर्याद होईल खर्च
तुझे अंगावर पडेल सबब अगाऊ कळ
विलें आहे कळावें तारीख १८ जून सन
१८७६ इसवी.

( सही ) पांडू वल्लद चंद्रभान
पाटिल निशाणी

### नोटिस.

परशा बोंड्या रहाणार मौजे मुंगोली
प्रगणे वणी यांस रमी मर्द परशा बोंडीन
हल्लीं रहाणार भालर प्रगणें व जिल्हे वणी
इजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुझ्या-
शीं माझें लग्न होऊन अजमासें बारा वर्षें
झालीं. नंतर मला ऋतु प्राप्त होऊन सुमारें
४ वर्षें झालीं इतक्या काळांत तुझी व मा
झी एकांती भेट नसून कदाचित एखादे
वेळेस भेट झाली असतां तू पळून जातो
स माझी सावलीसुद्धां घेत नाहींस याप्र-
माणें आज ४ वर्षें मी वैध्याप्रमाणें काळ
घालविला आतां हे माझे दिवस माझ्यानें
काढवत नाहींत व तुजपासून जो उपयोग
होणें तो होत नाहीं येणेंकरून मी फार
लाचार होऊन तुजला नोटिस देते कीं
ही नोटिस तुजला पावल्या तारखेपा
सून ८ दिवसांत मजला पाटाचा नवरा
करण्यास परवानगी दिली असतां उभय
तांतही बदलौकिक न होतां लोकांत चां
गला परिणाम होणार आहे तर सदरीं
लिहिलेप्रमाणें मजला परवानगी न मिळेल
तर मी कायदेशीर रीतीनें पाटाचा नवरा
करून घेईन मग त्याजवर अथवा मजवर
तुझा कोणत्याही अर्थीं नुकसानी वगैरेचा
दावा न चालतां कांहींएक संबंध राहिला
नाहीं व मी अथवा माझा नवरा कोणत्या
ही गोष्टीविषयीं जबाबदार होणार नाहीं.
ही नोटिस दिली सही. तारीख १९ माहे
जून सन १८७६ इसवी.

[ सही ] रिमी मर्द परशा बोंड्या
इचे हातची बांगडी.

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या
मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस—

वि. वि. वऱ्हाडांतील शाळाखात्यास स
क्तीचा कायदा असावा व नसावा अशा
बद्दल वर्तमानपत्रांत बातम्या असतात. न
सावा असें ह्मणणारे हे अनुभविक नसती-
ल असें वाटतें. सक्तीचा कायदा अवश्य
असावा व बहुतकरून व्हिलेज स्कुलास ज
रूर पाहिजे व्हिलेज. मास्तरास मुलें नमवि
ण्याविषयीं जें कांहीं दुःखीं व अडचणी सो
साव्या लागतात. त्या सांगता पुर्वत नाहीं
त. व्हिलेज मास्तरास मदत कोणाची न-
सते, असें ह्मटलें तरी चालेल. फक्त इन्स्पे
क्टराची मदत, परंतु इन्स्पेक्टरास कांहीं
अधिकार नसल्यामुळें चांगलें काम चालत
नाहीं, वऱ्हाडांतील लोक तहशिलदारास
भीत असतात कारण त्यांस माजिस्ट्रेटाचा
अधिकार असतो, परंतु हे लोक ह्मणजे
तहशिलदार हें शाळाखातें तुच्छ मानून नि
र्भर्त्सना करितात. मग त्यांच्याकडून मदत
कोठून मिळणार! जे अनुभविक व शिक-
लेले असतात त्यांच्याकडून मात्र मदत मि
ळते. जर तहशिलदारानीं मदत देण्याबद्द
ल तजवीज केली तर कदाचित सक्तीचा
कायदा नको.

इकडे फीचे जे दर आहेत ते पाहिले
असतां फार मोठे नाहींत परंतु मुंबई इला
ख्यासारखे जमीनीवर ज्यास्ती दर बसवून
तिकडच्या मुलांप्रमाणें आर्धा आणा फी
केली असतां बरें होईल. तर सरकार इक-
डे लक्ष पुरवून हल्लीं शेंकडा एक रुपया
आहे त्याजवर जास्ती आकार बसवून अ-
र्धा आणा फी करतील अशी आशा आहे.

सेंट्रलप्राव्हिन्सांत जशी वरिष्ठ आधि
काऱ्यांची नजर शाळाखात्यावर चांगली
आहे व त्यांणीं असा बंदोबस्त केला आहे
कीं जर मुलगा कोणी पाठवित नाहीं किं-
वा सतत येत नाहीं तर त्याबद्दल मास्तरां-
नीं तहशिलदारास कळवावें नंतर तहशि
लदार त्या लोकांस बोलावून सक्त ताकी-
द देतात, जर तितक्यावर न ऐकिलें तर
डिपुटी कमिशनर यांजकडे समजूत देण्या
करितां पाठवितात; परंतु ते तहशिलदार
यांचे समजुतीनेंच समजतात. अशा सोयीनें
तिकडील व्यवस्था झालेली आहे. तेणेंकरू
न तिकडे मुलांची संख्याही उत्तम आहे.
याप्रमाणें आमचे सरकार लक्ष पुरवून कां-
हीं तरी तजवीज करतील तर खेडगावच्या
शाळांचा चांगल्या प्रकारें उपयोग होईल.

उमरखेड– वैशाख वद्य ११ पासून ६
दिवस गोचर्य स्वामीचे मठांत उत्साह हो
त असतो उत्साहास, हरदास, गवई, शा
स्त्री व अवांतर ब्राह्मण मिळून सरासरी २
हजार संख्या येत असते. भोजनाचा बेत
चांगला असतो. प्रत्येक दिवशीं कांहीं तरी
पक्वान्न करितात वाढण्याचा बेत चांगल्या
प्रकारचा असून १२ वाजण्याच्या आंत
पंक्ती उठतात. स्वामिमहाराजांस कांहीं उ
त्पन्न नसून अशा थाटाचा बेत होतो. या
शिवाय एथें उत्साह होत असतात एकंद-
रीनें वऱ्हाडांत उमरखेडासारखा अन्नखर्च
होत नसेल याविषयीं सविस्तर हकीकत पु
ढच्या खेपेस लिहिण्यांत येईल कळावें ही
विनंती तारीख १२ जून सन १८७६
इसवी.

एक
अ

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस—

वि. वि. खालील चार ओळी आपणा
कडे पाठविल्या आहेत त्या येत्या अंकीं प्रसि
द्ध कराव्या.

हल्लीं वऱ्हाडांतील विद्याखात्याचे मुख्य
अधिकारी डायरेक्टर साहेब यांणीं फीच्या
बाबतींत एक सर्क्युलर केलें आहे. त्यांती
ल आशय खालीं लिहितों.

सर्व शाळेंतील मास्तर लोक मुलांची
फी पदरून भरतात ती पुढें भरीत जाऊं
नये असें आहे. व जे लोक फी भरतील
ते नालायक असें ठरविलें जाईल, अशा
अभिप्रायाचें सर्क्युलर केलें आहे. या सर्क्यु
लरावरून असें झालें आहे कीं पूर्वीं फीच
भरावी लागत असे- आतां तसें करून व-
रिष्ठ आधिकाऱ्यांस असें कळविलें पाहिजे
कीं फी वेळच्यावेळीं वसूल होती, आ
ह्मी पदरची भरीत नाहीं, याजवरून ह-
ल्लीं फीच्याबद्दल जो बोभाट झाला आहे
तो मात्र उघडपणें ऐकण्यास येणार ना-
हीं. एकदम फी वसूल होण्याकरितां स.
र्क्युलरापेक्षां ज्यास्त व्यवस्था कांहीं केली
नाहीं. याच बाबतींत माजी डायरेक्टर सा
हेब यांनींही एजूकेशनल रेकार्डमध्यें ले
ख दिला होता; त्याचें हें भाषांतर असावें
असें वाटतें. खरोखरच फीची आणि मु-
लांची संख्या वस्तीच्या मानानें असावी
तिजबद्दल मी आपल्या अल्प बुद्धिनें थो-
डी सूचना करितों.

सन १८६७ च्या खानेसुमारींत जी
मनुष्यांची गणती झाली होती तिजवरून ६
पासून १० वर्षांच्या वयाचीं मुलें किती आ
त, पैकीं फी देण्यास ऐपतदार किती आ
णि गैरऐपतदार किती? जी नादार असती
ल त्यांस फ्री घेतलें पाहिजे. सुधारलेल्या मुल
खांत नादार मुलें घेण्याची वहिवाट असू-
न या वैराण मुलखांत ती चाल नसणें हें
सरकारचे स्वार्थदृष्टीकडे पहाण्यासारखे रूप
आहे. वऱ्हाडांत सर्वच लोक श्रीमान आहेत
कीं काय ? ह्या पृथ्वीमध्यें एकही देश अ
सा नसेल कीं त्याजमध्यें गरीब नाहीं. मग

वऱ्हाडांतच नादार मुलें घेण्याची चाल कशी मोडली गेली असेल ती असो. सत्ते पुढें शहाणपण कोणाचें चालतें ? गरीब मास्तर लोकांनीं पाहिजे तितकी मेहेनत करावी आणि तिचें फळ केव्हांना केव्हा तरी कमी पगारावर जाणें हेंच मेहेनतीचें सार्थक ह्मटलें तरी चालेल. कारण हा मुलुख अमानी हैदराबाद आहे त्याजवर दोघांचे अंमल चालतात तद्वतच लोंअर क्लास स्कुलावरही चालतात. एकानें केलेली गोष्ट दुसऱ्यास आवडावयाची नाहीं, सबब लोंअर क्लास मास्तर लोकांस फारच भयंकर संकट येऊन पडलें आहे. कित्येक जागा कमी केल्या आहेत त्यामुळें पुष्कळ लोकांचे बढतीचे हक्क बुडाले आहेत. कित्येक लोक एकाच पगारावर लागल्यापासून हाकाळपर्यंत आहेत त्यांस बढती केव्हां मिळणार हें कळत नाहीं, मास्तर लोकांच्या हिताकडे जितकें लक्ष वरिष्ठ अधिकारी देतील तितकें त्यांस भूषणास्पद होणार आहे व कामही सुरेख होणार आहे.

फी वसूल करण्याचें काम पाटिल याजकडे दिलें पाहिजे, नाहीं तर गावचा जागल्या मास्तरच्या ताब्यांत दिला पाहिजे आणि तहशिलदार लोकांनीं या कामीं विशेष लक्ष्य पोंचविलें पाहिजे. याशिवाय नुसतीं सर्क्युलरें कितीही झालीं तरी त्याजपासून कांहीं विशेष फळ होणार नाहीं. वऱ्हाडामध्यें रा. रा. अंबादास संतो यवतमाळ तालुक्याचे तहशिलदार जशी विद्येच्या कामांत मेहेनत घेतात तशी दुसरे लोक घेत असतील असें वाटत नाहीं. हे तहशिलदार फारच दयाळू निस्पृह, खऱ्याचे साथी, आणि मनमिळाऊ आहेत, याशिवाय यांजमध्यें अनेक गुण वास करित आहेत. कळावें. तारीख १४ जून सन १८७६ इसवी.

एक क्ष.

---

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस—

वि. वि. आपले तारीख १८ जून चे वर्तमानपत्रांत 'सत्यवक्ता' याणें अमरावतीचे पोलिसाकडून चोऱ्यांचा पत्ता लागत नाहीं इत्यादि पुष्कळ निरर्थक ओरड केली आहे व त्याप्रमाणेंच आपणही आपला अभिप्राय दिला सबब आपणास खरी हकीकत कळविल्यावाचून लोकांचे मनांत जो खोटा ग्रह झाला आहे तो निघणार नाहीं सबब च्यार ओळी आपणाकडेस पाठविल्या आहेत.

साधारण नियम असा आहे कीं जितक्या चोऱ्या होतील तितक्या सर्व पत्यांत येतील असें सहसा कोठील व कोणतेही पोलिसाकडून घडून येण्याचा संभव नाहींच. कांहीं पत्त्यांत येऊन कांहीं नापत्ता रहातील. या नियमास अनुसरून येथील पोलिसानींही कांहीं गुन्हे धरले व कांहीं नापत्ता आहेत त्यांचा तपास सुरू आहे.

सत्यवक्ता याणें चोरीच्या ज्या रकमा आपले पत्रीं लिहिल्या आहेत त्या बरोबर नाहींत सबब प्रथम त्याच रकमा शुद्ध करून नंतर त्यांची हकीकत देतों.

| | |
|---|---|
| आबाजी नारायण | १३०० |
| शेट गणेशदास बुलाखीदास | ५००० |
| बळवंत सदाशिव | ३००० |
| कन्हयालाल | ४०० |
| वामन अनंत | ६०० |
| विठोबा पिंपळगावकर | ११००० |

याप्रमाणें खरोखर रकमा आहेत.

ह्यांतील बळवंतराव वकील यांचे चोरीस दीड वर्ष झालें तसेंच आबाजी नारायणचे चोरीसही एक वर्षावर होऊन गेलें ह्या दोन्ही चोऱ्या नापत्ता आहेत खऱ्या; पण जर ह्या उभयताही गृहस्थांस आपण विच्याराल तर ते मोठे मोठे गृहस्थानीं चोऱ्या करवून माल पचविला असेंच ह्मणतील या कारणानीं त्या चोऱ्या राहिल्या असाव्या असें वाटतें.

रा. वामन अनंत भोळे यांचे चोरींतील सर्व माल सापडून आरोपी इसम कारागृहांत वास करीत आहेत.

शेट गणेशदास बुलाखीदास यांचे दुकानचे बाजूची भिंत फुटली होती पण तें छिद्र इतकें लहान होतें कीं त्यांत लहान मूलही शिरूं शकत नव्हते. यांत माजिस्त्रेट साहेबानीं स्वतः चौकशी करून ठरविलें कीं ही चोरी झाली नसून पि०कोड कलम ४०९ प्रमाणें मुनिम यानें दगाबाजी केली. कारणकीं दुकानचे मालकानें दुसरा मुनिम नेमून या मुनिमास त्या कामावरून काढल्याबद्दल मालकाचा हुकूम येऊन चुकला होता.

बाकीच्या दोनी चोऱ्या नुकत्याच होऊन त्यांचा तपास चालू आहे.

यावरून आपणच अवलोकन करावें कीं आपला पत्र पाठविणारा असत्यवक्ता आहे कीं नाहीं? नुकतीच जी पिंपळगावकराची ११०००ची चोरी झाली ती फिर्यादीचा मुनिम यानें दगाबाजीनें केल्याबद्दल या शहरांतील सर्व लोकांचें ह्मणणें आहे व त्या मुनिमाचे घराचा झाडा घेतला तेथें दोन हजार रुपयाचे डागिने जे लिहून दिले होते कीं चोरीस गेले त्यांपैकीं कित्येक सापडले त्यावरून मुनिमाचे भावास पोलिसानें धरलेंही होतें. यावरून असें अनुमान होत आहे कीं आपलें पत्र पाठविणारेही त्या मंडळींतीलच असावेत व त्यानीं गेले मालांतील हिस्सा घेतला नसेल हे कशावरून? कदाचित घेतला असेल ह्मणूनच त्यांचे सर्व अंगाची आग होऊन त्यांनीं खोटें वर्त्तमान आपणास लिहून पाठविलें असावें असें दिसत आहे. वेड्या मनुष्यानें शिव्या दिल्या ह्मणजे आपणही वेडे बनून त्यास शिव्या देऊनये असें प्रशस्त वाटल्यावरून त्या पत्रांतील शिव्याकडेस येथील पोलिसानें लक्ष दिलें नसावें असें वाटतें आणि त्याप्रमाणें असल्यास हेंही त्यानीं चांगलें केलें. कळावें हे विनंती.

असत्य द्वेष्टा

---

## मागाहून आलेल्या नोटिसा

राजश्री त्रिंबकपंत वकील निसबत देशमुख प्रगणे अडगाव यांस परवतराव वल्लद फकीरजी देशमुख कसबे अडगाव याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, देशमुख मंडळीनीं तुह्मास हैदराबादेस वृत्ती संबंधी खटपटीकारितां पाठविलें होतें व तुमचे स्वाधीन ६०० रुपये केले होते. त्या रुपयांचा हिशेब आह्मी तुह्मास एक दोन वेळ विच्यारला तेव्हां तुह्मी देऊं दिलाऊं कारिता पण अजून तिकडील तपाशिलवार हिशेब देत नाहीं ह्मणून ही मुद्दाम नोटिस दिली आहे तर ही पावल्यापासून एक महिन्याचे आंत सदर्हू हिशेब आह्मास समजून द्यावा. अगर या मुदतींत सदर्हू ६०० रुपयांच्या खर्चाचें टिपण आह्मास न समजून दिलें तर तुह्मावर सदर्हू रकम वसूल करण्याकरितां फिर्याद केली जाईल. व कोर्टखर्चही तुह्मास द्यावा लागेल हें खूप समजावें. या नोटिशीचा खर्च तुह्मास द्यावा लागेल. कळावे तारीख २३ माहे जून सन १८७६ इसवी.

( सही ) परवतराव वल्लद फकीरजी
देशमुख कसबे अडगाव
दस्तुर खुद्द

---

### नोटिस.

उमनसिंग वल्लद मनूसिंग रजपुत रहाणार तेल्हारें तालुके अकोट यांस पुरणमल सिताराम अगरवाले मुक्काम हिवरखेड तालुके अकोट याजकडून. तुह्मी मजला तारीख ७ माहे मे सन १८७६ इसवीची नोटिस दिली ती तारीख २९ माहे मे सन १८७६ इसवी रोजीं मला पावली त्याचा जबाब हाच कीं ज्या वेळेस तुह्मी व आह्मी मिळून पेठ खामगाव एथील अफूगांज्याचे मक्त्यांत शरीक होऊन तुह्मी मला पेशगीबद्दल २०० रुपये दिले आणि बाकीचे रुपये १५० तुह्माकडेस राहिले ते रुपये व अफू २९ शेरें व गांज्याचे २ अखे असे तुह्मी द्यावे तेव्हां माझे घेतलेले मक्त्यांत शराकतदार व्हाल असें असतां तुह्मी कांहीं १५० रुपये व अफू व गांज्याचे आखे आणिले नाहींत सबब जो मी मक्ता घेतला त्यापैकीं निंमे मक्ता मी नुकसान खाऊन १२०० रुपयांस मनूलाल गुलाबराय यास विकला त्यांत तुह्मी २०० रुपये दिले ते नुकसानींत घालून बाकीचे नुकसानीचे रुपये २५ तुह्माकडेस येणें राहिले हे मजला तुह्मी द्यावे न दिल्यास मी दिवाणींत दावा करून नुकसान भरून घेईन तुह्मास आतां रुपये मजला देणें नाहीं. कळावें तारीख २१ जून सन १८७६ इसवी

( सही ) पुरणमल सिताराम आगरवाले दस्तुर खुद्द

---

### नोटिस.

उक्या चांभार रहाणार मौजे धाकली परगणे पिंजर तालुके अकोलें यास अकाजी वल्लद भावसिंगजी देशमुख मौजे कटार तालुके अकोलें याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं तुजकडे आमचें रोकड घेणें रुपये २२८ शिवाय बारा महिन्याचें व्याज येणें आहे; मागितलें असतां देत नाहीं सबब या नोटिशीनें कळवितों कीं नोटिस पोंचल्यापासून १५ दिवसांत आमचे रकमेची आदाई करावी. न केल्यास दिवाणी कोर्टांत दावा करून खर्चा सुध्दां सर्व रकम घेतली जाईल कळावें तारीख २४ माहे जून सन १८७६ इसवी.

[ सही ]अकाजी वल्लद भावसिंग
देशमुख मौजे कटार दस्तुर
खुद.

---

# वऱ्हाडसमाचार

मिती आषाढ शुद्ध ४ शके १७९८.

---

## वऱ्हाड प्रांताविषयीं विलायतेंत वाटाघाट

दिवाण सर सालरजंग साहेब विलायतेस गेले आहेत व वऱ्हाड प्रांत इंग्रज सरकारानीं गैररीतिनें निजाम सरकारापासून घेतलेला महाराणी साहेबांस परत मागावा असा त्यांच्या जाण्याचा मुख्य उद्देश असावा अशी लोकवार्ता आहे व तिच्या अनुरोधानें विलायतेंत आतां वऱ्हाड प्रांताविषयीं सरकार संबंधानें वाटाघाट चालू होईल अशीही लोक अपेक्षा करून आहेत. पण त्याप्रमाणें अजून कांहीं घडलें नाहीं तेव्हां महाराणी साहेबांची व दिवाण साहेबांची मुलाकत होईल त्या वेळीं ही गोष्ट निघेल असेंही कित्येक ह्मणतात, परंतु ही महत्वाची राजकीय गोष्ट ब्रिटिश दरबारांत सालरजंग साहेबांसारखे हुशार प्रधान केवळ खानगी भेटींत काढतील व तशी गोष्ट काढण्याच्या योगानें चटदिशी महाराणी साहेब होय ह्मणून मुलुख त्यांचे स्वाधीन करतील अशी गोष्ट सुधारलेल्या राष्ट्रांत व दिवाण साहेबांकडूनही होणें नाहीं. ती खलीत्यानें, हिंदुस्थान सरकारच्या अनुमत्तानें, व पार्लमेंट सभेच्या वाटाघाटीनेंच झाली तर होणार आहे.

दिवाण साहेब जूनच्या पहिले तारखेस लंडन शहरीं गेले. तेव्हां ड्यूक आफ सदरलंड हे त्यांचे बरोबर होते. फालकस्टोन महल्यांत पोंचले तेव्हां कार्पोरेशनानें त्यांस एक उत्तम सुशोभित मानपत्र दिलें तें ग्रहण करतांना दिवाण साहेबांनीं फार सुरस व मनोवेधक भाषण केलें. त्यांत हा देश पाहण्याची बहुत वर्षांची आपली इच्छा परमेश्वर कृपेनें शेवटास गेली असें ह्मटलें, गेल्या १०० वर्षांत आपल्या धन्याचा ज्या राष्ट्राशीं परम निकट संबंध आहे त्याचें आपणास दर्शन झालें येणेंकरून आपण मोठे कृतकृत्य झालों असेंही त्यांनीं बोलून दाखविलें. आतां पुढें काय काय प्रकार होतील व ते समजण्यांत येतील तसे आह्मी आपले वाचकांस कळवूं.

लंडन शहरीं ईस्ट इंडिया असोसियेशन नावाची युरोपियन व नेटिव लोकांची एक मोठी सभा आहे तिजमध्यें हिंदुस्थान देशाच्या संबंधानें हमेशा विच्यार चालत असतात. गेल्या महिन्यांत हिंदुस्थानांत प्रिव्ही कौन्सल असावें अशाबद्दल मेंबर इव्हान्स बेल इकडील एक लष्करी आ-

[मि]स्तर यांनीं निबंध वाचला त्यांत वऱ्हाड प्रांत आणि निजाम सरकार यांच्या संबंधानें बरेच विच्यार आलेले आहेत. त्यांत सदर्हू आफिसरांनीं स्पष्टपणें कागदपत्रांवरून दाखविलें आहे कीं ब्रिटिश सरकाराला निजाम सरकारापासून वऱ्हाड प्रांत घेण्याचा कांहीं हक्क नव्हता. प्रांत न द्याल तर हैदराबाद शहरावर फौजांचा व तोफांचा हल्ला चालवूं अशी दहशत लार्ड डालहौसी गवरनर जनरल यांचे हुकुमावरून त्या वेळचे असिस्टंट रेसिडेंट कर्नल डेविडसन यांनीं घातल्यावरून निजाम सरकारानें निमुटपणें तहनाम्यावर सही केली. निजाम सरकारास तहनाम्यावर सही करणें किंवा पदभ्रष्ट होणें यांतून कोणती तरी एक गोष्ट करावी ऐवढेंच उरलें होतें म्हणून दूरवर दृष्टि पोचवून त्यांनीं आपली गादी कायम राखिली वगैरे मजकूर त्या निबंधांत आहे तो आह्मी पुढील अंकांत लिहूं. अस्तु. विलायतेंत खासगी रीतीनें ही वाटाघाट सुरू झाली आहे व सरकारी रीतीनें दिवाण साहेब खुद्द तिकडे गेले आहेत तेव्हां आतां काय होतें पाहावें.

## वकील

वकील ह्या शब्दाचा अर्थ मध्यस्थ असा आहे. वकील २ तऱ्हेचे आहेत. राज्या संबंधी एका दरबारचे दुसरे दरबारांत असणारे वकील व कोर्टांतून काम चालविणारे वकील. या पैकीं वऱ्हाडांतील सनदी वकिलांचे संबंधानें आजच्या अंकीं आह्मी थोडासा विच्यार करितों.

सनदी वकील ह्मणजे न्यायाच्या कोर्टांत लोकांकरितां काम चालविणारे परीक्षा घेऊन मुक्रर केलेले गृहस्थ होत. बहुतकरून लोक अडाणी असल्यामुळें न्यायाचे कोर्टांत असे वकिलांची फार जरूर असते. आणि केवळ अडाणी लोकांकरितांच वकील असणें जरूर आहे असें नाहीं. कोर्टांत हरएक किरकोळ कामाकरितां वारंवार पक्षकारास जाणें भाग पडतें. जसें भत्ता देणें, वारंवार मुकद्दमे नेमतील त्या त्या दिवशीं हजर रहाणें वगैरे अनेक उद्योग पाठीस लागतात; अशीं कामें कोणी कामाचा मनुष्य आपला स्वतःचा धंदा सोडून करूं ह्मणेल तर फारच अडचण पडते. याजकरितां अडाणी लोकांस व समंजस लोकांस एकसारखीच वकिलांची गरज आहे.

असे सनदी वकिलीची परीक्षा वऱ्हाडांत होऊन आज बरींच वर्षें झालीं पुढें पुन्हा परीक्षा न झाल्यामुळें सुधारणेंत बराच कमीपणा उरला आहे. वऱ्हाडांत वकील नेमिल्यावेळीं इंग्लिश विद्येचें प्राबल्य नव्हतें. आतां तें फार विशेष झालें आहे. व न्यायाधिशाची मुख्य भाषाही इंग्लिश आहे. कायदे वगैरेचा विशेष संग्रह इंग्लिश भाषेंतच आहे याजकरितां ज्यास इंग्लिश चांगलें येत असेल, निदान समजण्यासारखें तरी येत असेल ते वकील हल्लीं उपयोगी व अवश्यक आहेत असें आह्मास वाटतें. त्या मानानें पांहूं गेलें असतां वऱ्हाडांत इंग्रजी [जा]णणारे वकील फारच थोडे आहेत. आपले अकोल्यांतच वीस बावीस वकिलांमध्यें चांगले हुशार व इंग्रजी जाणणारे किती थोडे आहेत ह्मणजे दोन किंवा तीन निघतील. यावरून साऱ्या प्रांताविषयीं पहावें. आतां मराठी जाणणारे वकील सर्वच रेताडभरती आहेत असें नाहीं तर त्यांच्यांतही कांहीं अक्कलवान व कल्पक आहेत; परंतु त्यांच्यांत आपले गुण बाहेर दाखविण्याचें साधन ह्मणजे इंग्लिश नसल्यामुळें ते मागें पडले आहेत. कित्येक वकील असे विद्वान् आहेत कीं, त्यांस वकील असें ह्मणण्यासही वाईट वाटेल. याजकरितां नवीन हुशार उमेदवारांच्या परीक्षा घेऊन नवे वकील भरतीस घालणें अवश्यक आहे. जुनाट व पोचट वकिलांपेक्षां नवे भरीव वकिलांकडून काम जास्त चांगलें व लोकोपयोगी होईल. दिवसेंदिवस सुधारणा विशेष होत आहे व लोकही ज्यास्त हुशार होत आहेत तर असे लोकांस सरकार वऱ्हाडांत संधी देत नाहीं ही फार दुःखाची गोष्ट आहे. जुने वकील काढून टाकावे असें आमचें मत नाहीं, तर इकडेस परीक्षा घेऊन पास झालेल्या हुशार मनुष्यास जर अलिशान रेसिडेंट साहेब इकडेस वकिली करण्यास परवानगी देतील तर अनायासें हें जुन्याचें खूळ मोडेल. असें झाल्यानें चांगले तेच पुढें होतील [व] वाईट सहजी मागें पडतील आणि हुशारीस व विद्येस उत्तेजन येईल असें आमचें मत आहे.

सन १८६८ सालीं वकिलांचे परीक्षेचा ठराव झाला होता त्यावेळीं जुन्या वकिलांनीं आपली पोळी बुडूं नये ह्मणून मोठा गवगवा करून परीक्षा रहित केली हें त्यांचे हितार्थ चांगलें झालें याविषयीं आमचें कांहीं ह्मणणें नाहीं; परंतु त्याच परीक्षेबरोबर उमेदवार लोकांची वकिलीची परीक्षा हो[णा]र होती ती रहित झाली व या गोष्टीला आज बरेच दिवस झाले; परंतु आजपर्यंत वकिलीच्या परीक्षेबद्दल बिलकूल नाव निघालें नाहीं याजबद्दल आह्मास मोठें आश्चर्य वाटतें. कायदे कानूकरितां, इतर प्रकारचे वहिवाटीकरितां, व कर बसविण्याकरितां आमचा मुलूख इंग्रज सरकारच्या दुसऱ्या मुलखाबरोबर तंतोतंत आहे. आणि या वकिलीच्या परीक्षेच्या कामींच कां मागें रहावा हें आह्मास समजत नाहीं. मुंबई, नागपुर वगैरे ठिकाणीं प्रतिवर्षीं वकिलीच्या परीक्षा होतात आणि येथें सुमार दीड तपांत ती एकदाही न होणें यासारखें दुसरें काय उणें आहे? मूळच्या वकिलांतून आजपर्यंत बरेच वकील मेले, बडतर्फ झाले, वकिली न करितां इतर धंदे करूं लागले, परदेशीं गेले, अशा कारणांनें मूळच्यापेक्षां बरीच संख्या कमी झाली आहे इत्यादि कारणांवरून एकवार तरी वऱ्हाडांत वकिली करण्याकरितां उमेदवारांची परीक्षा घेण्याविषयीं कृपाळुपणें मे० रेसिडेंट साहेबांनीं ठराव करावा अशी आमची त्यांस सोत्कंठ शिफारस आहे.

आतां वऱ्हाडांतील उमेदवार लोकाची इकडे वकिलीची परिक्षा नच घेण्याचा निश्चय असेल तर देशाचें दुर्दैव समजण्याचें आहे. तथापि देशांत उत्तम वकील बरेच असावे आणि गाबाळ व खोगीरभरती वकिलांचा ऱ्हास व्हावा याकरितां मे. रेसिडेंट साहेबांनीं मुंबई, पुणें, नागपूर इकडील हुशार तरुण व इंग्रजी जाणणारे तरतरीत असे कोणी वकील इकडे येऊं इच्छितील तर त्यांस परवानगी दिली असतां इकडे वकिलांची योग्यता लोकांस कळून न्यायाधिशास चांगलें सहाय होईल व लोकांस उत्तम सोयही होईल याजकरितां वरील प्रकारचे वकिलीचे परिक्षेची तजवीज न झाल्यास हा तरी मार्ग खुला असावा असें आह्मी इच्छितों.

नवीन शोध—पृथ्वीवर दिसानुदिवस कांहीं नवीन शोध चालले आहेत. तेणेंकरून पुढें काय काय होईल याविषयीं कांहीं कल्पना करवत नाहीं. थोड्या दारूच्या बाटल्या भरीत असतात पण त्यांचे मण व खंडीच्या खंडी दारू साठवून ठेवण्यासाठीं लाकडी पिपाचा उपयोग करीत असतात. पिपांच्या लाकडाच्या ओवळण्या फुगण्यानें वाईन नामक दारू खराब होते व तिची रुचि बिघडते असें बहुत दिवस ठाऊक आहे पण त्याच्या ऐवजीं दुसरी कांहीं वस्तु योजितां येईल अशी कल्पना कोणाचे मनांत आली नाहीं पण हल्लीं अमेरिकेंत एक प्रकारचा कागद चांगला कमावून त्याचीं पिंपें करण्याची नवीन युक्ती निघाली आहे. तीं पिंपें फार चांगलीं, टिकाऊ, व मजबूद होतात व त्यांपासून दारूला तिलमात्र कांहीं कमीपणा येत नाहीं असें समजलें आहे. काय हा शोध!

## वऱ्हाड.

पोलिसपट्टी अथवा टौन फंड ह्मणून वऱ्हाडांत जो कर आहे तो उत्पन्नावर एक रुपया शेकडा या मानानें सर्व लोकांपासून घ्यावा असा अलिकडे ठराव झाला होता व त्यावरून कमिशनर, डिपुटी कमिशनर, स्माल काज जड्ज, असिस्टंट कमिशनर, पोलिस सुपरइंटेंडेंट वगैरे मोठमोठे अधिकाऱ्यांवर पोलिसपट्टी बसण्याचा समय आला होता तेव्हां तीन माहिन्याच्या उत्पन्नावर मात्र सरकारी कामदारापासून पट्टी घ्यावी असा ठराव झाला होता व आतां टौनफंडाचें स्पष्टीकरण असें आलें आहे कीं तो टौन ह्मणजे शहर यांत मात्र घ्यावा. सिव्हिल स्टेशनें, व क्यांटनमेंट ह्मणजे छावण्या यांत घेऊं नये. या नवीन प्रकारानें सर्व युरोपियन लोकांवरील पोलिसपट्टी टळली हें त्यांचे हितार्थ चांगलें झालें याबद्दल आह्मास वाईट वाटत नाहीं. परंतु युरोपियनांच्या पदरास खार लागण्याचा प्रसंग आला ह्मणजे कशा खटपटी होतात व कसे कायद्याचे अर्थ होतात आणि नेटिवांविषयीं तसे कांहीं होत नाहीं याजबद्दल वाईट वाटतें. व तेंही आमचें सरकार समदृष्टि ह्मणवितें ह्मणून वाटतें. ऐरवी तसें वाटण्याचेंही कांहीं प्रयोजन नाहीं.

मि. कादरभाई बोहरी यांची नारायण महिपत माजी नाजर याजवरील जामिनकी दूर झालेली असतांही सरकारानें जुन्या जामिनकीबद्दल त्यापासून १००० रुपये घेतले ते परत मिळण्याविषयीं मुलकी रीतीनें त्यांनीं पुष्कळ खटपट केली कांहीं दाद लागली नाहीं. शेवटीं या आठवड्यांत त्यांनीं सरकारावर दिवाणींत दावा लावला आहे. त्याचा काय निकाल होतो पहावा.

बाळापुरचे हिंदुस्थानी मास्तर मि० अबदुल रजाक यांनीं एक नोट चोरीस गेल्याच्या संबंधानें तेथील पोस्ट मास्तराची अब्रू खराब होईल असा कांहीं खोटा मजकूर नगरास आपले सासऱ्यास लिहिला अशा आरोपावरून त्यांवर येथें मुकद्दमा चालू आहे. निकाल पुढील आठवड्यांत होईल.

मूर्तिजापुर तहशिलींतील पोतदारावर कांहीं पैशाची अफरातफर केल्याचा आरोप येऊन तो बरतर्फ झाला असें समजतें.

या आठवड्यांत पर्जन्याकडे लोकांचे चातक पक्ष्याप्रमाणें डोळे लागले आहेत आर्द्रा नक्षत्र लागून बरेच दिवस झाले पर्जन्य नाहीं व बाहेरही कोठें चांगला पडल्याची वार्ता नाहीं. पेरण्याकरितां लोक खोळंबून राहिले आहेत. व धान्य महाग होत चाललें आहे.

मुलींच्या शाळांचा निमा खर्च लोकल फंडाकडून मिळत असे तो या सालीं मिळत नसल्यामुळें म्युनिसिप्यालिटयांनीं तो पैसा द्यावा असें त्यांस विच्यारलें आहे. कित्येक म्युनिसिप्यालिट्या गरीब आहेत ह्मणून त्यांकडून मदत न मिळाल्यामुळें कांहीं शाळा बंद होतील असें वाटतें. अकोल्यांतील १ हिंदुस्थानी मुलींची शाळा बंद झाली.

मूर्तिजापुरचे स्कूलमास्तर रा. अंताजी नारायण वेचलेकर यांस तेथें इंग्लिश शिकविण्याची अवश्यकता न राहिल्यावरून मलकापुरास असिस्टंट नेमिलें व तेथील असिस्टंट मास्तर रा. वामन त्रिंबक मवाळकर यांस मूर्तिजापुरास स्कुलमास्तर नेमिलें.

मि० दोराबजी कावसजी खामगावचे तहशिलदार रजेवरून आपले कामावर परत आले. व मि० किशोरखान उमरावतीस कमिशनर साहेबाचे भेटीस गेले.

## वर्तमानसार

रा. रा. विनायक जनार्दन गानू यांस भुसावळेस सेकंड क्लास फर्स्ट ग्रेड सबार्डिनेट जड्ज नेमिलें व ते तेथें येऊन काम पाहूं लागले.

पारीस शहरांतील स्त्रियांस नटण्याची फार सवय आहे हें प्रसिद्ध आहेच. बुचडे मोठे होण्याकरितां त्यांत गंगावन घालीत असतात, पण तें हवें तितकें मिळत नसल्यामुळें पारीस शहरांत त्या गंगावनाच्या बदला मनुष्यांच्या लांब केसांचाही उपयोग केला जातो व हे असले केस त्या शहरांत दरसाल १३० टण खपतात असें एका पत्रांत लिहिलें आहे!

तुर्कस्थानांतील रशियाचा वकील जनरल इग्नातिफ यांस त्या सरकारानें परत बोलाविलें.

काश्मिराकडे महामारीचा उपद्रव झाला होता तो आतां अगदी कमी आहे.

तुर्कस्थानच्या नव्या सुलतानानें हरजीगोविना एथील लोकांस लढाई कांहीं दिवस तकूब रहावी म्हणून पत्र पाठविलें होतें तें त्यांनीं मानिलें नाहीं असें म्हणतात.

माळव्यांत १२ व्या तारखेस पाऊस पडला. व परजन्यकाळ सुरू झाला.

मुंबईस बुधवार गुरुवार या दिवशीं चांगला पाऊस पडला.

रशियाचे झार व आस्त्रियाचे बादशहा फ्रान्सीस जोसेफ यांच्या भेटी होणार आहेत.

डा. भाऊ दाजी यांच्या स्मारक प्रति वर्षी २०० रुपयांच्या बुकांचें बक्षीस ठरविलें आहे. व तें बी ए च्या परिक्षेंत संस्कृतांत उत्तम होईल त्यांस मिळेल.

शिंदे सरकार नुकतेच नवीन गवरनर जनरल लार्ड लिटन साहेब यांचे भेटीस सिमल्यास गेले होते त्यांत त्यांचा हेतु झांशीच्या मुलखाच्या संबंधानें कांहीं विचार ण्याचा होता असें टाइम्सवरून समजतें.

लार्ड लिटन नवीन गवरनर जनरल साहेब बहादुर यांची प्रकृती नीट नाहीं म्हणून येता दिवाळा संपण्याच्या पूर्वींच परत जाण्याचा संभव आहे असें इंग्लिशमन पत्रकर्ते म्हणतात.

## अकबराची राजनीति किंवा त्याचा जाहिरनामा.

हरएक कृत्य करणें तें ईश्वरास मान्य होईल असें करावें व परमेश्वराच्या घरचा मी अतिक्षुद्र जीव आहे असें समजून आपला व परकी यास ध्यानांत आणोन जें करणें तें न्यायानें करीत असावें.

२ एकांतीं फार बसूं नये कारण ती चाल अरण्यांत वास करणाऱ्या तपस्वी लोकांची आहे. तसेंच नीच लोकांशीं हरएक संबंधानें विशेष संघटन ठेवूं नये कारण असें करणें हें बाजारी मनुष्याचें कर्तव्य होय.

३ ज्यास परमेश्वरानें मोठेपणा दिला असेल त्यावर निरंतर प्रीति ठेवावी.

४ प्रातःकाळीं, सायंकाळीं व मध्यरात्रीं कधींही निद्रा घेऊं नये, जागें असावें.

५ ज्यावेळेस कोणतेंही काम करण्याचें नसेल अशा समयीं मोठमोठ्या ज्ञानी लोकांचे ग्रंथ पहात जावें तेणेंकरून परमार्थाची वाट समजते. व कोणी कांहीं लबाडी केल्यास ती समजून येऊन नीट बंदोबस्त ठेवितां येतो.

६ ईश्वराची उत्तमोत्तम सेवा हीच होय कीं, आपल्या शक्तिप्रमाणें लोकांचीं कामें करीत जावीं आणि तीं करितांना आपला व परकी, मित्र किंवा शत्रू हें मनांत न आणितां समदृष्टीनेंच करीत जावीं.

७साधूजन, अनाथ लोक, याचक, एकांतीं बसलेले तपस्वी व कोणास कांहीं न मागणारे अशा प्रकारच्या लोकांस आपले शक्त्यनुसार धर्म करून त्यांचे आशिर्वाद घेत जावें.

८. हरएक मनुष्यानें कोणताही अपराध केल्यास त्याचें महत्व न्यायरूप ताजव्यानें काढून तदनुसार गुन्हेगारास शासन करणें तर शहाणे दूरदर्शी जे पुरुष असतील त्यांच्या संमतीशिवाय करूं नये.

९. दंगेखोर व लुच्चे जे लोक असतील त्यांस प्रथम सामदामनाच्या गोष्टी सांगून युक्ति प्रयुक्तीनें त्यांचीं मनें वळवावींत. या उपायानीं ते जर न ऐकतील तर त्यांस शेवटा चांगलें शासन करावें; परंतु ठार मारण्याच्या एकदम भरीस पडूं नये. कारण ठार मारला असतां पुन्हा आपणास जिवंत करितां येत नाहीं. ही गोष्ट अनेक कारणाकरितां ध्यानांत ठेवावी. ज्यास मरणाची शिक्षा देणें योग्यच असेल असले अपराधी त्यांनीं केलेल्या गुन्ह्याच्या चौकशीच्या कागदापत्रासह हुजूरास पाठवावे. एकाद्या गुन्हेगार असा असला कीं, तो कैदेंतही ठेवतां येत नाहीं व हुजूरास पाठविण्यासही अडचणी येतात तर अशा वेळीं मागला पुढला विचार करून मोठ्या सावधगिरीनें त्यास सोडूनही द्यावा परंतु कित्येक मागले पादशाह जसे हत्तीच्या पायास बांधण्याची वगैरे कडक शिक्षा देत असत तसली शिक्षा कधींच कोणास देऊं नये.

१० अन्नूचे मनुष्यास क्रोधानें पहाणें हेंच शिरच्छेदासारखें आहे व नीच मनुष्यास लाथांनीं मारलें तरी थोडेंच समजावयाचें. (पु० चा० )

## सिंक्लेर मेमोरियल फंड.

| | रु. |
|---|---|
| रा. बजाबा रामचंद्र डे. ए. इ वणी | २० |
| ,, जनार्दन नारायण हे.मा. यवतमाळ | १० |
| ,, केशव लक्ष्मण हे. मा. वणी | ७ |
| ,, वामन त्रिंबक भवाळकर अ. मा. मलकापुर | ६ |
| मि. शेषाचलम् तहशिलदार केळापुर | ५ |
| ,, वासुदेव नारायण अ. मा. यवतमाळ | ५ |
| ,, लक्ष्मण महादेव अ. मा. यवतमाळ | ३ |
| ,, विश्वनाथ नारायण हे. मा. वणी | ३ |
| ,, उध्धव व्यंकटेश अ. मा. वणी | ३ |
| ,, रामचंद्र यशवंत अ. मा. वणी | ३ |
| ,, विष्णु महादेव हेड मा. दारव्हा | ३ |
| ,, गोविंद लक्ष्मण हेड मा. कळंब | ३ |
| मि. खुदाबक्ष नेटिव डाक्टर वणी | ३ |
| ,, सयद करीम हेड मा. वणी | २ |
| ,, गुलाम नबी हेड मा. | २ |
| रा. विनायक रघुनाथ अ.मा. यवतमाळ | २ |
| ,, वामन बापूजी हेड मास्तर नेर | २ |
| ,, गोविंद विष्णु हे. मा. नवाबपुर | २ |
| ,, हरि पांडुरंग हे. मा. उकणी | २ |
| ,, दत्तात्रय बाळकृष्ण हे. मा. कोयर | २ |
| ,, रामचंद्र सखाराम हेड मा. दिगरस | २ |
| ,, धोंडो भीमाजी हेड मा. वडगाव | २ |
| ,, दत्तात्रय यादव अ. मा. दारव्हा | १ |
| ,, वामन केशव हेड मा. राळेगाव | १ |
| ,, गोविंद आबाजी हेड मा. खैरी | १ |
| ,, रामराव सखाराम हे. मा. वणी | १ |
| ,, रंगराव सदाशिव हेड मा. वणी | १ |
| ,, कृष्णाजी रामचंद्र हेड मा. मांगळे | १ |
| ,, विनायक बापूजी हे. मा. वडकी | १ |
| ,, रामचंद्र गोविंद हे. मा. खर्डा | १ |
| ,, श्रीधर नारायण हे. मा. पुनवट | १ |
| ,, भिकाजी विष्णु हेड मा. मुगुटबान | १ |
| ,, बापू तुकाराम हेड मा. पाटण | १ |
| ,, बाळाजी नारायण अ. मा. यवतमाळ | १ |
| ,, हनुमंत नरसिंव्ह अ. मा. यवतमाळ | १ |
| ,, रंगो कृष्ण अ. मा. वणी | |
| ,, सदाशिव मल्हार हे. मा. कोसारी | १ |
| ,, सिताराम दाजी अ. मा. वणी | १ |
| ,, गोविंद दामोदर हेड मा. लोही | १ |
| मि. अबल अली हे मा. दारव्हा | १ |
| ,, कन्हया लिंगोजी हे. मा. सावरगाव | १ |
| रा. बळिराम जयराम अ. मा. दारव्हा | ८ |
| | ११३०८ |
| मागील बेरीज | ८८०८ |
| एकंदर बेरीज | ९९४ |

## नोटिसा.

रंगराव पुरुषोत्तम देशपांडे प्रगणे बाळापुर यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते अशी कीं, तुमचे हिश्शाबद्दल सन १२८५ [illegible]तली सालचा रुसुमाचा पैसा आमचे जवळ आहे तो आम्ही तुह्मास चार वेळेस घेऊन जाण्याविषयीं समक्ष सांगितलें त्यावेळीं तुह्मी फक्त घेतों असें कबूल करून अद्यापपर्यंत घेत नाहीं याजकरितां या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं तुह्मी आपले रुपये आज पासून च्यार दिवसाचे आंत घेऊन जावें. नोटिसीचा खर्च तुह्मास द्यावा लागेल कळावें तारीख २३ जून सन १८७६ इसवी.

( सही ) अनदराव अमृतराव देशपांडे दस्तुर विठ्ठल केशव मुखत्यार

नोटिस

राजश्री मारुती वल्लद वेडू माळी रहाणार मौजे धिरणी तालुके मलकापुर यासी नोटिस देणार चहादू वल्लद शामा माळी कसबे जयपुर. तुह्मी आमचे मुलीस आज ६ वर्षे झालीं नेत नसून टाकून दिलें तिची ने आण आज सहा वर्षांत कधींच केली नाहीं. च्यार जातवाले पंच तुह्मांस न बाळगत असल्यावरून पावती देण्याविषयीं सांगतात परंतु तुह्मी पावतीही देत नाहीं व वस्त्र अन्न तेंही देत नाहीं, दुसरे च्यार गावचे जातीवाले पंच घेऊन येऊन तिजला नेत नाहीं तेव्हां तिजला बाळगण्याची तजवीज करावी अगर फारकती द्यावी ही मुदत आह्मी पंधरा दिवसाची दिली आहे या मुदतीतप्रमाणे निकाल न केल्यास आह्मी तुमचेवर सहा वर्षांचे अन्न वस्त्राबद्दल व नोटिशीचे पैशा सुद्धां फिर्याद करून भरून घेऊ व पुढें तुमची कोणतीही सबब न ऐकतां मुलीचे हयातीपर्यंत सरकार मार्फत अन्न वस्त्राचा बंदोबस्त तुमचे इस्टेटांतून करून घेऊं. हें तुह्मी आपसांत समजून निकाल करावा नाहीं तर रीतीप्रमाणें जातीवाले पंच करतीलच कळावें तारीख १७ जून सन १८७६ इसवी.

( सही ) चहादू वल्लद शामा माळी नि० [illegible].

नोटिस

विठोबा वल्लद जयराम वाणी लिंगाईत रहाणार मौजे माकोडी प्रगणे मलकापुर तालुके मजकूर जिल्हा बुलढाणे यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यात येतें कीं आमचा सखा भाऊ गणू वल्लद तुळाजी पाटील वडील यांचे नावें मौजे टेंभी तालुके मलकापुर जिल्हे बुलढाणा एथील वडिलोपार्जित शेताचें खातें त्याचे नावें असलेले त्यापैकीं २ शेतें आह्मा उभयताचे हिश्शास आलीं आहेत तीं ठिके खारवन १, दुसरी हिवरी डिवगी हीं हरदो शेतें दोन वर्षांतपासून हिश्शाप्रमाणें आमचे वहिवाटींत आहेत तीं शेतें सदरच्या गणू याणीं तुह्मास गहाण किंवा खरीद दिल्याचें आह्मास समजलें आहे. याजकरितां या नोटिशीनें तुह्मास असें कळवितों कीं, सदर्हू शेतावर तुमचा गहाणाचा किंवा खरिदीचा हक्क बिलकुल चालणार नाहीं. कळावें. तारीख १७ जून सन १८७६ इसवी.

[सह्या]

१. धनसिंग वल्लद तुळजा पाटील मौजे टेंभी निशाणी खुद

१. मानसिंग वल्लद तुळजा पाटील मौजे टेंभी दस्तुर खुद.


## जाहिरात हिंदुस्थानवर्णनसार

आवृत्ती दुसरी किंमत ३ आणे

थोड्या दिवसांपूर्वीं [illegible] पुस्तकाची पहिली आवृत्ति छापिली होती ती फार संक्षिप्त असल्यावरून पुष्कळ मित्रांनीं ती वाढविण्याविषयीं सुचविलें होतें; त्याप्रमाणें मेहेरबान च्याटफिल्ड साहेब बहादुर यांच्या एलिमेंटरी जाग्रफीवरून ही आवृत्ति वाढवून चांगल्या खिळे छापानें छापिली आहे. हल्लीं हिंदुस्थानचे राजकीय कामाचे संबंधानें १४ विभाग करितात ते सांगून त्यांचें वर्णन पृथक पृथक केलें आहे. हिंदुस्थानच्या भूगोलाची माहिती ज्या पद्धतीनें मुलांस शिकवावी असें शाळाखात्याचे अधिकारी ह्यांचें मत आहे, त्या पद्धतीस अनुसरून ह्या पुस्तकाची रचना केली आहे. शेवटीं हिंदुस्थानच्या राज्य व्यवस्थेची माहिती सांगितली आहे.

पुस्तकें खालीं सही करणाराकडे किंमत पाठविली असतां मिळतील. एक आणा हाशीलानें ३ प्रती जातात

तारीख १ माहे जून सन १८७६ इ०

भास्कर बल्लाळ आपटे

स्कूलमास्तर पिंप्राळें जिल्हा खानदेश

[ जळगाव रेलवे स्टेशनाजवळ ]


हें पत्र अकोलें एथें [illegible]डेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमा[illegible]ा.छा. प्र.